


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २ एप्रिल २०२३


# पुरोगामी महाराष्ट्राला दंगली शोभतात का ?



आधुनिक केसरी

**देशात रामनवमीच्या दिवशी गुजरात राज्यातील वडनेरा, पश्चिम बंगालमध्ये हावडा तर महाराष्ट्रात छ. संभाजीनगर आणि जळगाव येथे शोभायात्रेवर दगडफेक व खासगी दुकाने, वाहने व पोलिसांची वाहने जाळण्यात आली. देशात वारंवार दंगली का होत आहेत ? दंगल कोणतीही असो, ती मानवतेला कलंकच आहे. यात सामान्य माणूस मरतो. दंगल करणारा सामान्य माणूस असतो ! पण त्यांना चिथावणी देणारा म्होरक्या असतो. देशात वारंवार दंगली का होतात ? उत्तर प्रदेशचे सरकार जर दंगलखोरांचा बंदोबस्त करू शकते ! तर मग महाराष्ट्र व इतर राज्ये दंगलखोरांना आवर का घालू शकत नाहीत ? खरं तर पुरोगामी महाराष्ट्रात दंगली होणे हेच शोभणारे नाही.**

दंगल हा सार्वजनिक झुंडशाहीचा प्रकार आहे. दंगलीचे वांशिक, धार्मिक, जातीय, विद्यार्थी असे प्रकार आहेत. समाजकंटक म्हणजे समाजाचे शत्रू यांचा दंगलीत सहभाग असतो. देशात पहिला दंगा १९३२ मध्ये मुंबईत कुत्र्यावरुन झाला होता. त्या दंगलीची 'डॉग रायट' म्हणून नोंद आहे. १९४६ मध्ये मुस्लिम लीगने थेट कारवाईची घोषणा केली होती व स्वतंत्र पाकिस्तानची मागणी मंजूर करावी, अशी मागणी होती. तत्कालिन मुख्यमंत्री सोहराबंदी यांच्या चिथावणीमुळे भीषण हत्याकांड घडले. ७२ तासात ४ हजार हिंदुंची कत्तल व तीस हजार गंभीर जखमी झाले. तसेच १९४७ मध्ये भारत व पाकचे विभाजन झाले. यावेळी हिंदु व मुस्लिम दंगलीने पेट घेतला होता. यात १० लाख मारले गेले. तसेच तीस हजार महिलांचे अपहरण व महिलांवर




कमलाकर जोशी

ज्येष्ठ पत्रकार, नांदेड

संपर्क क्र. 9422170850


बलात्कार करण्यात आले. या दोन घटनांचा इतिहास वाचला तर अंगावर शहारे येतात. देशाचे विभाजन हे धर्माच्या आधारावर झाले. तेंव्हा भारतातील बहुसंख्य मुस्लिमांनी पाकिस्तानपेक्षा भारतात सुरक्षित राहू शकतो, असे वाटल्याने त्यांनी भारतात राहणे पसंत केले. भारतीय घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. भारतीय घटनेने सर्वांना समान हक्क, न्याय दिला जातोय! पण अजून स्वातंत्र्यानंतर मानसिकता बदलेली नाही. देशात दंगलीच्या अनेक घटना घडल्याची नोंद आहे. १९५७ रामानद दंगा- ३८ मृत्यू, १९६७ राची उर्दु विरोध दंगल- १८४, १९६९ गुजरात दर्गा व मंदिर प्रकरण-५१२ मृत्यू, १९७४, मुंबई आरक्षण - १ मृत्यू , १९८० मुरादाबाद-४०० , १९८१ बिहार- ४५ मृत्यू, १९८४ भिवंडी महाराष्ट्र २७८ , १९८५अहमदाबाद-२७५, १९८६ जम्मू कश्मीर- मोठ्या संपत्तीचे नुकसान १९८७ मेरठ-१५९ , १९८७ दिल्ली-१५, औरंगाबाद-२६ ही यादी फार मोठी आहे. यात देशातील मोठे दंगे झाले. त्यात शीखविरोधी दंगा-१९८४, काश्मिरचा दंगा-१९८६, वाराणाशी-१९८९, भागलपूर-१९८९, मुंबई-१९९२, गुजरात-२००२, अलिगड-२००६, देगंगा पश्चिम बंगाल-२०१०, आसाम-२०१२ आणि मुजफर -२०१३ मध्ये दंगा झाला. या सर्व घटनेत हजारो जणांना प्राण गमावावे लागले आहेत. देशात २०१९ मध्ये ४५ हजार ९३८ दंगे झाले, त्यात ४३८ सांप्रदायिक वा धार्मिक दंगे झाले. २०२० मध्ये ५१ हजार ६०६ दंगे झाले. त्यात ८५७ हे सांप्रदायिक वा धार्मिक दंगे झाले. पाच वर्षात २ लाख ७६ हजार २७३ दंगली झाल्या, त्यात ३३९९ धार्मिक, सांप्रदायिक दंगे झाल्याची माहिती आहे. म्हणजे देशात वारंवार दंगली होत आहेत. त्या थांबत नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रात अनेक मुंबई, अमरावती, नांदेड, छ. संभाजीनगर ( औरंगाबाद, ) नागपूर, मालेगाव, नासिक, अकोला, परभणी आदी शहरात दंगली झाल्याच्या घटना आहेत. २०१२ मध्ये आसाममधील तथाकथित मुस्लिम अत्याचाराच्या विरोधात रझा अकादमीने मुंबईत मोर्चा काढला होता. त्यातून हिंसाचार झाला होता. पण त्यांना कोणीही विरोध केला नाही. पण मनसे नेते राज ठाकरे यांनी जाहीरपणे या घटनेचा निषेध व विरोध केला. देशात गांधीवादी विचाराचे व तथाकथित 'धर्मनिरपेक्ष' नेत्यांनी दंगली घडविल्या आहेत. देशात रोज कोठे कोठे हिंदु मार खातोय, तेंव्हा अटलबिहारी वाजपेयी संसदेत छातीठोकपणे म्हणाले 'अब हिंदू मार नही खायेगा'. कारण काँग्रेस पक्ष तुष्टीकरणाचे राजकारण करतोय ! आजही काँग्रेस नेते मतासाठी तेच राजकारण करत आहेत. देशात मुस्लिम समाजावरच हल्ले होत आहेत, तो सुरक्षित नाही, असे विधान उच्च पदावर असलेल्या व्यक्ती करू लागतात याचे आश्चर्य वाटते! कारण हिंदु धर्म इतर धर्मावर हल्ला अथवा अतिक्रमण करतो असा इतिहासही नाही. जगात आदर्श हिंदु धर्म आहे. तो सर्वच धर्मांचा आदर करतो, तो कोणालाही काफीर मानत नाही. महाराष्ट्रातील संतांनी तर जगाच्या कल्याणाची व मानवतेची शिकवण दिलेली आहे.आज स्वातंत्र्याची ७५ वर्षे झाली आहेत. देशाचा अमृत महोत्सव साजरा होत असताना दंगली होतात, याचे वाईट वाटते. भारतात बहूसंख्य हिंदु समाज असताना राम नवमी, गणपती विसर्जन मिरवणूक, दुर्गा महोत्सव, आणि छ. शिवाजी महाराज जयंती याच मिरवणुकीवर दगडफेक केली जातेय ? कारण बहुसंख्य मुस्लिम समाजाचा आपल्या वस्तीतून इतर समाजाच्या धार्मिक मिरवणूक नेण्यास विरोध असतो. महाराष्ट्र भिवंडी या भागात सुमारे चौदा वर्षे शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली नव्हती. कारण या भागात शिवजयंतीची मिरवणूक काढली की दंगल होत असे. त्यामुळे राज्य शासन व पोलिस प्रशासन या भागात शिवजयंती मिरवणुकीला परवानगी देत नसत. स्वातंत्र्यानंतर भारतात मुस्लिम बांधवांनी भारतात राहणे पसंत केले. यात राजकीय पक्षांनी दोन धर्मात भांडणे लावून यातून स्वतःची मतपेटी भरण्याचा धंदा सुरु केला. तर कट्टर धर्मगुरू, मुल्ला -मौलवी हे लोकांच्या भावना भडकवितात, यातून धार्मिक दंगे घडलेले आहेत. हिंदु व मुस्लीम समाजातील बहुसंख्य लोकांचा दंगलीला विरोध

असतो. संपूर्ण समाजाला दोषी ठरविणे चुकीचे आहे. आता राजकीय नेत्यांना देशात धर्मावर आधारित शरीयत कायदे हवे आहेत. पण देशात पी.एफ आय. संघटनेने तर इस्लाम राष्ट्र करण्याचे मनसुबे रचल्याचे उघडकीस आले. बागेश्वर धामच्या बाबांनी हिंदु राष्ट्र करण्याची भाषा करणे, हे चुकीचे आहे. देशात रामनवमीच्या दिवशी पश्चिम बंगाल, गुजरात, बिहार आणि महाराष्ट्र या राज्यात हिंसक घटना घडल्या आहेत, त्या दंगली नाहीत, दंगल ही दोन गटात होत असते. या वेळी शोभायात्रेवर जाणीवपूर्वक दगडफेक करण्यात आलेली आहे. यांचा अयोध्यातील राम मंदिराला उभारणीला विरोध, मोदी सरकारविषयी द्वेष हेच हिंसाचाराचे कारण असावे. भारतात मुस्लिम वस्तीतून रामांची मिरवणूक काढण्यास परवानगी घ्यावी लागणार का ? दक्षिणेत एका गावात बहुसंख्य मुस्लिम असल्याने मंदिर बंद करण्याची मागणी केली होती. देशात झालेल्या या हिंचासार करण्यामागे निश्चित षडयंत्र असले पाहिजे. त्याशिवाय समाजकंटक हे धाडस करू शकत नाहीत. छत्रपत्री संभाजीनगर शहरातील किराडपुरा हा मुस्लिमबहुल विभाग आहे. या भागात आजपर्यंत कधी हिंसाचार झाला नाही. पण रामनवमीच्या पूर्वसंध्येला दोन तरूणात सायकलचा धक्का लागल्यावरुन किरकोळ वाद होतो. त्यातून जमाव रस्त्यावर येतो! लगेच हिंसाचार घडतो! हे अचानक घडत नाही. यात लोकांना चिथावणी देणारा असला पाहिजे! गेल्या काही दिवसांपासून औरंगाबादचे छ. संभाजीनगर हे नामांतर झाल्याने नाराजी मुस्लिम राजकीय नेत्यात नाराजी होती. या नेत्यांनी मुस्लिम लोकांना हाताशी धरून आंदोलन केले होते. तेंव्हा राज्य सरकारने नामांतराचा निर्णय बदलेला नाही. यात छत्रपती संभाजीनगर मनापाची निवडणूक, तसेच २०२४ मध्ये लोकसभा, विधानसभेची निवडणूक होणार आहे. तेव्हा ध्रुवीकरणासाठी केलेला हा प्रयोग असावा.




पोलिस घटनास्थळी असताना जमाव येतो व सर्रासपणे वाहने जाळतो! या वेळी पोलिसांनी गोळीबार केला, त्यात एक जण ठार झाला. हिंचाचार बाहेरच्या लोकांनी केला, असा बचाव केला जात आहे. पण जमाव मोठ्या प्रमाणात होता ? समाजकंटकाला कोणताही धर्म नसतो. या घटनेवरुन राजकीय नेत्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. दंगलीनंतर शांतता प्रस्थापित करणे हे राजकीय नेत्यांचे पहिले कर्तव्य असते, पण याचाच त्यांना विसर पडला आहे.

दंगल झाल्याबरोबर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री तर शोभायात्रेतील लोकांना जबाबदार धरत आहेत! तर संजय राऊत यांनी महाविकास आघाडीची सभा होऊ नये, म्हणून दंगल घडविली गेली ? असा आरोप केला. या दंगलीच्या चौकशीपूर्वी नेत्यांनी हा निष्कर्ष कसा काय काढला ? याबाबत त्यांना विचारणा झाली पाहिजे. संभाजीनगरात हिंचासार झाला असताना मात्र महाविकास आघाडीच्या नेत्यांना समाजाच्या सुरक्षेतेपेक्षा सभा घेणे महत्वाचे वाटत आहे. त्यांना दंगलीची पूर्वकल्पना होती तर गप्प का बसले ? ते पोलिसांना माहिती देत नाहीत. केवळ पुरोगामी महाराष्ट्रात राजकीय नेते जातीजातीत भांडणे लावणे, केवळ हिंदु धर्माला, साधू संतांना लक्ष्य करणे हेच चालू आहे.

एकदा दोन धर्मातील जमाव हातात शस्त्रे, मशाल घेऊन एकमेकांचे जीव घेण्यासाठी निघालेले होते, हे थोर समाजसेवक साने गुरूजी यांना माहीत झाले. ते दोन्ही समाजात उभे राहिले, त्यांनी दोघांना शांततेचे आवाहन केले. तेंव्हा दोन्ही बाजूच्या जमावाने हातातील शस्त्रे, मशाली खाली टाकल्या. आज महाराष्ट्रात तसे समाजसेवक नाहीत. यशवंतराव चव्हाणांसारखे राजकीय नेते होणे नाही. संभाजीनजरच्या घटनेत पाचशेच्या वर लोक रस्त्यावर येवून धुडगूस घालत दिसत आहे. त्यांना अटक झाली पाहिजे. मग ते कोणत्याही धर्माचे असोत! या घटनेची चौकशी होऊन मुख्य सूत्रधाराचा शोध लागला पाहिजे. छ. संभाजीनगरच्या हिंसाचाराची एस आय.टी. मार्फत चौकशी करण्यात येणार आहे. पोलिसांनी धरपकड सुरु केली असून लोक आता घरेदारे सोडून पळ काढत आहेत. उत्तर प्रदेश प्रमाणे गुंडांची, समाजकंटकांची आणि दंगलखोरांची संपत्ती जप्त करणे, मालमत्तेवर बुलडोझर चालवून उध्वस्त करणे, तसेच पोलिसांवर गोळ्या झाडणाऱ्यांचा खात्मा केला पाहिजे, तरच समाजकंटकांना भीती वाटेल. कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्य सरकारचा आहे, तेंव्हा महाराष्ट्र सरकारे दंगलखोरांविरोधात कडक कारवाईची पाऊले उचलावीत ? यावेळेस पश्चिम बंगाल, महाराष्ट्रात दोन गट समोरासमोर आलेले दिसत नाहीत. केवळ एकाच समुदायातील लोक रस्त्यावर येतात व दगडफेक करतात वाहनाची जाळपोळ व धूडगूस घालताना व्हिडीओतून दिसून येत आहे. एका मराठी वाहिनीने तर 'आम्ही व्हिडिओ न दाखविण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हणून पाठ थोपटून घेतली. पत्रकारांनी ज्या दृश्यामुळे दंगल होईल, असे दाखवू नयेत. त्यांनी समाजिक बांधिलकी जपली पाहिजे, हे मान्य! पण समाजकंटक रस्त्यावर येवून उघडपणे हैदोस घालता आहेत ? तेंव्हा अशांचे चेहरे समोर आणले गेले पाहिजे.

दंगलीत दोन्ही बाजूने माणसे मरतात, खासगी व शासकीय संपत्तीचे करोडो रूपयांचे नुकसान होते. गुजरात २००२ च्या दंगलीत एकच बाजू मांडली जात होती. एकाच समुदायाला लक्ष्य केले, असा अपप्रचार राजकीय नेत्यांनी, पत्रकारांनी केला. त्यामुळे देशाची आंतरराष्ट्रीय बदनामी केली. यात बी.बी.सी. वृत्तसंस्था तेच करत आहे. तेंव्हा चाटूकार पत्रकारांनी आचारसंहिता पाळली नाही. दंगली होतात,नंतर आरोपींना अटक होते! पण दंगलीचा मुख्य सुत्रधार सापडत नाही. नंतर त्याचा शोध घेतला जात नाही. तेंव्हा त्यांच्याही मुसक्या आवळल्या गेल्या पाहिजेत. दंगल ही राजकीय स्वार्थासाठी, धार्मिक द्वेषातून झाली, या कारणाचा तपास झाला पाहिजे. तसेच दंगलखोरांची संपत्ती जप्त करणे, नुकसान भरपाई वसूल करणे, तसेच संघटीत गुन्हेगारी कायद्याखाली गुन्हे दाखल करणे, तसेच जामीन न मिळणे, दंगलीत आरोपी आहेत, त्यांच्या सर्व शासकीय सुविधा बंद केल्या गेल्या पाहिजे. तसेच त्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली पाहिजे. त्यांना कायद्याची भीती वाटली पाहिजे. म्हणजे भविष्यात दंगलखोर हे रस्त्यावर येणार नाहीत. तरच या दंगली थांबतील!




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# साहित्य अभिवाचनाची पंढरी : चाळीसगाव नगरी

आधुनिक केसरी

फेब्रुवारी २०२३ मध्ये पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रातील वर्धा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. या सांस्कृतिक महोत्सवाला जसे देशभरातून साहित्यिक आणि साहित्य रसिक हजेरी लावतात, मायमराठीचा जागर होतो, विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम होतात, वाङ्मयीन चर्चा होतात आणि तीन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमांची सांगता होऊन उपस्थित असणारे सगळेच काहीतरी मौल्यवान असे देऊन जातात आणि घेऊनही जातात ; अगदो तसाच अभिवाचनाचा महोत्सव दरवर्षी चाळीसगावला भरतो आणि साहित्य अभिवाचनाच्या वारकऱ्यांची पाऊले चाळीसगाव नगरीच्या दिशेने वळतात. यावर्षी हा सांस्कृतिक महोत्सव २४, २५ आणि २६ फेब्रुवारीला चाळीसगावमध्ये नुकताच संपन्न झाला. जी संस्था दरवर्षी ही सांस्कृतिक यात्रा भरवते, त्या संस्थेचं नाव आहे रंगगंध कलासक्त न्यास. संस्थेचं नाव जेवढं सुंदर आणि अर्थपूर्ण आहे, तेवढंच संस्थेचं कार्यही. चाळीसगावमधील ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ मुकुंद करंबेळकर हे या संस्थेचे प्रमुख आणि सर्वेसर्वा. हसतमुख, प्रसन्न आणि मृदू व्यक्तिमत्वाचे धनी




असलेल्या डॉ मुकुंद करंबेळकर यांना तेवढीच समर्थ साथ डॉ मीनाक्षी वहिनींची लाभली आहे. डॉ मुकुंद करंबेळकर हा मुळातच प्रचंड कलेचं आणि नाटकांचं वेड असलेला माणूस ! व्यवसायानं डॉक्टर, शल्यकर्म करून नवनिर्मितीचा वसा घेतलेले हे सर्जनशील हात, कलेच्या क्षेत्रात देखील काहीतरी नवीन करावे यासाठी आसुसलेले होते. 'शल्यशोभा' हे त्यांच्या हॉस्पिटलचं अनेक अर्थांनी अर्थपूर्ण असणारं नाव ! या माणसाच्या मनात

चाळीसगावात एखादी नाट्यसंस्था नाही, नाट्यगृह नाही हे शल्य बोचत होतं. आपला व्यवसाय करता करता सतत डोक्यात असलेला नाटकाचा किडा या माणसाला स्वस्थ बसू देत नव्हता. त्यातून त्यांनी मग १९९४ मध्ये एकांकिका बसवायला सुरुवात केली. स्थानिक कलाकारांना हाताशी धरले. चार पाच वर्षे आपल्या लिखित, दिग्दर्शित एकांकिका घेऊन महाराष्ट्रभर फिरले. कुठे बक्षीस मिळालं, कुठे नाही. पण प्रयत्नात मात्र कसूर केली नाही. स्वतः डॉक्टरांनी काही एकांकिका लिहिल्या, दिग्दर्शित केल्या. चाळीसगावातील विद्यार्थ्यांना काहीतरी सकस आणि चांगले वाचायला मिळावे आणि वाचनाची आवड त्यांच्यात जोपासली जावी या हेतूने डॉक्टरांनी अनेक वर्षे ज्ञानप्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' या मासिकाचा प्रचार आणि प्रसार केला.



## आनंदी पहाट

# परस्परांच्या भावनांची कदर होणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो. एकाच घरांत एकाच कुटुंबातील सदस्यांचे हे आर्थिक ताळेबंद, व्यवहार इतके कुटुंबातील इतर सदस्यांपासून सुरक्षित ठेवावे लागतात का ? तसे करणे एकूणच कुटुंबीयांच्या परस्पर नातेसंबंधाच्या दृष्टीकोनातून योग्य वाटते का ? अनेकदा नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहारामुळे परस्परांमध्ये दुरावा निर्माण होत जातो, गैरसमज वाढत जातात, मतभेद व्हायला लागतात आणि कालांतराने परस्परांविषयी वैरभावना निर्माण होऊ लागते. ह्यामुळे घडत काहीच नाही परंतू सर्वच पातळीवर बिघडायला लागते. विवाहित व्यक्ती एकमेकांपासून कायमस्वरूपी विभक्त होण्याकडे वळत आहेत. काही जण तर एका वर्षाच्या आतच वेगळे व्हायचा निर्णय घेऊ इच्छितात. काही जणांमध्ये अनेक वर्षांच्या सहजीवनानंतर घटस्फोटाचे विचार मनांत यायला लागतात. अर्थात प्रत्येकाची कारणे निरनिराळी असतीलही पण एक-दोन अपत्य असलेल्या व्यक्ती देखील असा विचार जेव्हा करतात तेव्हा त्या दोघांनाही त्यांचीच अपत्य आपत्ती वाटायला लागतात. त्यांच्या विभक्तीमुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव न होणे हीच उणिव म्हणावी लागेल. एकमेकांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय येत असेल, तर ते नाते फार काळ चांगले टिकत नाही. परस्परांच्या भावनांबद्दल नेहमी संवेदनशील राहणे आवश्यक असते. एखादी व्यक्तिगत मागणी पूर्ण झाली नसेल तर नाराज होण्यापेक्षा त्यामागचे कारण समजून घ्यावे,

दुसऱ्याची बाजू देखील लक्षांत घेणे आवश्यक असते. काहीवेळा गैरसमजांमुळे अविश्वास निर्माण होत राहतो आणि जोडीदार आपली फसवणूक करतोय असे हळूहळू वाटायला लागते, ते अधिक घातक असते.

# देवाण-घेवाण..

आधुनिक केसरी

वस्तू ,सामान यांची जशी देवाण-घेवाण होते तशी विचारांची सुद्धा देवाण-घेवाण व्हावी आपल्या मुलांसोबत. घरात जेव्हा काही लहान सहान कार्यक्रम होतात तेव्हा मुलांना त्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी सहभागी करून घेऊया. त्यामुळे घरातील सण समारंभासाठी मुले उत्साहाने सहभागी होतील. आपल्या मार्गदर्शनाखाली त्यांना काही कामं सांगावेत. त्यांच्याशी कार्यक्रमाविषयी चर्चा करावी, जेणेकरून त्यांची मतं आपल्याला कळतील. ते आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करतील. हे असं केलं तर कसे वाटेल!! हे इथे ठेवलं तर कसं दिसेल!! अशा छोट्या छोट्या गोष्टी विचारून करूया. कधी कधी आपली सजावट खूप सुंदर नाही झाली तरी चालेल. पण मुलांच्या आवडीने त्यांना स्वतः करू द्या. त्यांचा उत्साह, त्यांची मेहनत आपल्यासाठी खूप मोठा आनंद आहे. त्यांच्यातील सृजनशीलतेला वाव मिळेल. शिवाय आपल्या घरी होणाऱ्या सण समारंभात मुलं सहभागी होतील. आपल्या संस्कृतीची त्यांना ओळख होईल. मुलं वयाने जसजशी मोठी होतील,तसतशी त्या वयानुसार त्यांच्याशी वैचारिक देवाण-घेवाण व्हावी. आपण बाहेरून आल्यानंतर घडलेल्या, अनुभवलेल्या सर्व गोष्टी त्यांना सांगाव्यात. मग तेही त्यांचे अनुभव आपल्याला सांगतील. त्यांच्या बोलण्यावर आपण लगेच निर्णय देऊ नका. मुलं सैरभैर होतील. पुन्हा आपल्याशी बोलणार नाही. कालांतराने त्यांना काही गोष्टींची कल्पना द्या. याचे परिणाम काय असतात हे वेगळे उदाहरणे देऊन पटवून द्या. जेणेकरून मुले वेळीच सावरतील. नवीन वस्तू घेताना काही खरेदी करताना त्यांचा विचार घेऊ या. त्यांना आवडतं का ? घेणे गरजेचे आहे का ? याविषयी मुलांची चर्चा करा. आपल्या पाल्याशी फक्त पैसा, वस्तू, कपडे ,खाऊ यांची देवाणघेवाण करू नका. तर चांगल्या आचार विचारांची सुद्धा देवाण-घेवाण करा. जेणेकरून आपल्या मुलांमध्ये खूप मोठा आत्मविश्वास निर्माण होईल.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-68

# परोपकार

आधुनिक केसरी

एका गावात एक निर्धन मनुष्य राहत होता. परिस्थिती गरीबीची असूनही तो मनाने उदार होता. आपल्या घासातील घास देण्यासही तो कमी पडत नसे. एकदा एका शेठजीकडे तो जेवावयास गेला असताना त्या शेठजीने त्याला पंचपक्वानांचे ताट वाढून दिले. ती भरगच्च पदार्थांनी भरलेली थाळी बघून त्या गरीबाला वाटले की यातून किमान तीन माणसांची भूक भागू शकेल. त्याने शेठजीची परवानगी मागितली व त्यातील अन् त्याने बरोबर घेतले व घराकडे जाण्यास निघाला. रस्त्यात त्याला एक भिकारी भेटला त्याला त्याने खायला दिले. त्यातून उरलेले अन् घेऊन तो घरी आला, तो जेवायला बसणार इतक्यात एक भिक्षुक या माणसाच्या घरी आला व त्याने त्याला अन्नदान करण्याची विनंती केली. गरीबाने च्याच्यासमोरील ताट त्या भिक्षुकाच्या स्वाधीन केले. त्यानंतर अजून एक अपंग व्यक्ती दाराशी आली त्यानेही या गरीबाकडे अन्न मागितले त्यालाही याने आपल्या थाळीतील अन्न खायला दिले. आता याच्याकडे देण्यासारखे काहीच शिल्लक राहिले नाही तेव्हा याने स्वतःची भूक भागविण्यासाठी एक भांडेभर पाणी घेतले तर समोरून एक वृद्ध व्यक्ती आली व तिने ते पाणी पिण्यासाठी मागितले. याला आता खाण्यापिण्यासारखे काहीच उरले नाही तरीही ही व्यक्ती समाधानात होती आजचा दिवस आपल्यामुळे किमान चार लोकांना तरी खाण्यापिण्यास मिळाले. तो ह्याच विचारात असताना तेथे देव प्रगटले व म्हणाले, 'मी तुझी परीक्षा घेण्यासाठीच भिकारी, भिक्षुक, अपंग आणि वृद्ध व्यक्तिचे रूप घेतले होते व तुझ्याकडून काही ना काही मिळते का नाही हे पाहिले आणि तु स्वतःचा विचार न करता दुसऱ्याचा जीव जाणून घेतलास व देत राहिलास. आता या पुढे तुला काहीच कमी पडणार नाही असा मी तुला वर देतो." इतके बोलून देव अंतर्धान पावले.

**तात्पर्य : देण्यातच खरे सुख लपलेले आहे. कुणाचाही घास हिरावून घेण्यापेक्षा कुणाला तरी एखादा घास देता कसा येईल याचा विचार करणे यातच खरे सुख लपलेले आहे.**

# निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**इदं जगन्न सत्यं च**
**विरलोऽहं सुतस्तव |**
**कथं जीव्यं कथं जीव्यं**
**ज्ञायते न हि मातृके || 2 ||**
**हे जग सत्य नाही. पण या जगात मी तुझा पुत्र विरळा आहे. आई, कसे जगावे, कसे जगावे, कळत नाही.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**दुर्गुण विषय बढ़ावती, सद्गुण होय विनाश ।**
**बुधि विद्या सत नाश है, मन अभिमान विकाश ।।२३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/२३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
दुर्गुणांमुळे इंद्रिये विषय-सुखाकडे धाव घेतात. मन अभिमानामुळे इंद्रियांच्या विषय-सुख उपभोगासाठी सदैव प्रयत्नशील असते. म्हणून सद्गुणांच्या विनाशामुळे बुद्धी आणि विद्येचा सत्यानाश होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# 'निजसुखगुणविश्रामा'

आधुनिक केसरी

चैत्र शुध्द नवमी हा दिवस श्रीराम जयंती म्हणून साजरी केली जाते. सर्व प्रथम आपण रामायण व रामाशी संबंधीत गोष्टींचा विचार केला तर असं दिसून येते की राम ही एक विचार शक्ती आहे. घराघरांत वाचले जाणारे रामायण हे आपल्या दैनंदिन जीवनात जगण्याची उर्जा देणारे आहे रामकथेची माहिती घेऊन आपल्या जगण्यात सुख आणता येते व आपली अध्यात्मिक प्रगती साधून विश्वसंकल्पनेत समरस होता येते. रामकथे मागची महासंल्पना या निमित्ताने पाहुयात. अयोघ्या नगरीत अयोध्यापतीराजा दशरथ व माता कौसल्याच्या पोटी श्रीराम जन्म घेतला. राम हे जीवन जगण्यातलं तत्व आहे,अंश आहे व सार ही आहे. कसे ते पहा. दशरथ--दाही दिशेला नजर राहु द्या. आयुष्य जगत असताना हे शरीररूपी देह म्हणजे रथ आहे. त्याला वेळीच लगाम घालायला शिका. तुमच्या देहरूपी रथाची भरारी सत्कर्माची पेरणीं करत करा. दशरथ म्हणजे दहा हात कायम एकत्र येऊ द्या एकीचं बळ कायम राहील यासाठी सतत एकोप्याने रहा. *कौसल्या-जीवन जगत असताना कुठलीही सल मनात येऊ देऊ नका. मोकळ्या मनाने निर्मळ मनाने सतत सत्कर्माची कास धरा.

*अयोध्या-अयोध्यापतीराजा व राणी कौसल्या यांची नगरी,याठिकाणी माणसामध्ये भांडणाचा,कुरघोडीचा,लवलेशही नाही.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# वासनेचे प्राबल्य

आधुनिक केसरी

माझ्या निरूपणाचा तुम्हांस विसर पडतो म्हणूनच बरे आहे. एखादी गोष्ट चांगली आहे आणि ती मिळाली तर सुखप्रद होईल ह्या गोष्टीची आठवण असूनही आपण ती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत नाही हे अगदी अयोग्य आहे. हे पापच आहे. जर आपल्याला समजलेच नाही तर ते न करण्यात पाप नाही, परंतु समजूनही न करण्यात अत्यंत पाप आहे. खरे म्हणजे, प्रयत्न करणे हे आपल्या हातात आहे. आपण ऐकतो की, अंतकाळी जी मती तीच गती. मृत्युसमयी जशी वासना धरावी त्याप्रमाणे आपल्याला पुनर्जन्म प्राप्त होतो; तेव्हा वासनेतच आपला जन्म आणि वासनेतच आपला अंत, असे असताना तिला दूर कशी करता येईल ? एखादा मनुष्य काळा असेल तर त्याला आपले काळेपण काही घालवता येत नाही; त्याप्रमाणे वासना असणे हा मनुष्याचा एक सहज-गुण आहे, तो त्याला पालटता येत नाही. तर मग आम्हाला वासनेतून कधीच मुक्त होता येणार नाही का ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणिमात्रांपेक्षा जर काही वेगळे असेल तर चांगले काय आणि वाईट काय हे कळण्याची



बुद्धी. आपण कळून सवरूनही वासनेला, अहंपणाला आधार देतो, इथेच आपले चुकते. आपला अहंपणा इतका खोल गेलेला आहे की, आपल्याला हे सर्व माझेच वाटते : माझी बायको, माझी मुले, माझे घर. माझे माझे म्हणून किती सांगावे ! त्या माझेपणामुळेच अहंभाव वाढीला लागून, सर्व काही आपल्या मनाजोगते, आपल्याला सुख देणारे, हवेसे वाटू लागते आणि दुःख अगदी नकोसे वाटते. अर्थात् जगात कोणालाच नुसते सुख मिळत नाही. असे असूनही अहंपणाला बळी पडून सुखाच्या लालचीने मनुष्य मरेपर्यंत बरीवाईट कृत्ये करीत असतो, आणि त्याप्रमाणे त्याची वासना बनत जाते. वासना म्हणजे अभिमान, म्हणजेच मीपणा. अशा रीतीने अहंपणाच जर वासनेचे मूळ अधिष्ठान आहे, तर तो नको का घालवायला ? खरोखरच, मनुष्याचा अहंपणा इतका खोल मुरलेला आहे की, त्याचे निर्मूलन करायला तसेच सूक्ष्म अस्त्र पाहिजे. नामाइतके प्रभावी आणि सूक्ष्म अस्त्र दुसरे कोणतेच नाही. ते परमेश्वराच्या अगदी जवळचे आहे. परंतु एवढे असूनही आपण ते आवडीने, निष्ठेने घेत नाही. आम्हांला सर्व काही समजते, परंतु नामस्मरण करण्याचा आळस आपल्यात भरलेला आहे; भगवंत कर्ता आहे असे अनुसंधान जो रात्रंदिवस ठेवील त्याचाच अहंकार जाईल हे ध्यानात ठेवून आपण भगवंताचे नाम घ्यावे.

मनाने भगवंताचे होणे हे भक्तीचे मर्म आहे. आपल्याला जे पाहिजे ते त्याच्याजवळ मागावे. मागितलेली वस्तू भगवंत देईल किंवा न देईल. वस्तू दिली तर बरेच झाले, पण आपण मागितलेली वस्तू भगवंताने दिली नाही तर ती देणे आपल्या हिताचे नव्हते असे खरे मनापासून वाटावे. ही भावना वाढण्यासाठी, भगवंत दाता आहे असे लक्षात ठेवून शक्य तितके त्याचे नामस्मरण करावे.

**आजचे बोधवचन आहे - जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. श्रीराम समर्थ**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**भंगलिया चित्ता । न ये काशानें सांदितां ॥२॥**
**तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ॥३॥**
**युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥१॥**
**कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देइल भेटी ॥ध्रु.॥**
**न लगे हा लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥२॥**
**तुका म्हणे मज आणि उपाव । दिसती ते वाव नामाविण ॥३॥**
**कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥१॥**

रविवार, २ एप्रिल २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -२११

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 2 APRIL 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-211 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5


## वाचक लिहितात...



## आधुनिक भारताचं वैचारिक दैनिक... आधुनिक केसरी

आधुनिक केसरी

दैनिक आधुनिक केसरी आपल्या छत्रपती संभाजीनगर मधून गेल्या दोन वर्षांपासून प्रकाशित होत आहे, हे माहीत होतं... गेल्या आठ दिवसांपासून मी त्याचा वाचक होऊन या दैनिकाच्या प्रेमात पडलो आहे, असंच म्हणावं लागेल. सुटसुटीत मोजक्या शब्दात असलेल्या बातम्या... पेपरची अतिशय सुंदर लेआऊट डिझाईनींग... निस्पृह... निःपक्ष... बातम्या मधून जाणवला. पैशाच्या लालसेमधून कोणत्याही राजकीय पक्षांसाठी आपल्या दैनिक आधुनिक केसरीची लेखणी त्यांच्या दरबारी झिजत नसल्याचे आपल्या निःपक्षपाती बातम्यांमधून जाणवलं. यासाठी आपल्या दैनिकाच... संपादकांचे कौतुक करायला माझे शब्दही अपुरे आहेत असंच मला वाटतं. आज एखादं दैनिक काढायचं नी ते चालवायचं खूप खूप अवघड काम आहे... अशा परिस्थितीत आपणं आपलं आधुनिक केसरी दैनिक मोठ्या हिमतीने काढलं नी खूप खूप सुंदर संकल्पनेतून संपूर्ण भारतातच नव्हे तर साऱ्या जगातील मराठी वाचकांसाठी अगदी विनामूल्य उपलब्ध करून देतं अहात.आपल्या दैनिक आधुनिक केसरीचे... आपल्या सगळ्या पत्रकारांचे...संपादक महोदयांचेही अगदी मनापासून हार्दिक हार्दिक अभिनंदन... आपलं दैनिक आधुनिक केसरी फुलावं... बहरावं.. त्याच्या साहित्याचा सुगंध साऱ्या जगात दरवळावा हिच पांडुरंगाच्या चरणी मी प्रार्थना करतो... आपल्या दैनिकाचा एक रसिक वाचक...

विश्वजीत भावे,
( संचालक भावे आणि कंपनी )
छत्रपती संभाजीनगर, मो.नं.9850019109

ता.क. आपले दैनिक आधुनिक केसरी मनापासून आवडल्याने मी माझ्या ४५ ग्रुपवरील सर्व मित्रांसाठी रोज सकाळी पाठवित आहे बरं का !

## हे कोकण नव्हे



छत्रपती संभाजीनगरमधील सिडको एन- ३ परिसरातील विघ्नहर्ता गणपती मंदिरा जवळील ॲड.डी.एन. सुर्यवंशी यांच्या बंगल्यातील हे झाडफणसानी लगडलेले आहे. छायाचित्र : सुधीर कोर्टीकर, मो.नं.9765553312

## भगवान बुद्धांनीही सरकारी सुटी मान्य केली नसती

### बुद्ध पौर्णिमेला सरकारी सुट्टी मागणाऱ्याला सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**विरुधुनगर : मद्रास उच्च न्यायालयात बुद्ध पौर्णिमेला सरकारी सुट्टी द्यावी, अशी मागणी करणारी याचिका करण्यात आली होती. न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावत, अशी मागणी भगवान बुद्ध यांनीही मान्य केली नसती, असे म्हणत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावले.**



विरुधुनगर (तामिळनाडू) येथील रहिवासी एम.सी. पांडियाराज यांनी बुद्ध पौर्णिमेला सुट्टी द्यावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका मद्रास उच्च न्यायालयात केली होती. भारत आणि श्रीलंकेसह अनेक आशियाई देशांमध्ये बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. त्यामुळे बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याचे निर्देश केंद्र सरकार आणि तामिळनाडू सरकारला द्यावेत, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती टी. राजा आणि न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने ही याचिक फेटाळून लावली. बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, असे निर्देश न्यायालय देऊ शकत नाही. मुळात अशी मागणी भगवान बुद्ध यांनीही मान्य केली नसती. माझ्या जयंतीला शाळा आणि सरकारी कार्यालये बंद ठेवा, असे गौतम बुद्ध यांनी कधीही सांगितले नव्हते, असे म्हणत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सुनावले आहे.

## विमानाला चिमणीची धडक

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** विमानतळावर अलर्ट घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे विमानतळावर रुग्णवाहिका, अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आहे. आज दुपारी दिल्ली विमानतळावरील धावपट्टीवरून एका विमानाने उड्डाण केले, त्याक्षणीच एक चिमणी विमानाला धडकल्यामुळे इमर्जन्सी घोषित करण्यात आली आहे.

दिल्ली विमानतळावरून दुबईला जाणाऱ्या फेडएक्स एअरक्राफ्टने उड्डाण करताच एक चिमणी या विमानाला धडकली. त्यानंतर विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. यादरम्यान, विमानतळ प्रशासनाने अलर्टची घोषणा केली आहे. जेणेकरून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करता येईल.

## आयपीपीबीने लॉन्च केली व्हॉटसअप बँकिंग सर्व्हिस

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सध्या Airtel कंपनीचे ५जी नेटवर्क देशातील सर्वात जास्त शहरांमध्ये पसरलेले आहे. तसेच IPPB बँक देखील भारतीय सरकारद्वारे चालवण्यात येणारी बँकिंग सेवा आहे. याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ सप्टेंबर २०१८ रोजी झाली. Airtel आणि India Post Payments Bank म्हणजेच IPB ने आपल्या ग्राहकांसाठी WhatsApp बँकिंग सेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे या ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर बँकिंग सेवेचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे.

व्हाट्सॲप मेसेजिंग सोल्युशन Airtel IQ द्वारे ग्राहकांपर्यत पोचवले जाणार आहे. यामध्ये एक क्लाउड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म सर्व्हिस आहे जी ब्रँड्सना त्यांच्या ग्राहकांशी व्हॉइस, एसएमएस आणि व्हाट्सॲपवर संवाद साधण्याची परवानगी देते. एअरटेलने दावा केला आहे की व्हाट्सएपसाठी बिझनेस सर्व्हिस प्रोव्हायडर (BSP) म्हणून काम करणारी ही जगातील पहिली टेलिकॉम कंपनी आहे. एअरटेल IPPB ग्राहकांना Whatsapp वर बँकेला कनेक्ट होण्यासाठी आणि बँकिंग सर्व्हिसचा फायदा घेण्यासाठी सक्षमी करणार आहे. या सेवांमध्ये अन्य गोष्टींसाह डोरस्टेप सर्व्हिस रिक्वेस्ट अणि जवळील पोस्ट ऑफिसचा पत्ता द्यावा लागणार आहे. एअरटेल – IPPB WhatsApp बँकिंग सोल्यूशन देखील मल्टी लँग्वेज सपोर्ट तयार करण्यासाठी काम करत आहे. यामध्ये ग्राहकांना अधिक सुविधा मिळणार आहेत. म्हणजेच, देशातील ग्रामीण भागात राहणारे लोक देखील त्यांच्या पसंतीच्या भाषेत बँकिंग सेवा वापरू शकतील.

## चिमुकल्यांची अंगणवाडी पत्र्याच्या पडवीत

### यंत्रणेचे दुर्लक्ष : अहिवंतवाडी येथील खिल्लारी वस्तीतील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील वणीपासुन काही आंतरावर असणारे अहिवंतवाडी येथील खिल्लारी वस्तीवर भविष्यातील भावी पिढी अंगणवाडीची इमारत पडल्याने एका साधारण पत्र्याच्या पडवीत वर्षापासून भरते.या अंगणवाडी कडे यंत्रणेचे दुर्लक्ष झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दिंडोरी अहितवंतवाडी गट महत्त्वाचा मानला जातो. परंतु येथील खिल्लारी वस्तीवर सध्या अंगणवाडीत २० ते २५ चिमुकले आपल्या भविष्यातील यशाचे शिखरे पार करीत आहे. परंतु या चिमुकल्यानां आपल्या हक्काची अंगणवाडी इमारत पडल्यामुळे शिक्षण घेताना मुलांना तारेवरची कसरत करावी लागते. या ठिकाणी एक वर्षापुर्वी सुस्थितीतील अंगणवाडी होती. त्यात कामकाज पण सुरू होते. तसेच दुसऱ्या बाजूला नवीन अंगणवाडी बांधण्यात येत होती. परंतु बांधकाम अतिशय खराब प्रतिचे असल्याने अर्ध बांधकाम झालेले असताना भिंती पडल्या आहेत.तर एक भिंती सुस्थितीत असलेल्या अंगणवाडी इमारती वर पडल्याने ती मोडकळीस आली आहे. ऐन पावसाळ्याच्या अगोदर हा प्रकार घडला होता. त्यामुळे शेजारी प्रकाश गायकवाड यांच्या पत्राच्या पडवीत अंगणवाडी भरवली जात आहे. दिंडोरी पंचायत समिती बांधकाम विभागाची ही जबाबदारी असुन मागील वर्षात त्यांचे दुर्लक्ष झाल्याची ओरड येथील ग्रामस्थ करीत आहे. नवीन अंगणवाडीचे बांधकाम ठेकेदारांने अर्धवट सोडले आहे. यामुळे याची चौकशी करण्याची मागणी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.



आदिवासी भागातील मुलांना उघड्यावर पत्र्याच्या पडवीत शिक्षण घेण्याची परिस्थिती म्हणजे एक प्रकारे भावी पिढीचा –हास म्हणावा लागेल .त्यात उन्हाळ्याचे दिवस असल्याने पत्रे उन्हामुळे खूप तापतात .त्यामुळे अशा ही वातावरणात ही चिमुकले आपले भविष्याचे स्वप्न रंगवित आहे . एक दोन दिवसांपूर्वी परिसरातील ग्रामस्थांनी याठिकाणी एकत्र पाहाणी करून याठिकाणाची सत्य परिस्थिती समोर आली . कारण अनेक दिवसांपासून ग्रामस्थ या विषयी आवाज उठवत होते . तरी याठिकाणी या चिमुकल्यांना एक चांगल्या प्रकारांची संबंधित विभागाने दखल घेऊन अंगणवाडी इमारत बांधुन द्यावी .अन्यथा याबाबत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल .असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे . या पत्र्याच्या पडवीत मोठ्या मेहनतीने मुलांना शिक्षण देण्याचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका मीना भुसार यांचे आभार उपस्थितांनी मानले .
यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष रेहरे, ग्रा .प .सदस्य अंकुश शार्दुल, शिवाजी गांगोडे,प्रकाश गायकवाड, दीपक गायकवाड, माळे दुमालाचे मा .चेअरमन कराटे गीताबाई बहिरम,आदी नी या अंगणवाडी ची पाहाणी केली आहे .

# स्वार्थकेंद्री राजकारण




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रात लोक स्वार्थ ठेऊन वागत असतील किंवा जीवनाच्या इतर ठिकाणी स्वार्थोवृत्तीबद्दल कोणी काही बोलणार नसेल तर राजकारणात वाढत चाललेल्या या वृत्तीबद्दलही लोकांनी का बोलावे? हा खरेच विचार करण्याजोगा प्रश्न आहे. पण लोक बोलतात आणि बोलले पाहिजेत. कारण संसदीय लोकशाहीमध्ये काही बदल होवो अथवा न होवो पण लोकांमुळे दर पाच वर्षाला सरकार बदलू शकते, हे मात्र नक्की. हे बदललेले सरकार पूर्वीच्या सरकारपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळे आहे, हे सांगता येत नसले तरी बदलाची सुखात्म भावना मात्र मतदारांना हुरळून टाकण्यास पुरेशी असते.**

राजकारणी लोकांबद्दल सामान्य माणसाच्या मनात एक प्रकारची अढी, गाठ पक्की बसलेली आहे. पूर्वी राजकारण आणि राजकारण्याबद्दल बोलले जायचे पण इतके टोकाचे मात्र नाही. एकप्रकारची सहिष्णुता दोन्ही बाजूने नांदत होती, परंतु अलीकडच्या काही काळात जागतिकीकरणाच्या अनुषंगाने दोन महत्त्वाचे बदल झाले. बदलत्या तंत्रज्ञानामुळे गरिबातील गरीब माणसास राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काय चालले आहे हे सर्व अल्पावधीतच कळायला लागले. या कळण्यामुळे प्रत्यक्ष आपल्या जगण्यावर परिणाम नंतर होईल, परंतु आपली प्राप्त परिस्थिती ही आपली निर्मिती नसून धोरणकर्त्यांच्या अपयशाची फलश्रुती आहे, हे उमजू लागले. आपल्या दारिद्र्याला खोली होती हे ठाऊक होते पण व्याप्ती देखील असल्याचा साक्षात्कार मीडियामुळे झाला. आज मीडिया भांडवलदारांच्या पूर्णपणे काबूत असला तरी समाजमाध्यमातून वर्तमान परिस्थितीचे जे परीदृश्य साकार होत आहे, त्यातून जनमानस आकार घेऊ पाहते आहे. इतर देशवासीय राज्याच्या संसाधनांचा कसा उपभोग घेतात आणि आम्ही अजूनही परिघावरच कसे? या स्वरूपाचे प्रश्न सामान्य माणसास पडणे साहजिक आहे. चोवीस तास माहितीच्या महापुराचा हा एक परिणाम होय. भांडवलशहांचा, राज्यकर्त्यांचा उद्देश सफल झाला तरी प्रयोजनापेक्षा परिणाम वेगळेच आल्याने एक प्रकारची साशंकता वाढू लागली आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे शिकून बाहेर पडलेल्या पिढीच्या हाताला काम देण्यास राज्य कमी पडू लागल्यामुळे एकप्रकारची खदखद आतल्या आत धुमसत आहे. ही पिढी आपल्या पूर्वजांसारखा विचार करणारी नसून पांघरून पाहून पाय पसरण्यापेक्षा जेवढे पाय पसरता येतील तेवढे किंवा त्यापेक्षा जास्त पांघरूण कसे मिळविता येईल, या विचारांची आहे. यात या पिढीचा काही दोष नाही. कारण ज्यांच्याकडे काहीच नसताना, कफल्लकपणे आयुष्य जगणारा कोणी एक राजकारण करू लागतो, निवडून आले तर काही बोलणेच नको आणि नाहीच आला निवडून तर याच्या त्याच्या ओळखीने राजकारणाचा पदर धरून अल्पावधीतच गडगंज माया जमा करतो. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतर देखील अजूनही आम्ही गरिबी हटाव म्हणून नारा देत असू तर हे अपयश कोणाचे? लोकांचे, राज्यकर्त्यांचे की एकूणच धोरणाचे? एक कुठलासा साधा सरपंच, नगरसेवक पाच वर्षांच्या आपल्या कार्यकाळानंतर आरपार बदलून जातो तेथे आमदार आणि खासदारांच्या संपत्तीचा हिशोबच नाही. ही शेकडो कोटींची संपत्ती येते कोठून? राजकारणात पदार्पण केल्यापासून ते आजपर्यंतच्या संपत्तीचे सोशल ऑडिट का होऊ नये? पण असे होणार नाही. होऊ दिले जाणार नाही. अडीच हजार वर्षापूर्वी अखंड भारताचे स्वप्न पहिल्यांदा पाहणारा विष्णुगुप्त चाणक्य आज आधुनिक महाजनशाही अस्तित्वात येत असल्याचे पाहून दुःखी होत असेल. कारण हा भारत, हा माझा देश असे फार कमी राजकारण्यांना वाटते. ज्यांना जसे जमले त्याने तसे लुटण्याचा सपाटा लावला आहे. बेरोजगारीचा प्रश्न सर्वात मोठा प्रश्न आहे. किमान जीवनमान जगण्याच्या पातळीपेक्षा कितीतरी खाली आजचा सुशिक्षित युवक जगतो आहे. येत्या पंचवीस वर्षात भारताची महत्त्वाची ओळख असलेली कुटुंबव्यवस्था केवळ बेरोजगारीच्या प्रश्नामुळे आरपार बदललेली असेल. पारंपरिक समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीने हा



## क्षितिजापल्याड

अभ्यास करता येणार नाही. अर्थ-सामाजिक पद्धतीतूनच या प्रश्नांचा उलगडा होऊ शकतो. इंटरनेटवर भारतातील प्रसिद्ध घोटाळे असे टाईप केल्यास जी यादी आपल्यासमोर येते, ती वाचताना आपणास गुदमरून टाकण्यास पुरेशी आहे. संपत्ती संचय हे रोगी मनाचे लक्षण आहे. मुळात हा रोग सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात असतो. काहींचा आटोक्यात तर काहींचा शेवटच्या स्टेजचा, फरक काय तो एवढाच.

बरे या पैशाचे करायचे काय? हा प्रश्न कधीतरी या व्यक्तींनी स्वतःला विचारला पाहिजे. जिवंतपणी संरक्षणाची काळजी आणि मेल्यावर काहीच उपयोग नाही. पण जमवण्यात मात्र विक्षिप्त आनंद. सुखाच्या वाह्यात कल्पनेने आज सर्वांनाच असे काही भारावून टाकले आहे की, अधिकाधिक वस्तू संचय करण्यात माणूस मग्न आहे. मुळात सुख ही अत्यंत काल्पनिक आणि अस्थिर गोष्ट असताना मृगजळाच्या नादी लागून ऊर फुटोस्तोवर पळणे हे जणू मानवी जगण्याचे इंगित होय, असेच आपणांस वाटते आहे. आणि राजकारण हा मनोव्यापार असल्याने भौतिकतेची प्रकर्षाने ओढ असणे साहजिक आहे. भौतिक जगताचा मेरूमनी असणारा पैसा आणि त्याचे आकर्षण अधिकाधिक स्वार्थी बनवतो, हे सांगणे नको. परपीडा आणि परदुःख निवारणार्थ केलेले राजकारण आणि स्वार्थ नीती यात फार मोठा फरक आहे. आज प्रत्येक गोष्ट राजकारणापाशी येऊन थांबत असल्याने प्रत्यक्ष राजकारणातील व्यक्तींनी अत्यंत दक्ष वागून आचरणाचा एक वस्तुपाठ समाजास घालून द्यावा. जेणेकरून समाजाची पातळी उंचावण्यास मदत होईल. जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या अनेक योजना चालू असतात, परंतु अलीकडे हळूहळू या सर्व योजना बंद होतील आणि युबीआय नामक योजना जी जगाला भुरळ घालत आहे, ती सुरू होईल. ही युबीआय योजना काय आहे आणि तिचे स्वरूप कसे असेल हे आपण पुढे पाहणारच आहोत. सरकारचे सर्व योजनांमधून अंग काढून घेणे कदाचित त्या योजनेच्या अंमलबजावणीची सुरुवात तर नसेल? काही सांगता येत नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# धार्मिक दंगली धर्माची शिकवण आहे का ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दोन समूहामध्ये रात्रीच्या वेळेस वाद होऊन त्यामध्ये पोलिसांची वाहने पेटवून देण्यात आलेली आहेत. जातीयवाद निर्माण करून जातीय दंगलीच्या नावा खाली शासकीय मालमत्तेची हानी करणे व ते करण्यास भाग पाडणे म्हणजे नीती भ्रष्ट विचारांचे प्रदर्शन होय. जर पोलिसांच्या जोरावर आम्ही सुरक्षित राहतो. समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण होते त्याच पोलिसांवर अशा प्रकारची कृत्य करणे हे घटनाबाहे तर आहेच परंतु नीतिमत्ता भ्रष्ट झाल्याची उदाहरण देखील आहे. धार्मिक दंगलीच्या माध्यमातून कोणत्याही धर्माला आजपर्यंत ही कोणत्याही प्रकारचा फायदा झालेला नाही.**

धार्मिक दंगलीमध्ये धर्माचे नाव, धर्मातील तरुणांचे करिअर, भविष्य खराब तर होतेच शिवाय समाजाला व धर्माला त्याचाही फायदा होत नाही, मग हा फायदा नेमकं होतो तरी कोणाला? तर हा फायदा होतो राजकीय पक्षांना. थोडक्यात काय तर कोणत्याही सामाजिक धार्मिक दंगलीमध्ये जर राजकीय नेत्यांना राजकीय पक्षांना फायदा होत असेल, तर याचा अर्थ त्या दंगली मागे राजकीय पक्ष व राजकीय नेत्यांचा हात आहे. शासकीय मालमत्ता ही सर्वसामान्य जनतेच्या मालकीची असते. त्यावर प्रत्येक नागरिकांचा हक्क असतो. आणि त्याची नाशधुस करणे म्हणजे स्वतःच्याच संपत्तीची नासधूस केल्यासारखे होय. दंगलीमध्ये पोलिसांच्या गाड्या गाळाने वा पोलिसांवर चालून येणे असे जर घडत असेल, तर कायदा व सुव्यवस्था अडचणीत सापडण्याची शक्यता असते. आणि राजकीय लोक, राजकीय विरोधक याचा चुकीचा अर्थ काढून पोलिसांचे खच्चीकरण आणि दंगलखोरांना बढावा देण्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काम करत असतात. सर्वात महत्त्वाचे कोणत्याही ठिकाणी सामाजिक धार्मिक दंगल होत असेल आणि त्यामध्ये जर शासकीय मालमत्तेची हानी होत असेल तर अशा लोकांवर कठोर कारवाई करण्यात यावी. आणि एवढेच नव्हे तर दंगलखोर जाळपोळ करणारे जर राजकीय पक्षाशी संबंधित असतील, तर सरळ त्या पक्षावर कारवाई करण्यात यावी कारण नीती भ्रष्ट आणि दंगलीचे चे राजकारण करून एक मत पेटी तयार करण्यासाठी धार्मिक तेढ निर्माण केली जात असेल आणि त्यावर राजकीय पोळी भाजली जात असेल, तर हे चुकीचेच नाही तर देशद्रोह आहे. दुसरी गोष्ट स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी शासकीय मालमत्तेची नासधुस करून पोलिसांवर दबाव टाकला जात असेल, आणि जर पोलीसच असुरक्षित आहेत असं दाखवण्याचा प्रयत्न असेल, तर समाजामध्ये त्याची चुकीची दुष्परिणाम दिसून येतात. आणि म्हणून कधीही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले तर नुकसान करणाऱ्या कार्यकर्ते पक्ष व राजकीय नेते कठोर कारवाई करण्यात यावी. दंगलखोर मग ते कोणत्याही धर्माचे कोणत्याही पक्षाचे असो त्यांची मजल जर पोलिसांच्या गाड्या जाण्यापर्यंत होत असेल तर असे दंगलखोर समाजामध्ये दहशद निर्माण करून शांतता व सुव्यवस्थेचा खूप मोठा प्रश्न निर्माण करू शकतात. कोणत्याही दंगलीमध्ये शासकीय मालमत्तेची झालेली हानीवर, कोणत्याही राजकीय पक्षांनी, राजकीय नेत्यांनी त्याचे राजकारण न करता दोषींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. एवढी परिपक्वता दाखवणे आवश्यक आहे. कोणत्याही पद्धतीने सरकारने व सत्तेतील राजकीय नेत्यांनी पाठीशी घालू नये. कारण सत्ता आज आहे उद्या नाही परंतु शासन प्रशासन आणि शांतता व सुरू सुव्यवस्था ही निरंतर चालणारी एक खूप मोठी प्रक्रिया आहे. आज सत्तेत असलेले उद्या विरोधी पक्षात जातील आज विरोधी असलेले उद्या सत्ता पक्षात जातील. परंतु राजकारण करते वेळेस पेरलेले जातीचे विष, धर्माचे विष आणि त्यावर केलेल्या दंगली ह्या मात्र समाजावरती वाईट संस्कार घालणारे असतील. आणि म्हणून विषारी झाड कुणीही लावले तरी त्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील. पोलिसांना काम करते वेळेस त्यांच्यावरती कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव न देता त्यांना स्वतंत्रपणे काम करू देणे हे सुद्धा खूप गरजेचे आहे. आज बऱ्याच प्रकरणावरून, अनेक उदाहरणावरून पोलिसांवर राजकीय दबाव असल्यामुळे पोलीस निष्पक्ष पणे काम करू शकत नाहीत याची प्रचिती येत आहे. एकीकडे बेरोजगारांची वाढती संख्या आणि दुसरीकडे सत्ताधारी लोकांचा वाढता राजकीय दबाव आणि या दबावामुळे नोकरी जाण्याची भीती म्हणून काही वेळेस पोलिसांना काम करताना अनेक मर्यादा येताना दिसत आहेत. सर्वसामान्य जनतेला हे सर्व कळून चुकलेले आहे. परंतु राजकारण करणाऱ्यांनी राजकारण त्यांचे त्यांच्या पद्धतीने करावे, शासकीय मालमत्तेचे हानी करणे जे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेतात त्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल असा दबाव व घाणेरडे नीतीहीन प्रकार थांबले गेले पाहिजेत. धार्मिक तेढ आणि द्वेष संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने



महाराष्ट्र शासनाला जी चपराक दिलेली आहे. त्या चपराकी मधून महाराष्ट्र सरकारने काही चांगल्या गोष्टी शिकून राज्यात शांतता सुव्यवस्था कशी कायम राहील आणि धार्मिक दंगली च्या माध्यमातून जातीय द्वेषाला प्रोत्साहन न देता सार्वजनिक संपत्तीचे नुकसान थांबवून पोलिसांचा सन्मान कसा वाढता येईल यावर काम करणे आवश्यक आहे. जेव्हा शासकीय मालमत्तेची हानी होते तेव्हा ती मालमत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी याच जनतेच्या खिशाला प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष फटका बसलेला असतो. आणि म्हणून जातीय दंगल घडवण्यामागे ज्यांचा हात आहे त्यांच्यावर सरकारने कठोर कारवाई केली, तर असे प्रकार आपण थांबवू शकू. नाहीतर जातीय दंगलींना असे समर्थन देऊन प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्यांना प्रोत्साहन देऊन जरी कृती आपण घडवून आणत असू तर समाजामध्ये शांतता सुव्यवस्थेचा प्रश्न तर निर्माण होईलच परंतु समाजामध्ये एक दहशत निर्माण झाल्यासारखे होईल. धार्मिक दंगलीमध्ये पुढाकार घेणाऱ्या तरुणांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी. आपण जेव्हा दंगली मध्ये जातो तेव्हा जे कृत्य करतो, ते कृत्य धर्माला मान्य असते ना माणुसकीला मान्य असते. मग तो धर्म कोणताही असो. दुसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट त्या धार्मिक दंगली मध्ये आपण जातो, ज्या धार्मिक दंगली आपण ज्यांच्या मतानुसार घडवून आणतो, अशा नेत्यांचे नातेवाईक स्वतःचे मुले त्या धार्मिक दंगलीमध्ये नसतात. धार्मिक दंगल झाल्यानंतर त्यांचा आपल्याला कोणताही फायदा न होता राजकीय नेत्यांना फायदा जर होत असेल आणि त्यासाठी सर्वसामान्य तरुणांच्या जीवाची बाजी लावली जात असेल, तर हे सर्वसामान्य तरुणांच्या जीवनाशी खेळले गेलेले खूप मोठे षडयंत्र आहे. याची जाणीव धार्मिक दंगलीत सहभागी असलेल्या तरुणांना असायला पाहिजेत. जेव्हा आपण धार्मिक दंगल घडवतो ती धर्माला मान्य नसेल, धर्माच्या शिकवणी नुकसानुसार नसेल, नीतिमत्तेला धरून नसेल, तर त्यामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे की त्या दंगलीमुळे धर्माला कोणताही फायदा होणार नाही. आणि फायदा हा राजकीय पक्ष व नेत्यांना होणार असेल आणि त्यांची मुले जर त्याच्यामध्ये नसतील तर याचा अर्थ सर्वसामान्य लोकांचे जीवन धोक्यात घालून राजकीय लोकांना राजकीय पक्षांना सत्तेच्या माध्यमातून लोकांच्या रक्तासोबतच देशातील संपत्ती सुद्धा शोषण करायचे आहे. ही बाब लक्षात घ्यावी. धर्माच्या नावाखाली तरुणांनी भावनिक न होता कोणत्याही नेत्यांच्या भडकाऊ वक्तव्यांना न भुलता, धार्मिक दंगली मधून तरुणां चा व धर्मां चा कोणताही फायदा होत नसेल तर राजकारण्यांना सत्तेची पोळी भाजण्यासाठी आपण स्वतः स्वतःची जीवाची भाजी लावून आणि समाजात तेढ निर्माण करून आणि तेही धर्माच्या विरोधात जाऊ राजकीय नेत्यांना आणि पक्षांना पोसने हे नीतिमत्तेत आणि धर्माच्या शिकवणीत बसत नाही. म्हणून तरुणांनी जागृत होऊन राजकारणी लोकांची कूटनीती लक्षात घेऊन आपली मते बनवावी . धर्माचा वापर करून राजकरणाऱ्या लोकांना वठणीवर आणावे. आणि समाज हितासाठी तरुणांच्या रोजगारासाठी जो कोणी नेता आवाज उठवण्यासाठी सक्षम आहे. त्यांच्यामागे तरुणांनी उभे रहावे म्हणजेच जातीय दंगलीमध्ये तरुणांचे भविष्य खराब होणार नाही. आणि सुशिक्षित व पात्र उमेदवार तरुणांना रोजगाराच्या संधी तरी मिळतील. आणि तरुणांचे भविष्य हे उध्वस्त होणार नाही. तरुणांनी जागृत होऊन भ्रष्ट व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या राजकीय नेत्यांना धडा शिकवण्याची आज वेळ आली आहे. आणि तरुणांनी एकसंघ होऊन सामाजिक समस्या वरती सरकार विरोधात जर आवाज उठवला तर धार्मिक दंगली आणि शासकीय मालमत्तेचे हानी आपोआप कमी होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# युवा सरपंचाने उधळले दोन लाख

## गटविकास अधिकारी यांनी विहिर मंजूर करण्यासाठी पैसे मगितल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पंचायत समितीमध्ये दाखल विहिरीचा प्रस्ताव मंजूर करताना १२ टक्के रक्कम मागितली जाते, असा आरोप तालुक्यातील गेवराई पायगा येथील सरपंच मंगेश साबळे यांनी शुक्रवारी ( दि. ३१ ) दुपारी एक वाजेच्या दरम्यान पंचायत समिती कार्यालयासमोर दोन लाख रुपयांच्या नोटा उधळत अनोखे आंदोलन केले. या प्रकाराने खळबळ उडाली आहे. दरम्यान, गटविकास अधिकारी फुलंब्री यांच्या फिर्यादीवरून सरपंच साबळे यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फुलंब्री पंचायत समितीमध्ये सध्या प्रशासक राज आहे. गेल्या काही महिन्यांपासून कार्यालयात शेतकऱ्यांना सिंचन विहीर, जनावरांचा गोठा, पाणंद रस्ता अशा अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी तालुक्यातून शेतकरी पंचायत समिती कार्यालयात येतात. कामांच्या मंजुरीसाठी टक्केवारी ठरलेली आहे. या टक्केवारीने शेतकऱ्याची आर्थिक लूट केली जात आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधी लक्ष देत नाहीत परिणामी शेतकरी भरडला जात आहे. विहिरी प्रस्ताव मंजुरीसाठी देखील शेतकऱ्यांकडे १२ टक्के कमिशन मागण्यात आले आहे, असा आरोप गेवराई पायगाचे सरपंच मंगेश साबळे यांनी केला. दरम्यान गेवराई ( पायगा ) येथील गावकऱ्यांसोबत घडले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी सरपंच मंगेश साबळे यांनी हे आंदोलन केले. तब्बल दोन लाख रुपयांच्या नोटांचा हार गळ्यात घालून साबळे हे पंचायत समितीच्या कार्यालयात दाखल झाले. त्यानंतर त्या नोटा कार्यालयाच्या परिसरात उधळून लाच मागणाऱ्याा अधिकाऱ्यांच्या निषेध केला. गटविकास अधिकारी फुलंब्री यांच्या फिर्यादीवरून फुलंब्री पोलीस ठाण्यात याबाबत मंगेश सावळे यांच्यावर विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.



**गटविकास अधिकारी यांची चौकशी करण्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजनांचे आदेश** :मंगेश साबळे यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला . यानंतर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले की, गटविकास अधिकारी यांचे तात्काळ चौकशी चे आदेश देण्यात आलेले आहे . चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल .

**दोन 'बीडीओं'वर कारवाई**
येथील पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी कायम रोजगार हमीच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेत लाचखोरी करून शेतकऱ्यांची लुबाडणूक करतात . यापूर्वी तत्कालीन गटविकास अधिकारी शिवाजी माने यांना चौकशीअंती निलंबित करण्यात आले होते . वर्षभरापूर्वी तत्कालीन गटविकास अधिकारी विलास गंगावणे यांच्यावरही भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात आल्याने वरिष्ठ स्तरावरून चौकशी झाली . आता पुन्हा सरपंच मंगेश साबळे यांनी गटविकास अधिकारी ज्योती कवडदिवे यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे .

# महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर पोलीस नक्षल्यांमध्ये धुमश्चक्री

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** भामरागड तालुक्यातील कियरकोटी अबुझमाड जंगल परिसरात आज सकाळी १० वाजतापासून पोलीस नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू असून, यात एका नक्षलवाद्याला ठार करण्यात पोलिसांना यश आले. सोबतच घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य व शस्त्रसाठा जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. चकमक परिसर घनदाट जंगलाने वेढलेला असल्याने त्याठिकाणी संपर्क साधण्यास अडचण निर्माण होत असून, अजूनही चकमक सुरू असल्याचे कळते.
शनिवारी सकाळी गुप्त माहितीच्या आधारे गडचिरोली पोलिसांच्या सी ६० या नक्षलविरोधी पथकाने भामरागड तालुक्यातील छत्तीसगड सीमेवर अबुझमाड परिसरात नाक्षलविरोधी अभियान राबवले. दरम्यान, जंगलात दबा धरून बसलेल्या नक्षल्यांनी जवानांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात जवानांनी केलेल्या गोळीबारात एक नक्षलवादी ठार झाला. तसेच घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठासुद्धा जप्त करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी याबाबत अधिकृत दुजोरा दिला असून, चकमक अद्याप सुरू असल्याचे कळते. त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतो.



# जेष्ठ नागरिक रत्नाकर आप्पा चोपडे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जेष्ठ नागरिक रत्नाकर आप्पा रामूआप्पा चोपडे ( वय ७५ ) वर्षे यांचे शनिवार रोजी दि.१ एप्रिल २०२३ सकाळी ८.०० वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार घेत असताना अल्पशा आजाराने निधन झाले. राजकिय क्षेत्रात त्यांचा चांगलाच दबदबा होता. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा सरपंच शिवाआप्पा चोपडे यांचें ते थोरले बंधू होते. त्यांच्या पार्थिवावर १ एप्रिल २०२३ शनिवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता सावळदबारा येथील स्मशानभूमीमध्ये त्यांचा अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी सावळदबारासह परिसरातील व छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, नाशिक, भुसावळ,प्रिंपी, नांदुरा,वाशिम, सोयगाव, फर्दापूर फत्तेपूरसह मान्यवर मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, तीन बहिणी,मुली, सुना,पुतणे सुन, नातवंडे, जावई असा खूप मोठा परिवार आहे. सावळदबारा येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश आप्पा चोपडे व पत्रकार दिनेश आप्पा चोपडे यांच्या ते वडील होत.




महाराष्ट्र Business Katta












# लोककल्याणकारी राज्य- रामराज्य



संदीप ढाकणे
संपर्क क्र.: 7588512467

आधुनिक केसरी

**चैत्र शुद्ध नवमी, या चैत्रातील नवव्या दिवशी प्रभू श्रीरामाचां जन्म झाला. हा दिवस रामनवमी म्हणून साजरा करण्यात येतो. प्रभू श्रीरामांनी रावणाचा वध करून लंका जिंकून घेतली. आणि श्रीरामचंद्र जेव्हा सीतेसह अयोध्येला परतले. तेव्हा सर्व अयोध्यावासी आनंदी झाले. श्रीराम प्रभु अयोध्येत आले तेंव्हा अयोध्यावासी भक्तांच्या आनंदाला उधाण आले. कारण आता रामराज्याला सुरूवात होणार होती. लोककल्याणकारी राज्य म्हणजे "रामराज्य." अशा या रामराज्याची महती संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात सांगतात.**

**झाले रामराज्य काय उणे आम्हासी |**
**धरणी धरी पिक गाई ओळल्या म्हशी ||**
**राम वेळोवेळा आम्ही गाऊ ओविये|**
**दळीता कांडिता जेविताग़े बाइये ||**
**स्वप्नीचे दुःख कोणी न देखे डोळा |**
**नामाचा गजर भय सुटला कळीकाळा ||**
**तुका म्हणे रामे सूख दिधले आपुले |**
**तया गर्भ वासा येणे जाणे खुंटले ||"**

"पंचज्ञानेंद्रिये, मन,चित्त,बुद्धी आणि अहंकार यांच्यावर ह्रदयातील रामाचे राज्य असणे."हे खरे रामराज्य आहे.संतानी आपल्या विविध अभंगात या रामराज्याचे वर्णन केले आहे.

राम राज्यात कोणास दुःख नव्हते . अर्थात सर्व प्रजा सुखी होती. भूमी भरपूर अन्नधान्य देत होती . वेळेवर पाऊस पडत होता.गायी म्हशी भरपूर दुध देत होत्या , सर्व ऋतू अनुकूल होते.

**संत तुलसीदासांच्या भाषेत रामराज्य म्हणजे -**
**दैहिक दैविक भौतिक तापा | रामराज नाही काहुही व्यापा | सब नर करही परस्पर प्रीती | चलहि स्वधर्म निरत श्रुति नीती | चारिऊ चरण धर्म जगमाही | पुरी रहा सपनेहु अघ नाही |**

अर्थ असा कि - राम राज्यात आदि भौतिक अध्यात्मिक आदिदैविक हे तिन्ही ताप नव्हते.सर्व जन एकमेकांवर प्रेम करीत होते.सर्व जन स्वधर्माने,नीतीने वर्तन करत होते. भगवान श्रीरामचंद्र प्रभु एक दिवस सुर्यास्ताच्या वेळी कौसल्या व आदिमातांसह आपल्या राजमहालात बसले होते. तेव्हा प्रभू म्हणतात. कौसल्यामाई आता मी अयोध्येचा राजा झालो आहे. माझे कर्तव्य आहे की माझ्यापेक्षा लहानांना काहीतरी द्यावे.

प्रभूनी सर्वांनी काहीतरी मागावे. म्हणून आपला प्रस्ताव सर्वासमोर माडंला. पहिला नबंर आला तो भरतजींचा. भरतजी प्रभूच्या समोर येताच ड़ोळे आनंदाश्रूने ड़बड़बले व ते म्हणले, "प्रभू,आपल्या चरणाजवळच मला सेवेची संधी दया." प्रभू श्रीराम "तथास्तु " म्हणाले.

आता भरतजीचीं पत्नी माड़वी प्रभूला नमस्कार करून मागणी करते, "प्रभू,रघुकूळात पुत्रवधू बनण्याचे सौभाग्य मिळाले आता आणखी कोणतीही इच्छा नाही." प्रभू श्रीराम "तथास्तु" म्हणाले.

आता लक्ष्मणजी भगवंताचे चरणस्पर्श करून मागणी करतात. "प्रभू,बालपणापासून आपली साथ मिळाली. जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपली सोबत मिळावी.एवढीच इच्छा." प्रभू श्रीराम "तथास्तु " म्हणाले. लक्ष्मणजीच्या धर्मपत्नी उर्मीला यांनी प्रभूला विनम्र भावाने वंदन करत मागणी केली.

"प्रभू,कोणतीही कठीण परिस्थिती आली तरी माझा संयम ढळू देऊ नका. प्रभू श्रीराम "तथास्तु" म्हणाले.

आता शत्रूघ्नजी प्रभू श्रीरामासमोर मागणी करतात,



"प्रभू,मला आपले प्रिय भक्त भरत यांच्या सेवेची संधी द्यावी." प्रभू श्रीराम "तथास्तु "म्हणाले.

आता रघुकूळातील शेवटचे पात्र शत्रूघ्नजींची धर्मपत्नी श्रूतकिर्ति मागणी करण्यासाठी समोर आली,

"प्रभू,जे मी मागणार ते आपण दयाल का ?"

तेंव्हा प्रभू श्रीराम म्हणतात, "रघुकूल रित सदा चली आयी, प्राण जाय पर वचन न जायी" श्रूतकिर्ति भगवंताकड़े मागणी करते. "प्रभू, आपण अयोध्याला आले, आपला राज्याभिषेक झाला, आपण जेंव्हा अयोद्धेला आले तेंव्हा स्नान केले व राजपोषाख परिधान केला. प्रभूजी,चौदा वर्ष आपण जी वल्कले वनवासात पोषाख म्हणून वापरली ती मला प्रसादाच्या रूपात पाहिजे. श्रूतकिर्तिचे हे शब्द ऐकून प्रभू श्रीरामचंद्रासह सर्वच आश्चर्यचकीत झाले. श्रूतकिर्ति प्रभूला म्हणते, "प्रभू, वल्कले मागणे हास्यास्पद वाटू शकते. परंतु जीवनात कधी वनवास येईल कोणाला माहित ? आज जे सुख मिळत आहे. त्या सुखात जीवनातील वाईट काळ विसरला जाऊ नये.याचे कायम स्मरण राहावे. म्हणून मला वल्कलेच द्यावीत.

प्रभू श्रीराम रघुकूळातील वयाने सर्वात लहान परंतु विचाराने सर्वात मोठ्या असलेल्या श्रूतकिर्तिकेच्या हाती वल्कले सोपवितात. ही खरी रामराज्याची व्याख्या असावी. रामराज्य आत ह्रदयात यायला हवे.

रामाला आपली जन्मभूमी अतिशय प्रिय होती. वालीला मारल्यानंतर किष्किंधाचे राज्य सुग्रीवाला आणि रावणाला मारल्यानंतर लंकेचे राज्य रामाने बिभीषणाला दिले होते. परंतु, रामाला या राज्याचा मोह झाला नाही. 'दूर्लभं भारते जन्म' ज्या भूमीत जन्म दुर्लभ आहे, त्या भूमीत जन्म मिळाल्यावरच तेथील महानता समजेल ? म्हणून रामनवमीच्या निमित्ताने राम चरित्र समजावून ते अंगीकारण्याचा आपला प्रयत्न असला पाहिजे.

# एप्रिल फूल



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**१ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फुल म्हणून साजरा केला जातो. फुल म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फुल करण्याचा आनंद यापण सगळ्यांनीच लुटला असेल.**

एप्रिल फुल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही.

याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख ( FOOL ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फुल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फुल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारततही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फुल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फुल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फुल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फुल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फुल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फुल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फुल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फुल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिलफुल करावे. मोठेपणाला एप्रिलफुल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिलफुल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

# आजी

आधुनिक केसरी



निवांतपणा तसा कुणाला आवडत नाही सगळ्यांनाच तो हवाहवासा वाटत असतो पण अंगणातल्या सायलीच्या वेलीला मात्र तो निवांतपणा काहीसा रुचत नव्हता ती सारखी आपली माझ्या कडे पाहत होती जणू काही ती काही सांगू पाहत होती आज तिची आजी रामाघरी जाऊन २ वर्ष झाली ती फार लहान असेल तेव्हा आजीन तिला घरी आणल लहानच मोठ केल आजी तिला रोज सकाळी मायेने आंजारायची गोंजारायची सायली बाई नीट रहा गं जरा सारख अस जास्त वर वर वाढू नये तुझी आजी छोटी आणि तू आभाळात जाशील मग आजीला कशी भेटशील म्हणत हसायची आजीन तिला २० वर्ष सांभाळली कधी एक पान ही कुणाला तोडू दिल नाही कि फवारू दिल नाही तसा आजीचा तिच्यात फार जीव .. आजी गेली यावर तिचा अजून विश्वास बसत नाही ती रोज आजीची सकाळी वाट पहाते कि आजी त्या घरातून बाहेर येईल किंवा दुपारी पोत घेऊन तिच्या आळ्यापाशी येऊन घटकाभर पडल आणि सायली तिला मायेने सावली देईल.

आजी गेली मात्र त्या सायलीच्या फुलांच्या सुगंधात तिच्या मायेचा गंध मला पुरेपुर मुरलेला दिसतो त्या सायलीच्या वेलीला काय सांगायच हे मला तिचे फुल हातात घेऊन कळाल कि मी नसले असले तरी एका जीवान रहा माझी आठवण आल्यास सायली जवळ बस ती आणि तू सारख्याच ..

सायली आता मोठी झाली, तिच्या मुळ्यांपासून फुलांपर्यंत ती आजी च्या मायेला घेऊन वार्यासोबत डोलते आणि तिच वार्याची झुळूक स्पर्शून गेली म्हणजे आजीच मायेचा हात डोक्यावर फिरून गेली आहे अस वाटत...

**- प्राजक्ता रविंद्र मनवेलीकर**

# अविवाहित तरुणांना भेडसावते लग्नाची समस्या

आधुनिक केसरी

वय वाढत चालले आहे. अनेक ठिकाणी प्रयत्न करूनही लग्न जमत नाही. अनेक वधू-वर सूचक मेळावे पालथे घालून झाले आहेत. उपास तापास,नवस करूनही झाले आहेत. तरी अजूनही आमचे लग्न जमत नाही. आमचे हात कधी



प्रशांत जा. खामकर
९९७०४२३२०४

पिवळे होणार ? असा प्रश्न वय वाढत चाललेल्या तरुणाईला भेडसावत आहे. सन १९९० सालाच्या आसपास मोठ्या प्रमाणात सोनोग्राफी सेंटर उघडण्यात आली. त्या ठिकाणी अनेकांनी भ्रूण लिंग परीक्षण करून घेतले. मुलीचा गर्भ काढून टाकण्यात आला. मोठ्या प्रमाणात स्त्री भ्रूण हत्या झाली. त्याचा परिणाम आज तरुणाईला भोगावा लागत आहे. लग्नाच्या वयातील मुलींची संख्या कमालीची घटली. त्याचाच परिणाम आज कित्येक तरुण लग्नाच्या प्रतीक्षेत आहेत. कोणी आम्हाला बायको देता का..बायको ? असा आर्त टाहो फोडण्याची वेळ कित्येक तरुणांवर आली आहे. आज प्रत्येक गावामध्ये वयाच्या बविसाव्या वर्षांपासून ते वयाच्या ३८ वर्षांपर्यंतचे शेकडो तरुण आपले लग्न कधी जमेल या प्रतीक्षेत आहेत. लग्न जमत नसल्याने अनेक तरुण वाईट मार्गाला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



लग्न जमत नसल्याने अविवाहित तरुणांनी नुकताच चक्क सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर बँडच्या तालावर, वाजत-गाजत घोड्यावर बसून मोर्चा काढला. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शासनाने आमच्या प्रश्नांकडे लक्ष घालून आमचेही दोनाचे चार हात करावे अशी त्यांची मागणी होती. आज एक हजार मुलांमागे असणाऱ्या मुलींचे प्रमाण ८४० आहे. याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न पडतो. जे उच्च विद्या विभूषित आहेत. ज्यांना कंपन्यांमध्ये मोठे पॅकेज आहे. घरी ४०-५० एकर जमीन आहे. मोठा बँक बॅलन्स आहे. अशा मुलांची लग्ने त्वरित जुळतात. परंतु ज्यांचे शिक्षण अल्प आहे. जे बेकार आहेत. गरिबी ने त्रस्त झाले आहेत अशांचा विवाह जमत नाही . विवाह जमवून देतो असे खोटे आश्वासन देणाऱ्या अनेक टोळ्या सध्या सक्रिय झाल्या आहेत. अडलेल्या तरुणाला हेरून त्याच्या घरच्यांकडून लाखों रुपये रक्कम लग्न जमविण्याच्या बोलीवर घेतले जातात. लुबाडण्यासाठी सक्रीय असणाऱ्या टोळीशी संपर्क साधून खोट्या नवरीशी विवाह लावून दिला जातो. नवविवाहिता दोनच दिवसांमध्ये अंगावरील व घरातील दागिने,पैसे घेऊन फरार होते .पुन्हा सापडत नाही. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान लग्नाळू तरुणाचे होते. अशा अनेक घटना समाजामध्ये घडत आहेत. त्यातील मोजक्याच टोळ्या पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. बदनामी टाळण्यासाठी अनेक जण फसवणूक झालेली असतानाही तक्रार करण्याचे टाळतात . वधू-वर सूचक मेळाव्यांची हजारो रुपये फी देऊन लग्नाळू कंटाळून गेले आहेत.तरीही लग्न जमत नाही. लग्न जमविण्याचा संबंध पैशांशी येतो. अशावेळी बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी शासनाने उपलब्ध करून दिली पाहिजे. केवळ नोकरदार मुलांच्या पाठीमागे मुलीच्या पालकांनी न धावता ; निर्व्यसनी, कष्टाळू, प्रामाणिक , अभ्यासू, हुशार व कर्तुत्ववान मुलांच्या हातात आपल्या मुलीचा हात द्यावा. शहरात दहा ते पंधरा हजार रुपये दरमहा पगारावर काम करणाऱ्या मुलांपेक्षा ग्रामीण भागातील आदर्श शेती करणाऱ्या, व्यवसाय करणाऱ्या मुलांचा प्राधान्याने विचार मुलींनी केला पाहिजे. ऐन तारुण्य वधूच्या शोधासाठी घातल्यावर संसार नेमका कधी करायचा ? असाही प्रश्न त्यामुळे निर्माण होतो. हुंडा नको मामा फक्त तुमची पोरगी द्या मला.. या आशेवर अनेक लग्नाळू मामाचे उंबरे झिजवत आहेत. देव करो आणि त्यांचे लग्न जमो.

# शांताबाई शेळके यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यातील रसिकप्रिय ,प्रतिभा संपन्न कवयित्री ,लेखिका, प्राध्यापिका, गीतकार व प्रत्येक साहित्यप्रकारावर आपला अमिट ठसा उमटवणाऱ्या बहू आयामी व्यक्तिमत्व म्हणजेच शांताबाई शेळके होत. त्यांचा जन्म 12 ऑक्टोबर 1922 रोजी झाला. मुंबईतील महर्षी दयानंद महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून त्यांनी कार्य केले. अनेक पुस्तके व अनेक पुरस्कारांच्या मानकरी असणाऱ्या शांताबाईंनी आळंदी येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले होते. अनेक विषय व आशयाची कविता गाणी त्यांनी लिहिली. त्यांच्या १९७५ साली प्रकाशित झालेल्या 'गोंदण'या काव्यसंग्रहात काही माहेराच्या आठवणी व्यक्त करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत.**

या कवितांमधून शांताबाईंनी आपल्या माहेरची माणसं व एका सासुरवाशीनीला असलेली माहेरा विषयीची ओढ व्यक्त केली आहे.

'मालण'या या कवितेत शांताबाई म्हणतात,

**गोरी मालण**
**उभी राहिली खिडकीपाशी कठड्यावर टेकून कोपरें**
**ओंजळीत मुख घेऊन अपुलें क्षितिजा वरती जडवून डोळे**
**बघते आहे वाट कधींची गणगोताची**
**माहेरींच्या गणगोताची.**

माहेराहून कोणीतरी भेटीसाठी येईल म्हणून प्रत्येक सासुरवाशीन आतुर असते. कवितेच्या वरील ओळीत एक मालण म्हणजेच सासुरवाशीन माहेराहून कोणी येईल म्हणून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली आहे. खिडकीपाशी उभे राहून ती माहेरच्या गणगोताची वाट पाहत आहे. पुढे कवयित्री म्हणतात,

पुढें चालली वाट लागते सहज उलगडूं
धावत जाते मन तिजसंगे आणि पोचतें माहेराला
धापा टाकीत आईच्या छातीला बिलगुन
गिळूं लागतें कोसळणारें रडें अनावर,

सासुरवाशीन जेंव्हा सासरी असते तेंव्हा तिला तिच्या माहेरची वाट अगदी सहज दिसते व तिचे मन जणू काही त्या वाटेने धावत जाऊन धापा टाकत आईच्या छातीला बिलगते ,आईच्या कुशीत जाताच तिला रडू अनावर होते. असे वर्णन कवयित्री करतात. पुढे या सासुरवाशीनीला सागरगोटे ,काचापाणी, भातुकली मधली ती राजा राणी सारे काही आठवते. तिला आठवते बालपणी आईने पहिल्यांदा तिला नेसवलेली साडी.शांताबाई पुढील ओळींमध्ये म्हणतात,

**असंख्य चित्रे नजर लागते पुन्हा न्याहाळू**
**तनु बाळसेदार गोजिरी**
**आईच्या हाताने तिजला नेसवलेली**
**पहिली चुनडी**
**फुलाफुलांची**



माहेराहून येणाऱ्या गणागोताची वाट पाहणाऱ्या सासुरवाशीन विषयी शेवटच्या ओळींमध्ये कवयित्री म्हणतात,

**नसे यायचें तसें कुणीही**
**कुणी न धाडिला**
**सांगावाही**
**तरी उभी खिडकीशीं**
**मालन कठड्यावर टेकून**
**कोपरे ओंजळीत मुख**
**घेऊन अपुलें**
**बघत रहाते वाट सारखी गणगोताची माहेरींच्या गणगोताची**

शांताबाईंनी 'आजोबा 'या कवितेत सत्तरी पार केलेल्या आपल्या आजोबांचे वर्णन केले आहे. ते असे,

**आजोबांचे वय आतां सत्तरीच्या पार गेलें**
**उभे आयुष्य पिकून फळ गळावया आलें**
**जुना कसदार देह बळकट अंगकाठी**
**किती पाहिले.... भोगिलें.. सांगे भाळावर आठी.**

वयाची सत्तरी पार केलेले आजोबा आता खूप थकले आहेत. जसे एखादे फळ पिकले की, ते आपोआप खाली पडते तसे त्यांच्या जीवनाचे आता काही खरे नाही. परंतु त्यांचा देह अजूनही बळकट आहे. त्यांनी जीवनात केलेला संघर्ष त्यांच्या कपाळावरील आठयांवरून दिसतो. पुढे त्या म्हणतात,

**अलीकडे रात्र रात्र दिव्यामध्यें जळे वात**
**जागणाऱ्या वार्धक्याला गाथापोथीची सोबत**

जसं जसं वय वाढत जातं तशी झोप कमी होते. त्यामुळे रात्री जेंव्हा झोप येत नाही तेंव्हा आजोबा गाथा पोथी वाचतात. खूप कष्ट करूनही शेवटी हातात काहीच आले नाही तरी आजोबांच्या ओठावर सर्वांसाठी आशीर्वादच आहेत. पुढील ओळीत कवयित्री म्हणतात,

**तरी आजोबांच्या मनी काही नाही खळमळ साऱ्यांसाठी**
**ओठावर आशीर्वादच केवळ** आजोबां इतकाच कवयित्रींना आजीचाही खूप लळा दिसतो. आपल्या 'पैठणी' या कवितेत त्यांनी आजीच्या आठवणीं व्यक्त केल्या आहेत. त्या म्हणतात,

फडताळात एक गाठोडें आहे त्याच्या तळाशी अगदी खालीं
जिथे आहेत जुने कपडे कुंच्या, टोपडी, शेले, शाली
त्यातच आहे घडी करून जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर, जरी चौकडी, रंग तिचा सुंदर धानी.

वरील ओळींमध्ये कवयित्रींनी वर्षांनुवर्षे फडताळात जपून ठेवलेल्या आजीच्या लग्नातील पैठणीचे वर्णन केले आहे. बरेचसे जुने कपडे असलेल्या गाठोड्यात घडी करून ती पैठणी ठेवली आहे व धानी म्हणजेच हिरव्या रंगाच्या या पैठणीचा पदर नारळी, चौकडी जरीचा आहे. पुढे कवयित्री म्हणतात, माझी आजी लग्नामध्यें ही पैठणी नेसली होती पडली होती साऱ्यांच्या पायां हाच पदर धरून हातीं


शांताबाईंच्या आजींनी लग्नात हीच पैठणी नेसून पदर हातात धरून सर्वांना नमस्कार केला होता व ती पैठणी अनेक वर्ष झाले तरी अजून जपून ठेवली असुन, तिने आजीचे तन -मन जपले आहे. तिला धूप, कापूर व उदबत्त्यांचा सुवास असल्याचे त्या सांगतात. पुढील ओळीत कवयित्री म्हणतात, पैठणीच्या घडीघडींतून अवघें आयुष्य उलगडत गेलें अहेवपणी मरण आलें, आजीचे माझ्या सोनें झाले.

कोणत्याही स्त्रीला अहेवमरण येणे हे खूप भाग्याचे मानले जाते. आजीलाही तसेच मरण आले. त्यामुळे आजीची सोने झाल्याचे कवयित्री सांगतात. शेवटच्या ओळीत शांताबाई म्हणतात,

**कधीतरी ही पैठणी मी धरतें उरी कवळून**
**मऊ रेशमी स्पर्शामध्यें आजी भेटते मला जवळून**
**मधलीं वर्षे गळून पडतात; कालपटाचा जुळतो धागा**
**पैठणीच्या चौकड्यांनों, आजीला माझें कुशल सांगा.**

पैठणीच्या स्पर्शातून कवयित्रीला आजी भेटल्याची जाणीव होते व मी कुशल असल्याचे माझ्या आजीला सांगा असे त्या पैठणीच्या चौकड्यांना म्हणतात. अशाप्रकारे कवयित्री शांताबाई शेळके यांनी आपल्या वरील कवितांमधून माहेरच्या काही आठवणी व्यक्त केले केल्या आहेत. या थोर कवयित्रीने ६ जून २००२ रोजी या जगाचा निरोप घेतला. "आपल्या असेल मी नसेल मी तरी असेल गीत हे" या प्रसिद्ध गीताप्रमाणे त्या आपल्या चिरंतन स्मरणात राहतील.

# रामायणाचा प्राण हनुमान




अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**राम रावण युद्धामध्ये एके दिवशी रावण पुत्र इंद्रजीत मोठा पराक्रम दाखवतो. त्याच्या पराक्रमामुळे वानर सैन्याचा खूप मोठा संहार होतो. त्यादिवशी इंद्रजीत ब्रह्मास्त्राचा प्रयोग करतो. ब्रह्मास्त्राचा आदर म्हणून राम-लक्ष्मण ब्रम्हास्त्राला नमस्कार करतात व युद्ध करणे थांबवतात. ब्रह्मास्त्राच्या प्रभावामुळे राम आणि लक्ष्मण दोघेही मूर्च्छित होऊन पडतात. संपूर्ण सैन्यांमध्ये हाहाकार माजतो आणि अशा प्रकारे तो दिवस संपतो. खूप मोठा संहार झालेला असतो. आपल्याकडील कोण कोणते वीर हे वीरगतीला प्राप्त झाले, कोण कोण जखमी आहे हे पाहण्यासाठी विभीषण आणि हनुमान मशालीच्या उजेडामध्ये धारातीर्थी पडलेल्या वीरांना शोधायला निघतात.**

यामध्ये त्यांना प्रामुख्याने जांबुवान यांना शोधायचे असते. या सर्व वीरांना शोधता शोधता त्यांना एका ठिकाणी ज्यांचे शरीर बाणांनी क्षतविक्षत झालेले आहे, ज्यांच्या शरीरामध्ये अनेक बाण शिरलेले आहेत, असे धारातीर्थी पडलेले जांबुवान दिसतात. त्या जांबुवानाला पाहून विभीषण म्हणतो की आर्य इतक्या सगळ्या बाणांच्या प्रभावामुळे आपण हा देह सोडून तर गेला नाही ना. त्याचे शब्द ऐकल्यावर जांबुवान म्हणतो की मी डोळे सुद्धा उघडू शकत नाही. तरीही तुमच्या आवाजावरून मला हे कळले की तुम्ही विभीषण आहात. अशा प्रकारे जांबुवान विभीषणाला विचारतात तो अमित पराक्रमी हनुमंत जिवंत आहे का ? त्याला काही झाले का ? अशा पद्धतीच्या प्रश्न जांबुवान विचारतात हा प्रश्न एकूण विभीषणाला खूपच मोठे आश्चर्य वाटते. आणि त्याही परिस्थितीत विभीषण जांबुवानाला विचारतात की आर्य आपण राम सकुशल आहेत की नाही ? लक्ष्मण सकुशल आहेत की नाही ? सुग्रीव सकुशल आहेत की नाही ? असे विचारले नाही. परंतु आपण हनुमान सकुशल आहे की नाही हे विचारले आहे. या मागचे कारण काय ? त्याचे हे बोलणे ऐकून जांबुवान म्हणतात की आपले सैन्य जरी उभे असेल पण हनुमान जर त्यात नसेल तर आपण सगळे मृत्यू पावल्यासारखेच आहोत. आणि जर आपल्या सैन्याचा संहार झाला आणि तरीसुद्धा जर हनुमान आपल्या मध्ये असेल तर आपण जीवितच आहोत असा याचा अर्थ आहे. हे वाक्य हनुमानाने ऐकले. हनुमान जांबुवाना प्रणाम करतो. आणि जांबुवान त्याला म्हणतात की हिमालयावर वृषभ नावाचा पर्वत आहे. त्याच्या बाजूला कैलास पर्वत आहे. या दोघांच्या मधोमध अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती असलेला पर्वत आहे. त्या पर्वतावरून मृत संजीवनी, संधानी, सुवर्णकरणी, विशल्यकरणी या वनस्पती तू घेऊन ये. दुसरा दिवस उजाडायच्या आत व पुन्हा युद्ध सुरू होण्याच्या आत हनुमंताला तिथे जाऊन त्या वनस्पती घेऊन यायचे असते हनुमंत वायू वेगाने हिमालयावर जातो व तेथे त्या पर्वतावर जातो. त्या सर्व वनस्पती चम चम करीत प्रकाशमान झालेल्या असतात. परंतु आपल्याला कोणीतरी न्यायला आलेले आहे हे पाहून त्या चमकणे बंद करतात. जसे लाजाळूचे झाड त्याला स्पर्श केल्यास आकुंचन पावते म्हणजे लाजते. त्याप्रमाणे त्या वनस्पती आपले चमकणे बंद करतात. त्यामुळे हनुमंताला त्यातल्या नेमक्या कोणत्या वनस्पती घेऊन जायचे आहे याबद्दल संभ्रम निर्माण होतो. वनस्पतींनी आपले चमकणे बंद केले आहे हे बघून हनुमान रागावतो व हिमालयाला म्हणतो हे नगेंद्र मी राम कार्यासाठी येथे आलेलो आहे व जर तू मला अशा पद्धतीने वनस्पती देणार नसेल तर मला हा पर्वतच उचलून घेऊन जावा लागेल. असे म्हणून हनुमान वनस्पती असलेला पर्वताचा तुकडा पूर्णपणे उचलतात व वायू वेगाने जेथे युद्ध सुरू आहे तेथे तो घेऊन येतात. वनस्पतींच्या वासाने राम आणि लक्ष्मण यांची मूर्च्छा समाप्त होते. जे जे वानर वीर गतप्राण झालेले होते तेही जीवित होतात. ज्यांच्या शरीरावर अनेक जखमा झालेल्या आहेत त्यांच्या जखमा बऱ्या होतात व हे सर्व वीर पुन्हा एकदा लढायला सिद्ध होतात. यावरून आपल्याला हनुमंताचे मोठेपण लक्षात येते. राम आणि लक्ष्मण सीतेचा शोध करीत वनात फिरत असताना सर्वप्रथम हनुमंतालाच ते दिसले होते. सुग्रीवा च्या आज्ञेवरून हनुमंतांनी राम आणि लक्ष्मण यांच्याशी संभाषण केले व त्यांचा हेतू जाणून घेतला.पुढे राम आणि सुग्रीव यांची मैत्री हनुमंताच्या मध्यस्थीमुळे झालेली होती.

पावसाळा समाप्त झाल्यानंतर मी वानरांना सीतेच्या शोधा करता पाठवील अशा प्रकारच्या आपल्या आश्वासनाचे विस्मरण सुग्रीवाला होते. व पावसाळा संपून गेल्यावरही तो वानरांना सीतेच्या शोधार्थ पाठवत नाही. त्यावेळेला लक्ष्मण रागावतो व किष्किंधा नगरीच्या द्वारापाशी येऊन उभा राहतो. भोग विलासांमध्ये बुडालेल्या सुग्रीवाला लक्ष्मण पाहतो त्यावेळेला त्याचा क्रोध अनावर होतो. त्यावेळेस सुद्धा हनुमान त्याला सांगतो की सुग्रीव हा वानर आहे. वानर हे अशाच पद्धतीचे असतात. त्यामुळे तू रागावू नको. हनुमंताला त्याच्या शक्तीचे विस्मरण झालेले होते. त्यामुळे सर्व वानर ज्या वेळेला समुद्राच्या किनाऱ्यावर किंकर्तव्यमूढ होऊन बसलेले होते त्यावेळेस जांबुवान हा हनुमंताला त्याच्या शक्तीची आठवण करून देतो व त्यानंतर हनुमंत समुद्र ओलांडण्यासाठी उड्डाण करतो. व्यक्तीला त्याच्या शक्तीची, सामर्थ्याची आठवण करून दिली गेली पाहिजे म्हणजे कठीण काळात सुद्धा तो उत्तम पराक्रम गाजवू शकतो हे हनुमंताच्या उदाहरणावरून आपल्या लक्षात येते. रावणाला भयग्रस्त करण्यासाठी तो अशोक वाटिकेचा विध्वंस करतो. रावणानी पाठविलेल्या किंकर जातीच्या राक्षसांचा तो समूळ विनाश करतो. रावण पुत्र अक्ष कुमार यालाही ठार मारतो. रावणाच्या पाच सेनापतींनाही ठार मारतो. परंतु इंद्रजीताशी लढताना इंद्रजीत ज्यावेळेला हनुमंतावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग करतो त्यावेळेस मात्र हनुमंत त्या ब्रह्मास्त्राला नमस्कार करून त्याचं बंधन स्वीकारतो. ब्रह्मास्त्राने बद्ध झाल्यावर सुद्धा राक्षस त्याला दोरखंडाने बांधतात व धक्के मारत त्याची वानर म्हणून हेटाळणी करीत त्याला रावणापुढे नेऊन उभे करतात. वास्तविक पाहता राक्षसांनी त्याला दोरखंडानी बांधल्यावर हनुमंत ब्रह्मास्त्राच्या प्रभावातून मुक्त झालेला असतो. तरीही तो राक्षसांचे धक्के, त्यांनी वानर म्हणून केलेली हेटाळणी सहन करतो. कारण त्यामध्ये सुद्धा त्याला रावणाची भेट होण्याची शक्यता वाटत असते. रामाचा दूत म्हणून रामाचे म्हणणे रावणाला सांगायला आपल्याला मिळेल या भावनेने हनुमंत तो अपमान स्वीकार करतो. एखादे मोठे कार्य करताना मान आणि अपमान हे समोर येणारच. परंतु आपले ध्येय जर निश्चित असेल, ते जर आपल्या डोळ्यासमोर असेल तर वाटेमध्ये आलेले अपमान सुद्धा पचविण्याचे सामर्थ्य माणसाने दाखविले पाहिजे. हे हनुमंताने आपल्याला दाखवून दिलेले आहे. हनुमंत भाषणामध्ये सुद्धा कुशल होते. ते रावणाला त्याच्या महानतेची जाणीव करून देतात व सीतेला परत करण्यासाठी सांगतात. परंतु रावण ते ऐकत नाही व हनुमंताला रावण म्हणतो की आता मी तुझा शिरच्छेद करतो. त्यावेळेस हनुमंत त्याला म्हणतो की एक रावण नाही तुझ्यासारखे कोटी रावण सुद्धा माझं काहीही करू शकत नाही. यावरून हनुमंताचा त्याच्या शक्ति बद्दलचा आत्मविश्वास आपल्या लक्षात येतो. चांगले चांगले शक्तिशाली लोक सुद्धा कठीण प्रसंग आल्यावर भयग्रस्त होतात. त्यांना त्यांच्या शक्तीचे विस्मरण होते. परंतु हनुमंताचा आत्मविश्वास पाहिल्यावर आपणही संकटकाळी आत्मविश्वास कायम ठेवला पाहिजे हे आपल्या लक्षात येते. राक्षस हनुमंताच्या शेपटीला आग लावतात व त्याला नगरभर फिरवितात. शेपटीला लावलेली आग हे हनुमंतावर आलेलं संकट आहे. परंतु त्या संकटाचा सुद्धा रामकार्यासाठी उपयोग करण्यासाठी हनुमान आपले विशाल रूप धारण करतो व संपूर्ण लंका नगरीमध्ये रावणाचा, प्रहस्ताचा,अकंपनाचा इंद्रजीताचा महाल व असे अनेक महाल जाळून भस्म करतो. संपूर्ण लंका नगरी ज्यावेळेस जळायला लागते त्यावेळेला हनुमंताला सीतेची आठवण येते व त्याला असे वाटते की या आगीमध्ये सीतेला तर काही दुखापत झालेली नसेल ना. यावरून असे आपल्या लक्षात येते की उत्साहाच्या भरामध्ये आपण अनेक कार्य करतो परंतु कार्याच्या साधक आणि बाधक अशा दोन्ही परिणामांचा विचार आपण केला पाहिजे. हनुमान त्याच्या मनात आलेला हा विचार दूर सारतो आणि आपले पृच्छ म्हणजे शेपटी विझविल्यानंतर अशोक वनामध्ये जाऊन सीतामाईची भेट घेऊन येतो. युद्धामध्ये सुद्धा ज्यावेळेस रावण त्याच्यासमोर उभा राहतो त्यावेळेस रावण हनुमंताची वानर म्हणून हेटाळणी करतो. हनुमान त्याच्या रथावर उडी घेऊन त्याला एक थापड मारतो. हनुमंताच्या एका थापडीमुळेच रावण डगमगून जातो. त्यावेळेस त्याला हनुमंताच्या सामर्थ्याची प्रचिती येते. युद्धामध्ये धुम्राक्ष, अकंपन, देवांतक, त्रिशीला, निकुंभ अशा अनेक अनेक पराक्रमी राक्षसांचा, सेनापतींचा व रावण पुत्रांचा वध हनुमंतांनी केलेला आहे. ज्या ज्या वेळेला राम-लक्ष्मण संकटात सापडले त्या त्या वेळेला तात्काळ धावून जाणारा हनुमंत आहे. लंका विजयानंतर प्रभू रामचंद्र ज्यावेळेस अयोध्येत जातात त्यावेळेस ते सुग्रीवाला, अंगदा ला, वानरांना, काही ना काही भेटी




देतात. सीतेला असे वाटते की हनुमंताला ही काहीतरी भेट दिली पाहिजे. म्हणून ती हनुमंताला एक रत्नांचा बहुमूल्य हार देते. असे म्हणतात की हनुमंत त्यातील प्रत्येक मण्याला चावून पाहतो व त्यामध्ये राम न दिसल्यामुळे त्याला तो फेकून देतो. आपण अनेक कार्य करतो. पण ते कार्य जर आपल्याला आपल्या ध्येया ध्येयाकडे नेणारे जर नसेल तर ते कार्य टाकून दिले पाहिजे सोडून दिले पाहिजे हा अर्थ आपण यातून घेतला पाहिजे. हनुमंत बुद्धिमान होता, शक्तिमान होता, वायू वेगाने काम करणारा होता, तरीही तो "रामकाज करिबे को आतुर" म्हणजे राम कार्य करण्यास आतुर अशा पद्धतीचा होता. हा हनुमान रामायणाचा खरोखरच प्राण आहे असे आपल्या लक्षात येते.

# वाटचाल "ब्लॉकचेन सिस्टीम" या नव तंत्रज्ञानाच्या दिशेने..!

आधुनिक केसरी

**"ब्लॉकचेन सिस्टीम" हे तंत्रज्ञान अलीकडच्याच दशकात अस्तित्वात आले आहे. २००८ मध्ये सातोशी नाकामोटो म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने (किंवा लोकांच्या गट समूहाने) प्रथम विकेंद्रित ब्लॉकचेनची ही संकल्पना तयार केलेली आहे. ब्लॉकचेनमध्ये जगभरातील रेकॉर्ड-कीपिंग सिस्टमचा आधार बनण्याची क्षमता आहे, परंतु ती फक्त १५ वर्षांपूर्वीच म्हणजे २००८ मध्येच लॉन्च करण्यात आली होती. तिचा उदय "सातोशी नाकामोटो" या टोपणनावाने बिटकॉइन या ऑनलाइन रोख चलनाच्या मागे अज्ञात व्यक्तींनी ही "ब्लॉकचेन सिस्टीम" तयार केलेली होती.**

सध्या पंधरा वर्षांनीही हे तंत्रज्ञान अजूनही सुरूवातीच्या टप्प्यात आहे. शिवाय ते वापरू शकणाऱ्या प्रशिक्षितांची संख्याही सध्या मर्यादित अशी आहे. त्यामुळे हा तंत्रज्ञानाचा प्रसार होण्यास विलंब होत आहे. मात्र या तंत्रज्ञानाचे फायदे व त्याची क्षमता लक्षात घेऊन अनेक अग्रगण्य संस्थांनी या तंत्रात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे, याबद्दल अधिक जाणून घेणं सुरू केलं आहे. जेथे व्यवहार पडताळणीची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष माणसांवर अवलंबून राहूनच करावी लागते व खूप वेळखाऊ असते,तेथे "ब्लॉकचेन सिस्टीम" हे तंत्रज्ञान खूपच उपयुक्त ठरणार आहे.
आज अनेक कंपन्या या सिस्टीमचा वापर आणखी कोणकोणत्या कामासाठी करता येईल याच्या जास्तीत जास्त शक्यता जाणून घेण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करत आहेत. सातोशी नाकामोटोने ज्यावेळी २००८ मध्ये 'बिटकॉइन्स' या आभासी चलनामागचे तंत्र जगासमोर जाहीर केले. त्यावेळी लोकांचे लक्ष या चलनासाठी वापरलेल्या प्रणालीकडे वेधले गेले होते. "ब्लॉकचेन" या नव्या सिस्टीममध्येही "बिटकॉइन्स"चेच तंत्र वापरलेले आहे.
आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरणाने (आयएफएससीए) भांडवली बाजार, बँकिंग, विमा आणि आर्थिक सेवांमध्ये कार्यरत असलेल्या संस्थांसाठी "नियामक सँडबॉक्स" फ्रेमवर्क सुरू केला आहे. उपयुक्त डाटा ओळखण्यासाठी आणि शेअर करण्यासाठी आणि सरकारी विभागांना जागतिक दर्जाची ब्लॉकचेन सेवा प्रदान करण्यासाठी बंगळुरूमध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानातील उत्कृष्टता केंद्रही (सीओई) सुरू केले गेले आहे.
हे थर्ड-पार्टी क्लाउड-आधारित पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन म्हणून ब्लॉकचेन-एएस-ए-सर्व्हिस (बीएएएस) प्रदान करण्यासाठी राष्ट्रीय माहिती केंद्र (एनआयसी) द्वारे स्थापित केले गेले आहे. इंस्टिट्यूट फॉर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन बँकिंग टेक्नॉलॉजी (आयडीआरबीटी), रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय), ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीसाठी मॉडेल प्लॅटफॉर्मवर मोठे काम करीत आहे. जे की भविष्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे ठरणारे असेल.
समजून घेऊया ब्लॉकचेन तंत्रज्ञान म्हणजे नेमकं काय..? प्रत्येक व्यावसायिकाकडे आपली एक खातेवही असते, तशीच "ब्लॉकचेन" ही एक प्रकारची डिजिटल खातेवहीच आहे. यातसुद्धा आर्थिक व्यवहाराच्या नोंदी ठेवल्या जातात. त्यात तुम्ही आपला जमा-खर्च बघू शकता आणि तुमच्या सर्व व्यवहारांची माहिती डिजिटल स्वरुपात एकाच ठिकाणी साठवून ठेवू शकता.
पण "ब्लॉकचेन" म्हणजे प्रत्यक्षातील खातेवहीचे डिजिटल माध्यमात एवढेच त्याचे स्वरूप नाही. सर्व प्रकारच्या व्यवहारांच्या नोंदींची ही एक अत्यंत नावीन्यपूर्ण, अत्याधुनिक पद्धत आहे.




पारंपरिक नोंदी करताना प्रत्येक व्यवहाराची सत्यता तपासून पहावी लागते. पूरक कागदपत्रे जमवून सांभाळून ठेवावी लागतात. ताळेबंद जुळवावा लागतो.पण 'ब्लॉकचेन सिस्टीम'मधील सर्व व्यवहार त्या सिस्टीमला जोडलेल्या सर्वांना बघता येतात. त्यामुळे सत्यतेची पडताळणी आणि कागदपत्रांची गरज उरत नाही.
"ब्लॉकचेन" या तंत्रज्ञानाची वैशिष्ट्य.
(अमोल दिलीपराव सावंत)
"ब्लॉकचेन सिस्टीम" वर केलेल्या सर्व व्यवहारांवर संपूर्ण जगात अत्यंत सुरक्षित मानली जाणारी डिजिटल स्वाक्षरी असते. त्यामुळे 'ब्लॉकचेन'मध्ये नोंदलेल्या व्यवहारांमध्ये खोट्या सह्या किंवा खोट्या कागदपत्रांद्वारे फसवाफसवीचा प्रकार होऊच शकत नाही.या सिस्टीममध्ये सुरुवातीपासूनचा प्रत्येक कायमस्वरुपी व्यवहार नोंदविलेला राहातो.
नवा व्यवहार त्या व्यवहारांच्या साखळीतच, पण एक स्वतंत्र व्यवहार म्हणून नोंदविला जातो.
त्या विषयाशी संबंधित प्रत्येक व्यवहार या साखळीचा भाग असलेल्याच्या सार्वजनिक खातेवहीमध्ये प्रसिद्ध होतो. त्यामुळे कुणी फसवणुकीचा प्रयत्न जरी केला, तरी प्रत्येक संबंधिताला ते लगेच समजू शकते व तो व्यवहार थांबवू शकतो.
शिवाय ब्लॉकचेनमुळे सुरुवातीपासूनची मूळ कागदपत्रे व सर्व व्यवहार उपलब्ध असल्याने कागदपत्रांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मध्यस्थाची गरजही नष्ट होते.
थोडक्यात सांगायचं तर ब्लॉकचेन ही एक विकेंद्रित, वितरित आणि सार्वजनिक डिजिटल खातेवही आहे ज्याचा वापर अनेक संगणकांवरील व्यवहार रेकॉर्ड करण्यासाठी केला जातो. जेणेकरून त्यानंतरच्या सर्व ब्लॉक्समध्ये बदल केल्याशिवाय आणि नेटवर्कच्या सहमतीशिवाय रेकॉर्डमध्ये बदल केला जाऊ शकत नाही.
ब्लॉकचैन तंत्रज्ञानाचा वापर हा आपला डेटा सुरक्षितपणे आणि सुलभपणे साठविण्यासाठी आणि पुन्हा वापर करण्यासाठी करता होतो आहे. भविष्यात आपल्या डेटा ची सुरक्षितता ही सर्वात मोठी समस्या असणार आहे. यावर मात करण्यासाठी ब्लॉकचैन हे तंत्रज्ञान कितपत किफायतशीर असेल हे  पुढे चालून आपल्याला वेळच सांगू शकते.
माहिती साभारः गुगल.
**माहिती संकलनः भारत लक्ष्मण सोनवणे.**
**एम.बी.ए : (उत्पादन आणि विपणन व्यवस्थापन.)**

# व्यथा बळीराजाच्या... आणि...



रामदास राजेगांवकर
संपर्क ९४२०२३३०३२


आधुनिक केसरी

**आपला देश कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशाची जवळपास ७० टक्के अर्थव्यवस्था ही कृषि उपजावर अवलंबून आहे. कृषि उपजावर आधारित हजारो कारखाने आपल्या देशात आहेत , आणि या कारखान्यांची करोडो रुपयांची वार्षिक उलाढाल होते. पण मात्र यातून फक्त कारखानदारांचाच विकास झालेला दिसून येतो. जो मुळ उत्पादक म्हणजे शेतकरी  आहे त्याच्या वाट्याला फक्त आणि फक्त निराशाच येते. वर्षभर राब राबून शेतकरी आपल्या शेतात विविध पिकांचे उत्पादन घेतात.**

तेही त्याला सहजासहजी मिळत नाही. कधी अवकाळी तर कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ या अशा अनेक नैसर्गिक संकटांना न डगमगता तोंड देत आपलं काम करत राहतो. गीतेमधिल वचनाप्रमाणे तो निर्पेक्ष कर्म करत राहतो. तो उत्पादक जरी असला तरी , त्याला त्याच्या उत्पादनाची किंमत ठरविण्याचा अधिकार आपल्या व्यवस्थेमध्ये नाही. त्याच्या उत्पादनाची किंमत मात्र खरेदीदार ठरवितात आणि त्याच ठिकाणी तो नागविल्या जातो. आणि ते खरेदीदार त्या उत्पादनावर काही प्रक्रिया करून आणि त्यावर आपले स्वतःचे नावाचे व किंमतीचे लेबल लावून बाजारात विकतो आणि त्यावर लाखो रुपयांचा नफा कमावितो. याच सारखी सर्व बाजूंनी शेतकऱ्याची कोंडी होते, त्याची घुसमट होते. हा सर्व प्रकार समाजापुढे मांडावा या उद्देशाने लेखक श्री. दिलीप देशपांडे , यांनी शेतकऱ्यांच्या समस्येवर अनेक लेख लिहिले आहेत. त्या लेखांना विविध नामांकित अशा वृत्तपत्रांनी वेळोवेळी पूर्वप्रसिद्धी सुद्धा दिलेली आहे . काही सुज्ञ वाचकांच्या आग्रहाखातर त्यांनी हे सर्व लेख एकत्र करून त्यांचा एक पुस्तक रुपी लेखसंग्रह तयार केला आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे, "व्यथा बळीराजाच्या.. आणि.." .

लेखक श्री.दिलीप देशपांडे यांचा ' व्यथा बळीराजाच्या.. आणि.. ' हा लेखसंग्रह नुकताच हाती पडला. पुस्तकाचे बोलके असे मुखपृष्ठ बघताच , ते आपसुकच सांगुन जाते की, या पुस्तकात बळीराजाच्या व्यथा दडलेल्या असाव्यात. या पुस्तकातील आशयाला साजेसं असं मुखपृष्ठ ज्या कलाकाराने बनविलेलं आहे त्याला खरोखरच मानाचा मुजरा. त्या कलाकाराचे नाव या पुस्तकामध्ये कोठेतरी मुद्रित असते तर त्यांच्या नावाचा उल्लेख या ठिकाणी मी आवर्जून केला असता . सदर पुस्तक शॉपीजन प्रकाशन, अहमदाबाद, गुजरात यांनी प्रकाशित केलेले आहे. माजी प्रशासकीय अधिकारी आणि साहित्य अकादमी सन्मान विजेते मा. श्रीकांत देशमुख , नांदेड यांनी , मोजक्याच पण समर्पक अशा शब्दांनी या पुस्तकाची पाठराखण केलेली आहे. या पुस्तकामध्ये काही ठिकाणी व्याकरणात्मक तथा काही मुद्रन दोष नजरचुकीने राहून गेलेले असावेत त्या गोष्टीकडे वाचकांनी मोठ्या उदारतेने दुर्लक्ष करावे असे मला वाटते. कारण की, येथे आशयाला महत्त्व आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये गुण दोष असतातच परंतु आपण, त्यामधून आपल्यासाठी काय योग्य ? आणि काय अयोग्य ? हे पाहूनच निवड करतो . लेखक दिलीप देशपांडे, यांची जवळपास ३६ वर्ष, सहकारी बँक क्षेत्रामध्ये सेवा झालेली आहे. जिल्हा सहकारी बँक म्हणजे शेतकऱ्यांची अगदी जिव्हाळ्याची बँक असं समीकरणच आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक व्यवहार हे नेहमी जिल्हा सहकारी बँकेशी होत असतात . त्यामुळे साहजिकच लेखक श्री. दिलीप देशपांडे यांचा शेतकऱ्यांशी नेहमीच संपर्क येत असे. आणि याच संपर्कातून , शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, त्यांच्या समस्या, त्यांच्या व्यथा, त्यांची होत असलेली अडवणूक, त्यांच्यावर होत असलेला अन्याय, त्यांची आर्थिक स्थिती, शेतीची मशागत, बी बियाणे, पिक कर्ज प्रकरण, कर्ज परतफेड, सावकारी कर्ज , नापिकी, अवकाळी, गारपीट, अवर्षण ,थकीत कर्ज प्रकरण , शेतकरी आत्महत्या, अशा शेतकऱ्यांशी निगडित असलेल्या अनेक बाबीं निदर्शनास यायच्या . त्यातून लेखकांना खूपच दुःख वाटायचं . हळहळ वाटायची . शेतकऱ्यांविषयीचं दुःख व्यक्त करतांना ते आपल्या लेखातून लिहितात आणि समाजाला काही संदेश सुद्धा देतात.

आपल्या लेखातून त्यांनी शासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत की, शेतीची मशागत करण्यासाठी, बी बियाणे खरेदी करणे, खते खरेदी करणे, पेरणी करणे इत्यादी कामे करण्यासाठी पैसा लागतो. तो मिळविण्यासाठी तो बँकेत जातो. परंतु बँकेकडून त्याला वेळेत ऋण मिळत नाही. त्यामुळे नाईलाजाने त्याला सावकाराकडे जावेच लागते. सावकारी कर्ज हे लवकर न फिटणारे कर्ज असते. म्हणूनच तो अधिकाधिक कर्जबाजारी होऊन जातो . त्याच्या जीवनात नैराश्य येते आणि तो काही वेळेस नको तो विचार सुद्धा करतो. त्यामुळे बँकांनी पीक कर्जासाठी सुटसुटीत अशी पद्धती राबवावी की, जेणेकरून शेतकऱ्याला वेळीच कर्ज उपलब्ध होईल. काही वेळेला सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करते. परंतु त्यामुळे समस्येचे निवारण होत नाही. त्याकरिता शासन स्तरावरून काही कायमस्वरूपी अशा शेतकरी हिताच्या योजना राबविण्यात याव्यात , सध्याही काही शेतकरी हिताच्या योजना राबविल्या जातात, परंतु त्या योजना प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहोचतच नाहीत, यावरही शासनाचे कडक नियंत्रण असायला हवे. शेतकऱ्याला बारमाही पाणी मिळेल, वीज मिळेल , की जेणेकरून त्यावर तशी कुविचार करण्याची वेळच येणार नाही. आणि त्या योगे शेतीला व शेतकऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त होईल .




लेखक आपल्या पुढील लेखात म्हणतात की, बी- बियाणे, खते विक्री करणारे दुकानदार, व्यवसायामध्येही भ्रष्टाचार करतात . याही दृष्टीने विचार व्हावा

काही जागरूक शेतकरी वेळेपूर्वी खते, बी- बियाणे खरेदी करायला दुकानांमध्ये जातात . परंतु तुटवडा असल्याचे कारण पुढे करून दुकानदार त्यांना बी -बियाणे ,खते उपलब्ध नसल्याचे सांगून परत पाठवितात. आणि शेवटी पाऊस पडल्यानंतर सर्वांचीच खरेदीसाठी झुंबड उडते . आणि या संधीचा फायदा घेत दुकानदार लोक, निकृष्ट दर्जाचे बियाणे, खते चढ्या भावाने , शेतकऱ्यांच्या माथी मारतात . आणि येथूनच शेतकऱ्यांपुढील अडचणी वाढायला लागतात. काही बियाणे उगवतच नाही, उगवले तर त्याला फुलेच लागत नाही ,फुले लागली तर फळें लागत नाहीत. अशाच प्रकारच्या शेतकऱ्यांच्या काही समस्या लेखकाने , आधुनिक तंत्रज्ञान आणि शेती, वेळ आहे कृषी विभागाच्या नियंत्रणाची, शेतकऱ्यांचे जीवनच संघर्षमय, राजकारण्यांच्या संवेदना बधिर झाल्या का ?, जिल्हा बँका ,राष्ट्रीयकृत बँका आणि शेतकरी, या नभाने या भूईला दान द्यावे, इत्यादी लेखांतून मांडल्या आहेत. एक ते चौदा लेखांची मालिका आधुनिक केसरी मधून प्रसिद्ध झाली आहे. शेतकऱ्यांच्या हितासोबतच, समाजहिताच्या दृष्टीने लेखकाने काही इतर लेख सुद्धा या पुस्तकांमध्ये समाविष्ट केलेले आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना.., भीक नको हवे घामाचे दाम , महाराष्ट्रातील दारिद्र्याची शोधयात्रा, वाचाल तर समृद्ध व्हाल , एक चांगला माणूस- अनिल अवचट, सागरा प्राण तळमळला..., लाभले आम्हास भाग्य... बोलतो मराठी... , संगीत रंगभूमीवरील तपस्वी -पं रामदास कामत., युवा पिढीसमोर आदर्श -स्वामी विवेकानंद , " मी नथुराम गोडसे" ची संघर्ष कहाणी . या लेखांमधून लेखकाने काही सामाजिक संदेश दिलेले आहेत. युवा पिढीलाही मार्गदर्शक संदेश दिलेले आहेत. सोबतच भविष्यातील काही धोक्यांच्या सूचना सुद्धा नमूद केलेल्या आहेत. तर काही व्यक्तिरेखाही चितारलेल्या आहेत.

लेखक श्री. दिलीप देशपांडे, यांचा हा , बहुगुणी तसेच बहुउपयोगी असा हा लेख संग्रह , समाजातील प्रत्येक घटकांनी वाचण्याच्या योग्यतेचा आहे . त्यामुळे प्रत्येकांचे संग्रही असण्यास काहीच हरकत नाही. त्यातून प्रत्येक घटकाला काही ना काहीतरी मिळेलच यात मुळीच शंका नाही.

**पुस्तकाचे नाव-**
**व्यथा-बळीराजाच्या.. आणि..**
**लेखक- दिलीप देशपांडे.**
**प्रकाशक- शॉपीजन, प्रकाशन, पुणे.**
**पृष्ठे -११३. मूल्य - २६८ रु.**
**संपर्क-८९९९५६६९१७**

# पर्यटनस्थळाची ओळख...



दिलीप धायगुडे
संपर्क क्र. ७७३८०३९१९५

आधुनिक केसरी

**जेव्हा माणूस कल्पनेच्या विश्वात विहार करतो तेव्हा त्याला नवनवीन गोष्टींचा उलगडा आपोआप होत जातो, मग ते स्वप्न स्वतःच्या आयुष्याची गुपितं उघडणारी असो किंवा आपण राहत असलेल्या सभोवतालची जीवसृष्टी, की त्या जीवसृष्टीमध्ये झाडे, प्राणी, पाणी यांसारख्या निसर्गनिर्मित घटकांची उत्पत्ती होताना किंवा किती काळापासून ते कोणत्या वस्तिस्थानी त्याच्या रचनेचा त्या निसर्गउपयोगी की, ज्यामुळे मानवाचेच नव्हे तर पशु पक्षांचाचाही आनंद अनावर झालेला असतो. अशा घटकांचा सहवास माणसाला मिळाला तर त्या वातावरणातील, त्या परिसरातील हवेच्या, मातीच्या प्रत्येक कणात सकारात्मक ऊर्जा प्राप्त झालेले नक्कीच आढळून येते.**

निःस्वार्थ भावनेने किंवा तुझं माझं करण्यात हेवेदावे करणारे असे घटक या परिसरात जन्म घेऊन कितीतरी मानवी जीवांच्या आरोग्याचं रक्षण करतात. पश्चिम महाराष्ट्राच्या नकाशा पटलावर ज्या शूरवीरांनी आपल्या किर्तीचा झेंडा आजवर फडकवत ठेवला एवढेच नव्हे तर मनाच्या श्लोकाने लहानांपासून ते थोरांपर्यंत संस्कारांची बीजे पेरणाऱ्या समर्थ रामदास स्वामींच्या सज्जनगड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशा कितीतरी इतिहासाचे पाने अजरामर राहून ओळखल्या जाणाऱ्या सातारा जिल्ह्याची ओळख... या सातारा जिल्ह्यातील तहसील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खंडाळा तालुक्याच्या पूर्वेला १५ किलोमीटर आणि लोणंद ज्याची कांदा बाजारपेठ म्हणून खास ओळखली जाते, या लोणंद पासून पश्चिमेला ८ किमी अंतरावर चहूबाजूंनी डोंगर खुशीत वसलेलं वाघोशी हे एक छोटस गाव. सरासरी दोन ते तीन हजार लोकवस्तीचं असं गाव. शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय. ४० ते ४५ टक्के नोकर वर्ग. गावांमध्ये तंटे झाले तरी ती समोपचाराने मिटवले जातात. फार पूर्वीपासून चालू असलेल्या गावच्या विकासासंबंधी किंवा एखाद्या व्यक्तीच्या खाजगी प्रश्नासंबंधी गावात अजूनही गावभर दवंडी दिली जाते. चैत्र पौर्णिमेला साजरी होणारी हनुमान जयंती आणि कालभैरवनाथ मिरवणूक परंपरेनुसार अजूनही शिस्त, संयम आणि एकजुटीने साजरी होते. या यात्रा कालावधीमध्ये चार दिवस कोणीही मद्यप्राशन किंवा भांडण तंटा करत नसतो. त्याकरिता दंड आकारला जातो, हे गावचं खास वैशिष्ट्ये. गावामध्ये तमाशावर पूर्णतः बंदी असते. पोवाडा, भारुड इत्यादींसारख्या कार्यक्रमातून चांगल्या विचारांची जनजागृती होऊन दरवर्षी यात्रा शांततेत पार पडते.

कोणत्याही गावचं काही ना काही तरी खास वैशिष्ट्ये असतात. परंतु वाघोशी गावापासून पश्चिमेला एक कि मी अंतरावर असलेल्या हनुमान मंदिराचं एक खास वैशिष्ट्ये मानलं जातं. आजही या गावचं पंचक्रोशीत एक जागृत देवस्थान म्हणून नाव आहे. दगडी शिल्पातून उभं राहिलेलं हे मंदिर. या मंदिराच्या पाठीमागील बाजूस डेरेदार अशी दोन वडाची झाडे आणि पुढील बाजूला पिंपरनीची दोन झाडे हे खूप जीर्ण अशी ते झाडे फार वर्षांपासून या चार झाडांच्या सानिध्यात हे हनुमानाचं मंदिर. त्याच्यासमोर एक मोकळा ओटा. कितीतरी वर्षे या ओट्यावर आणि गर्द हिरव्यागार झाडांच्या कुशीत कितीतरी पशूपक्षी, माणसांना विसावा मिळत राहीला. बाजूलाच उंच डोंगर त्यामुळे मनाला एकदम शांत वाटतं. अशा या वातावरणात थोडा बदल व्हावा म्हणून गावातील तरुण वर्गाने आणि काही ठराविक माणसांनी विचार करून या हनुमान मंदिराचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला आणि हनुमान बाग म्हणून हा परिसर ओळखला जाऊ लागला असताना खरंच त्या परिसराचं बागेत रूपांतर व्हावं म्हणून गावातीलच महेंद्र आणि त्याच्या आईवडिलांनी त्या परिसराला हनुमान बाग म्हणून नावारुपास आणण्याचं स्वप्न ठेवलं. गावातीलच एक कर्तबगार व्यक्ती म्हणजेच बबनराव धायगुडे, ग्रामविकास अधिकारी शिरवळ ता. खंडाळा यांनी कृषी क्षेत्रातून आशा बागेची जपणूक करण्यासाठी त्या कुटुंबालाही मानधन मिळावं म्हणून वारंवार प्रयत्न करून एवढेच नव्हे तर कितीतरी झाडे आणि त्या झाडांना पाणी मिळावं म्हणून संपूर्ण ड्रॉपद्वारे पाण्याची आखणी पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. तसेच प्रमोद धायगुडे यांसारख्या आदर्श शिक्षक, निसर्गप्रेमी तरुण युवकांनीही झाडांच्या विविध प्रकारांची सेवा उपलब्ध करून दिली.

ज्या माळरानावर फक्त मंदिर उघड्यावर दिसत होतं, कालांतराने हळूहळू जिल्हा फंडातून निधी उपलब्ध होऊन मंदिराच्या मंडपाचे काम पूर्ण झाले आणि हळूहळू मंदिराच्या आजूबाजूचे दुरुस्तीकरण ही झाले. मंदिर परिसरात फक्त उन्हाचे चटके लागायचे. काटे, झुडपे दिसत होती. त्याच परिसरात आज श्री दत्त मंदिरापर्यंत संपूर्ण परिसर विविध फळा फुलांनी प्रत्येकाच्या डोळ्यात, हृदयात फक्त सुगंध आणि वेगवेगळ्या औषधी वनस्पती यांचा सहवास मिळत गेला. छोटासं रोपटं आणि त्या रोपट्यांची वेळोवेळी या कुटुंबाने घेतलेले काळजी आज चार वर्षातच या परिसराची हनुमान बाग एवढे बहरली, की त्या वृक्षाच्या सानिध्यात उभे असलेली माणसे ही दिसेनाशी झाली. प्रत्येक ऋतूनुसार तसे माणसांचे विचारही हळूहळू बदलत गेले. झाडांच्या पानांचा व फुलांचा रंग बदलू लागला प्रातःकाळी आणि कातरवेळी तर सुगंधीत वातावरण.. जणू प्रत्येकाला प्रेमात पडल्या सारखी अवस्था तयार झाली. शून्यातून विश्व निर्माण करणारं म्हणजेचं गुरव नाना होते, ते सध्या हयात नाहीत.

भक्ताने मनापासून देवावर भक्ती दाखवली त्याचा प्रत्यय प्रत्येक भक्ताला अनुभवास मिळाला. कोण म्हणतो अंधश्रद्धा, कोण म्हणतंय विज्ञान पण विज्ञान या सत्तेच्या वाटेवरून प्रवास करताना ज्या भक्ताचा भाव त्याला आठवतो आणि त्या भक्तीने तो जेव्हा प्रवासाची वहिवाट ठेवतो त्याचं जीवन नक्कीच त्या सुगंधी बागेतल्या पानफुलासारखं उमललेलं पहावयास मिळतं. श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी कारण प्रत्येक आध्यात्मिक शक्ती ही दिसत नसते तर भाव भक्तीतून अनुभवास येते. असा हा



हे गाव आणि गावची प्रेमळ माणसं. हातभार लावणारा इंडियन ग्रुप ऑफ वाघोशी यांसारखा तरुणवर्ग यांचं एक अनमोल असं मार्गदर्शन. या परिसराने प्रत्येकामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. या परिसरातील कितीतरी स्वप्नांची हाक येथील हनुमंताने ऐकली. या सर्वांना साक्ष म्हणून यशवंत कोकीळ विविध वृक्षांच्या सुगंधित फुलांची हनुमान बाग आज फक्त वाघोशी गावातल्याच लोकांसाठी प्रिय नाही तर पंचक्रोशीतील कितीतरी भाविक भक्त प्रत्येक शनिवारी किंवा इतवारी या हनुमान बागेत येऊन मानसिक शांततेचा अनुभव घेतात. संकटात सापडलेल्या प्रत्येक व्यक्तीला या परिसरात नक्कीच सकारात्मक ऊर्जा मिळत राहते. प्रयत्न करण्यासाठी बळ प्राप्त होते. हे कितीतरी आजच्या तरुण वर्गाला प्रत्यक्ष अनुभव मिळालेले ऐकवयास मिळते. झाडांनाही जीव असतो प्रेमानं त्यांची काळजी घ्यायची असते, कितीतरी वाकडी तिकडी बहरली तरीही त्यांच्याशी शत्रुत्वाने वागायचे नसते, अनंत काळाचे ते सोबती असतात. स्वतःचं देखणं रूप दुसऱ्याचं समाधान करून स्वार्थ दाखवीत नसतात. फक्त बोलता येत नाही पण त्यांच्या सुंदरतेच्या गर्द दाट सावलीने कितीतरी जीवांना कुशीत घेऊन त्यांना समाधानी करणं हेच त्यांचं खरं निःस्वार्थ जीवन असतं. अशा या सुंदरतेचा, निसर्गप्रेमी, भाविक भक्तांनी जपलेल्या या छोट्याशा रोपट्याचं आज मोठ्या वृक्षात रूपांतर होऊन नवीन पान फुलांच्या बहराने संपूर्ण निसर्गसृष्टी आज आनंदाने एकमेकांशी गप्पागोष्टी मारण्यात दंग होऊन हवेने, तर कधी सुगंधाने, नव्हे तर सावलीच्या कोमल स्पर्शाने माणसांना गारवा देताना त्यांनाही आनंद अनावर झालेला पहावयास मिळतो. शरद कृषी प्रदर्शन लोणंद या ठिकाणी पार पडले. या स्पर्धेमध्ये हनुमान बागेतील सोनचाफा, जास्वंद इत्यादी फुलांचा नजराणा प्रथमच स्पर्धेच्या प्रांगणात ठेवला आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिकही मिळालं. या आवारातील या नयनरम्य बगीच्याने दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भक्ताला स्वत्वाची जाणीव होऊ लागली. प्रत्येक जण आपला स्वार्थ, दुःख आणि देहभान विसरून या परिसरातील पवित्र भूमीच्या सहवासाने भारावून गेल्याचे दिसून येते. कितीतरी वयस्कर लोक वर्ग आज आनंदाने येथे विसावा घेऊ लागले. जमलं तर प्रत्येकाने एकदा तरी या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेऊन अशा पर्यटनस्थळांची अनोखी ओळख असा साक्षात्कार नक्कीच होऊन जीवन जगण्याचा आनंद इतरत्र शोधण्यापेक्षा थोडासं या परिसरात येऊन अनुभवाचे धडे शिकूया आणि स्वतःच्या आनंदाबरोबरच इतरांनाही आनंद देऊया.

**"निसर्ग वाढवूया जीवन फुलवूया.."**

# बालविवाह थांबणार कधी!

आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. पुरोगामी राज्यात बालविवाहाची प्रथा आजही सुरूच आहे. देशात व राज्यात अशा अनेक घटना घडत आहेत. महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत पंधरा हजाराहुन अधिक बालविवाह झाल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर १८वर्षाखालील १५हजार २५३मुली ह्या माता बनल्याची माहीती समोर आली आहे. कोरोना कालखंडात अनेक बालविवाह झाली.बालविवाह हि अनिष्ठ प्रथा आहे .तरीही आज कायदयाचे उल्लंघन होताना दिसत आहे. बालविवाह प्रतिबंधक २००६अंतर्गत कायदा करूनही बालविवाह रोखण्यात आपण कमी पडलो आहे. गेल्या तीन वर्षात केवळ दहा टक्के बालविवाह रोखण्यात सरकारला यश आले आहे.सरकारने अधिक व्यापक पावले उचलण्याची गरज आहे. मुलाचे वय २१वर्ष तर मुलीचे वय १८वर्ष पेक्षा कमी असु नये. बालविवाह करणार्यांना दोन वर्ष कैद, तर दंडाची शिक्षा ठोठावली जाते.एवढी शिक्षा असूनही बालविवाह होत आहे. याचा विचार करण्याची गरज आहे. आपण एकीकडे महीला सक्षमीकरणाच्या योजना केल्या. तर दुसरीकडे बालविवाहाची प्रथा सुरू आहे. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट थांबते. अल्पवयीन गर्भधारणा , उपासमारी, बालमृत्यूचे समस्येला सामोरे जावे लागते आहे.महाराष्ट्रात दर पाच मुलींमागे एकीचा बालविवाह होतो आहे.बालविवाहाची प्रथा थांबवण्यासाठी सरकारने अथक पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

**संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी, ता. श्रीगोंदा, जि., अहमदनगर, मो.७७२१०४५८४५**




# लोक भुलतात म्हणून भंपकगिरी फोफावत आहे




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण भुलतो म्हणून लोक आपल्याला भुलवतात आपण हुशार ज्ञानी सचेत असल्यावर भंपकपणा आपल्या आजुबाजुला फिरूकु शकतं नाही. आत्मा अमर आहे शरिर नश्वर आहे. संसार माया आहे. काहीच स्थिर नाही मग हे सगळं ज्ञात असताना देखील आपण नेमकं काय इतरांना दाखविण्यासाठी बैचेन आहेत हे तरी निटपणे आपल्याला समजलं आहे का दाखविण्याच कारण काय तर काहिच नाही फक्त लौकिक स्तरावर लोकांनी त्या क्षेत्रातील दिग्गज म्हणून आपल्याकडं पाहव म्हणून भंपकगिरीचा उदय होतो.**

या मध्ये समाजाच आणि स्वतःच हि नुकसान होत असत्याला सत्य समजण ही एक प्रकारची फसवणूक आहे आणि मुख्यत्वे स्वतः ने केलेली स्वतःची मोठी फसवणूक पण हे कळत नाही.हा वेळेचा प्रभाव आहे. भंपकगिरी हि एक प्रकारची वाळवीच आहे जी स्वतःच तर नुकसान करतेच त्याच बरोबर समाजाचं नुकसान करते पण हे कळत नाही हे दुर्भाग्य आहे. भंपकगिरी ही अशी नशा आहे ज्याच्या मध्ये आपण एवढं डुबतो कि आतोनात नुकसान होईपर्यंत पुन्हा बाहेर पडतं नाहीत.आपण कुठं आणि किती खोल पाण्यात आहोत हे स्वतःला चांगल्या पद्धतीने महित असतं पण अज्ञान हेच आहे कि आपण जे आहेत ती अवस्था मन मान्य करत नाही. मग आपण आहेत त्यापेक्षा आपलं वेगळेत्व सिद्ध करण्यासाठी जंगजंग पछडतो.व स्वतः भोवती क्षणिक भ्रमक खोटं वर्तुळ निर्माण करतो .जे अंतिमतः निरुपयोगी असतं. उथळ पाण्याला खळखळाट फार असतो. शांत संयमी आणि भरपूर पाणी घेऊन प्रवाह करणारी नदी कधीच खळखळाट करत नाही. वास्तव सोडुन अवाजवी दाखविण्याचा प्रयत्न सुरू झाला म्हणजे भंपकपणाचा जन्म झाला मग जस जस भंपकपणा मोठा होत जाईल तसा तसा तो आपल्यावर प्रभाव निर्माण करून आपल्यावर स्वार होईल.आणि मग जीवन पुन्हा आपल्या नियंत्रणात राहणार नाही. याचा अर्थ पुन्हा आपली स्वतःशी स्पर्धा चालू होईल कि दिवसेंदिवस आपण किती जास्त भंपक होतोय हे सगळं नुकसान कारक असलं तरी ही ते आपल्याला हितकारक वाटत आहे हा कलयुगाचा प्रभाव आहे हा प्रभाव ज्याला समजला त्याचा बचाव नक्कीच होऊ शकेल. भंपकपणा हा स्वतः ने स्वतःला दिलेला धोका



तर आहेच पण इतरांसाठी सुद्धा ते घातकच आहे. आणि हाच आत्मघातकी पणा दिवसेंदिवस वाढीस लागला आहे. सत्य हे सात्विक सोज्वळ आणि सरळ असतं तरी पण ते लोकांना पटत नाही उलटपक्षी मोठेपणा, अंवडंबर ढोंगीपणा, भंपकपणा, ही फॅशन म्हणून उदयास येत आहे. हिच फॅशन विद्यमान युगातील सर्वात मोठा घोका आहे हा धोका ज्यांना ओळखता आला त्यांचा बचाव निश्चित झाला. पण ही फॅशन हा धोका आपण ओळखायला विसरलो चुकलो तर खुप मोठं नुकसान होऊन आपल्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ आली म्हणून समजा हे गणित समजण गरजेचं आहे. प्रत्येक क्षेत्रात ज्या पद्धतीने भंपकपणा प्रवेश करून आपलं स्थान निर्माण करत आहे.
ही पद्धत हा मार्ग आज उद्या तर घातक आहेच पण भविष्यात खूप मोठं नुकसान करणारा ठरणार आहे. आज आपण सगळीकडे पाहतोय मार्केटींग कशा जास्तीत जास्त करता येईल अथवा होईल याचा प्रयत्न चालू आहे. मार्केटिंग तसं वाईट नाही पण त्याल सत्याची धार किनार असली पाहिजे. असत्याची धार किनार असली तर मग त्याला वेगळं वळणं लागत आणि आपणं जे मुळात नाहीत ते दाखविण्यासाठी आपण धडपड करतो. जे आहे ते दाखविण्याची आवश्यकता नसते ते लोकांना आपोआप समजतं पण जे आपल्याकडं नाही अथवा आपणं जे नाहीत ते आपण जेव्हा दाखविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो या प्रयत्नांचा प्रवास भंपकपणा वाढीस लागतो . मुळात ही वृत्ती योग्य नाही पण भौतिक संसधान माझ्याकडं किती जास्त आहेत अथवा मी किती मोठा आहे.माझा प्रभाव किती मोठा आहे हे लोकांना दाखवून स्वतःच मुल्य इतरांच्या करवी वाढविण्याचा हा वेडा प्रयत्न म्हटलं तरी काही वावगं ठरणार नाही.कारण सत्य हे गावभर सांगत फिरवा लागतं नाही.

# बोधिसत्वाच्या पाऊलखुणा : प्रज्ञासूर्याचे समग्र आकलन

आधुनिक केसरी

**साहित्याचे ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य म्हणजे वैचारिक साहित्य असे दोन प्रकार आहेत. वैचारिक साहित्याची एक उज्वल परंपरा मराठी साहित्याला लाभली आहे. महाराष्ट्रातील विद्वान, ज्ञानी, विचारवंत आणि समाजसुधारकांनी आपल्या विचारांचा प्रकाश शब्दांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविला आहे. हे खरे समाज धन होय. वैचारिक संस्कृती ही मुळातच महाव्यापक अशी संस्कृती आहे. 'जुने जाऊ द्या मरणा लागूनि' या विशालदृष्टीने विज्ञानबोधक नवे भान या वैचारिक संस्कृतीने समाजाला दिले आहे. वैचारिक साहित्य माणसाला ज्ञानसमृद्ध आणि विचारपक्व करीत असते.**

एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनपर्वात आपल्या क्रांतदर्शी विचाराने स्त्रीशूद्रांच्या प्रगतीची पाऊलवाट रेखणारे म. जोतिराव फुले हे महान विचारयोद्धा भारताला लाभले. त्यानंतर त्यांचेच शिष्य महाविद्वान, विश्वरत्न विचारक्रांतीचे प्रणेते डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड अभ्यासकीय मानदंडावर अस्पृश्योद्धाराची चळवळ उभारली. सभा, संमेलन, परिषदा, चर्चासत्र, वृत्तपत्रीय लेखन, ग्रंथलेखन याद्वारे त्यांनी अखिल भारतीय समाजमनाला जागृत केले. भारतीय राज्यघटनेची निर्मीती ही तर अनन्यसाधारण बाब आहे. या महामानवाच्या 'न भूतो न् भविष्यती' अशा या अनेक महान कार्याचा सुषमा पाखरे या धडाडीच्या कार्यकर्ता लेखिकेने 'बोधिसत्वाच्या पाऊलखुणा' या ग्रंथाद्वारे सौंदर्यपूर्ण वेध घेतला आहे. यापूर्वी विविध वर्तमानपत्रे, मासिकांमधून आलेल्या लेखांचे हे संकलन आहे. बाबासाहेबांनी दिलेला विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या कळकळीतून त्यांचे हे लेखन झाले आहे. त्या उत्कृष्ट वक्ता आहेत. ओजस्वी भाषणातूनही हे विचार त्या मांडत असतात.

'बोधिसत्वाच्या पाऊलखुणा : ऐतिहासिक वारसा' या पहिल्या लेखापासून ते 'आंबेडकरी चळवळीच्या उज्ज्वल भवितव्याची जबाबदारी कोणाची ?' असे तेवीस लेख या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्माचे थोर उपासक, बौद्ध धर्मप्रवर्तक होते. तसेच ते बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञ, प्रज्ञावंत आणि पुनरुत्थारक होते. एकेकाळी भारतातून लुप्त झालेला बौद्ध धर्म बाबासाहेबांनी पुन्हा पुनर्जीवित, पुनर्स्थापित केला. चक्रवर्ती सम्राट अशोकानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी यशस्वी धम्मचक्र प्रवर्तन केले. त्यामुळे बाबासाहेबांचे अनुयायी, विचारवंत, अभ्यासक बाबासाहेबांना दुसरे बुद्ध, बोधिसत्व, मैत्रेय मानतात.


२५ एप्रिल १९५४ रोजी भंडारा लोकसभा राखीव मतदार संघाच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने डॉ बाबासाहेब आंबेडकर विदर्भात आले होते. तेव्हा वर्धा जिल्ह्यातील पुलगावच्या नगरपरिषदेने बाबासाहेबांचा जाहीर सत्कार करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी ते मान्य केले. पुलगावला आले. त्यांचे जंगी स्वागत झाले. पुलगाव नगरीच्या आसपासचे सर्व कष्टकरी, शोषित, मजूर, पीडित, दुःखी, कष्टी लोकांनी 'याची देही याची डोळा' बाबासाहेबांना बघता येईल म्हणून आतुर झाले होते. लेखिकेने या सर्व सोहळ्याचे फार हृद्य वर्णन केले आहे. 'बोधिसत्वाच्या पाऊलखुणा' पुलगाववासियांनी आपल्या हृदयात जतन करून ठेवल्यात, हे सांगताना लेखिकेचा उर अभिमानाने भरून आला आहे.

'नागसेन वनातील मिलिंद बोलतोय' या दुसऱ्या नंबरच्या लेखाला कथा म्हणता येईल. अपयशामुळे खचून गेलेल्या मिलिंद महाविद्यालयातील एका विद्यार्थ्याला त्याच महाविद्यालयातील मिलिंद नावाचा मित्र बाबासाहेबांच्या विचारांचा बोध देऊन त्याच्यातील नकारात्मक विचार काढून टाकतो. त्यामुळे तो विद्यार्थी नव्या ऊर्जेने भारून जातो. त्याला नवे बळ प्राप्त होते. बाबासाहेबांना अस्पृश्यतेचे दाहक चटके सोसावे लागले होते, त्यामुळे आपल्या अज्ञानी, शोषित, पीडित, वंचित बांधवांच्या कल्याणासाठी देह झिजवायचा संकल्प त्यांनी केला होता. त्यासाठी त्यांना प्रचंड कष्ट उपसावे लागले. हा 'खडतर जीवनाचा काटेरी प्रवास'ही लेखिकेने अतिशय हृदयंगम रीतीने मांडला आहे.

विविध धर्म, पंथ, संस्कृती, आचार, विचार असणाऱ्या या विशाल भारत देशाला एकसंघ ठेवणारे भारतीय संविधान निर्मिती हे बाबासाहेबांचे केवळ अजोड कार्य आहे. स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत स्वतःला मरणखाईत लोटून देणारे बलिदान बाबासाहेबांनी दिले आहे. 'राष्ट्रऐक्याचे निशाण, भारतीय संविधान', 'भारतीय संविधानाची प्रास्ताविका काय सांगते ?', 'भारतीय संविधान चिरायू हो!', 'आधुनिक भारताच्या उभारणीत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान', 'लोकशाही चिरायू होवो!' इत्यादी लेखांमधून लेखिकेने डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानाचे महत्त्व सांगितले आहे. लेखिका म्हणते, "आपले संविधान सर्वांच्या हिताचा विचार करणारे, त्याला उपासनेचे स्वातंत्र्य देणारे, दर्जाची समानता देणारे असल्याने कोणत्याही व्यक्तीला तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा, वर्णाचा किंवा लिंगाचा असो त्याला न्यायपूर्ण वागणूक मिळण्याची हमी असल्याने, इथला प्रत्येक व्यक्ती हा संविधानावर अतोनात प्रेम करतो." काही देशविघातक प्रवृत्ती तोंड वर काढत असतील, तर संविधान आणि पर्यायाने लोकशाही वाचवण्याकरता आपण कटिबद्ध होणे गरजेचे आहे असेही त्या कळकळीने सांगून जातात.

१९५४ साली डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी 'दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची' स्थापना केली. या संस्थेला भारतातील बौद्धांची मातृ संस्था म्हणून सन १९५५ मध्ये सरकार मान्यता मिळाली. या संस्थेची संपूर्ण माहिती लेखिकेने 'दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया : आपली मातृसंस्था, आपले वैभव' या लेखामध्ये दिली आहे. बौद्ध धम्मानुयांना भारतीय बौद्ध महासभेची माहिती उपलब्ध करून देणारा हा महत्त्वपूर्ण लेख आहे. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या धम्मग्रंथात बाबासाहेबांनी प्रचंड मनन आणि चिंतन करून आपल्या प्रखर बुद्धिवादाने विज्ञानयुगाला अनुरूप अशी भगवान बुद्धाच्या चरित्राची आणि बुद्ध तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. बाबासाहेबांच्या तर्कशुद्ध विचारांचा आणि लेखणीचा समृद्ध अविष्कार या ग्रंथात पहावयास मिळतो असे लेखिकेला वाटते.

जोतीराव आणि भीमराव ही गुरु शिष्याची आदर्श जोडी आहे. लेखिका सुषमा पाखरे यांनी 'जोतिराव ते भीमराव : आदर्श गुरु-शिष्याचे




उदाहरण' या लेखात म. जोतिराव फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील घटना, प्रसंगांची संगती लावत त्यांच्या वैचारिकतेतील प्रगल्भ जाणिवांचे साम्य दर्शविले आहे. 'या आदर्श गुरुशिष्याची जयंती त्यांचे अनुयायी संयुक्तपणे साजरी करतात, हा दुग्धशर्करा योग आहे. गुरुशिष्याचे एवढे आदर्श उदाहरण शोधूनही दुसरे सापडणार नाही', असे लेखिकेला वाटते. 'बाबासाहेबांची कार्यसिद्धी आणि परिघाबाहेरच्या स्त्रियांची मुक्ती', 'स्त्रीमुक्तीकरिता बाबासाहेबांचा राजीनामा : एक आकलन', 'बाबासाहेबांची उत्तुंग कार्यसिद्धी, मताधिकार आणि स्त्रीमुक्ती', हे असेच महत्त्वपूर्ण लेख आहेत. स्त्रीशुद्रांविषयी अपमानजनक नियम असणाऱ्या मनुस्मृतीचे बाबासाहेबांनी दहन केले आणि कलमेच्या एका फटकाऱ्याने संपूर्ण स्त्रीपुरुष समानता निर्माण केली. केवळ सर्वसामान्य स्त्रियांनाच नाही तर देवदासी, मुरळी, जोगतिणी, वेश्या, आराधीणी अशा स्त्रियांना परिषदा, सभा, संमेलनांमधून मार्गदर्शन केले. लेखिकेने बाबासाहेबांचा स्त्रीजातीविषयीचा कळवळा आणि त्यांनी केलेले स्त्रीउद्धाराचे कार्य या लेखांमधून मांडले आहे.

'भीमाई' हा लेख बाबासाहेबांविषयींच्या आतंरिक प्रेमाने ओतप्रोत गद्य काव्यच आहे. बाबासाहेबांनी शोषित, उपेक्षित, वंचित जनसमूहावर मातृवत प्रेम केले. त्यांना आईच्या कळवळ्याने पोटाशी धरले, बाबासाहेब या लोकांची माय झाले, भीमाई झाले. आपल्या लेकरांचे दैन्य, हाल पाहून बाबासाहेबांना अक्षरशः रडू यायचे. 'श्वासाच्या शेवटच्या क्षणापर्यंत या माझ्या अज्ञानी भोळ्या लेकरांसाठी, त्यांच्या न्यायासाठी झटेन आणि त्यांना न्याय मिळवून देण्यास अपयशी ठरलो तर स्वतःला गोळी घालून घेईन', असा दुःखार्त उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडला होता. आईशिवाय कोण बरे लेकरांसाठी असे कासावीस होते. 'भीमाई' या लेखाद्वारे लेखिकेच्या वेगळ्या लेखन वैशिष्ट्याचे दर्शन घडते. 'संघटित होणे हेच खरे आयुध', 'बाबासाहेबांची जयंती आणि बहुजन समाजाचे चिंतन', 'समाज संघटन आणि कार्यकर्ता' या लेखांमधून लेखिकेने आंबेडकरी जनतेच्या दुखऱ्या नसेवर बोट ठेवले आहे. संघटित नसलेल्या लोकांचा पराजय निश्चित असतो, याचे असंख्य दाखले इतिहासात आहेत. त्यापासूनही आपण काहीच बोध घेत नाही. खुद्द बाबासाहेबांनीही शिका, संघर्ष करा याबरोबरच संघटित व्हा, हा मोलाचा संदेश दिला आहे. आपल्या बापाचेही न ऐकणारे आम्ही करंटे आहोत. केवळ आंबेडकरवाद्यांनीच एकत्र येऊन भागणार नाही तर एस सी, एस टी, एन टी, व्ही जे, एस बी सी, ओबीसी आणि अल्पसंख्यांक हा सर्व बहुजन वर्गाने एक होण्याची गरज आहे., अशी मांडणी लेखिकेने केली आहे. या तिन्ही लेखांमधून लेखिकेने आजच्या वास्तवाचा परामर्श घेतला आहे.

साध्या सरळ निवेदन पद्धतीने लेखिकेने हे लेख लिहिले आहेत. उच्चनिर्मितीमूल्यांसह परिस प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला सुप्रसिद्ध विचारवंत, लेखक डॉ प्रदीप आगलावे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. सुप्रसिद्ध आंबेडकरी लेखिका उर्मिला पवार यांनी लेखिकेची पाठराखण केली आहे. शिक्षिका असणाऱ्या सुषमा पाखरे उत्तम कवयित्री, नाट्यकलावंत, प्रभावी वक्ता आणि उत्कृष्ट निवेदिका आहेत. त्यांना शैक्षणिक आणि साहित्यिक कार्यासाठी अनेक पुरस्कार, मानसन्मान प्राप्त झाले आहेत. या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने 'बोधिसत्वाच्या पाऊलखुणा' या पुस्तकाद्वारे आपल्या वैचारिक क्षमतेचे दर्शन घडविले आहे. उत्तरोत्तर त्यांच्याकडून असेच कार्य घडत राहो, अशा मंगलकामना.

**पुस्तक - बोधिसत्वाच्या पाऊलखुणा**
**लेखिका - सुषमा पाखरे**
**प्रस्तावना - डॉ. प्रदीप आगलावे**
**बल्र्ब - उर्मिला पवार**
**प्रकाशन - परिस पब्लिकेशन**
**मूल्य - २८०**
**पृष्ठ - १५२.**

**समीक्षण -प्रा.डॉ. सुनंदा बोरकर जुलमे**
**नाईक नगर , मानेवाडा,**
**नागपूर 440027**
**संपर्क - 8766422475**

# रशियाचा 'तो' निर्णय जगाचा वाढविणार ताप

आधुनिक केसरी

**रशिया-यूक्रेन युद्धावरून जगात सद्या तणावाचे वातावरण आहे. वर्ष लोटून गेले तरी युद्ध संपण्याचे नाव घेत नाही. दोन्ही देश युद्धातून माघार घेण्यास तयार नसल्याने गुंता अधिकच वाढला आहे. दोन दिवसात युद्ध संपवू या निर्धाराने उतरलेल्या रशियाला वर्षभरानंतरही विजयश्री प्राप्त होत नाही आहे. अर्थात युक्रेनला अमेरिकेसह अन्य राष्ट्रांचे पाठबळ असल्याने हे युद्ध लांबत चालले यात दुमत नाही.**

प्रत्यक्षात युक्रेनला बेचिराख करणे हा रशियाचा उद्देश मुळीच नव्हता. युक्रेनने नाटो समूहात समाविष्ट होऊ नये याकरिता निव्वळ धमकी देण्याच्या उद्देशाने रशियाने हा युद्धाचा डाव रचला होता. सोव्हियेट संघाच्या पतनानंतर स्वतंत्र देश म्हणून उदयास आलेला अण्वस्त्रहीन युक्रेन युद्धाचे परिणाम बघू जाता आम्ही नाटोमध्ये सहभागी होणार नाही अशी ग्वाही देईल आणि युद्धाला विराम लागेल असा ठोकताळा रशियाने बांधला होता. मात्र संकटात संधी शोधत असलेल्या अमेरिकेने रशियाच्या मनसुब्यावर पाणी फेरले. अमेरिका रशियाला अजूनही पाण्यातच पाहत असतो. रशिया हाच आपला प्रतिस्पर्धी आहे, असे अमेरिकेला सतत वाटत असते. द्वितीय महायुद्धानंतर तब्बल तीन ते चार दशके या दोन देशात शीतयुद्धाची परिस्थिती होती, मात्र नव्वदच्या दशकात सोवियेट रशियाचे विघटन झाले आणि बलाढ्य अशा रशियातून अनेक छोट्या देशांची निर्मिती झाली. त्यामुळे साहजिकच रशियाचे बळ कमी झाले. तत्पूर्वी सर्वच पातळीवर अमेरिकेशी टक्कर घेणारा रशिया आता कमजोर झाला होता.

वर्तमानात तर अमेरिकेशी बरोबरी करणे रशियाला शक्य नाही हे जगाला ठावूक आहे. तरीसुद्धा अमेरिका रशियाबाबत पराकोटीचा द्वेष बाळगून आहे. रशिया कसा कमकुवत होईल या संधीच्या शोधात असलेल्या अमेरिकेला युक्रेन रशिया युद्धाच्या बहाण्याने आयतच कोलीत हाती लागले आहे. त्यामुळेच युक्रेनच्या खांद्यावर बंदूक ठेवून युक्रेनला शस्त्रांची रसद पुरवून रशियाला कमकुवत करण्याचे मनसुबे अमेरिका आखत आहे. मात्र यामुळे अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये कमालीचे वितुष्ट येत आहे. रशियाने नुकतेच हेरगीरीच्या संशयावरून अमेरिकेतील प्रसिद्ध वृत्तपत्र 'द वॉलस्ट्रीट जर्नलच्या' पत्रकारास रशियातून अटक केली आहे. रशियन सुरक्षा दलाने असा दावा केला आहे की, हा पत्रकार अमेरिकेसाठी हेरगिरी करत आहे. रशियन शस्त्रनिर्मिती कारखान्यांची हेरगिरी करून ती माहिती अमेरिकेला पुरवित असल्याच्या संशयावरून या पत्रकाराला अटक केल्याचे रशियाने सांगितले. या माध्यमातून रशियाने अमेरिकेला आमच्या प्रकरणात अधिकची लुडबुड करू नये असा संदेश दिला आहे. मात्र रशियाच्या या कृतीवरून आणखी राजकारण तापू शकते, हे मात्र निश्चित आहे.अशातच यापुढे रशियामध्ये निर्माण होणाऱ्या कोणत्याही परमाणु शस्त्रांची, चाचण्यांची माहिती रशिया अमेरिकेला पुरविणार नाही. असा आणखी एक मोठा निर्णय रशियाने घेतला आहे.

रशिया आणि युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या वाढत्या हस्तक्षेपावरून रशियाने हा निर्णय घेतला आहे. मागच्याच महिन्यात रशियन राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये झालेला 'न्यू स्टार्ट करार' मोडीत काढत असल्याची घोषणा केली होती. दोन्ही देशांमधील हा करार संपुष्टात येणे जगावरील नवीन संकटांची नांदी असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. शीतयुद्धाच्या कालावधीत अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये परस्पर शत्रुत्वातून परमाणु शस्त्रनिर्मितीची स्पर्धा लागली होती. यातूनच दोन्ही देशांकडे मोठ्या प्रमाणात विनाशकारी शस्त्रसाठा तयार झाला होता. शस्त्रास्त्रांची वाढती संख्या लक्षात घेता यावर बंधने म्हणून दोन्ही देशांनी एक करार करण्याचे ठरविले त्यालाच 'न्यू स्टार्ट (Strategic Arms Reduction Treaty) करार' असे म्हटल्या गेले. हा करार ५ फेब्रुवारी २०११ रोजी अंमलात आला. त्याचा कालावधी दहा वर्षे म्हणजे सन २०२१ पर्यंत होता, जो २०२६ पर्यंत आणखी



पाच वर्षे वाढवण्यात आला. जोपर्यंत हा करार लागू आहे तोपर्यंत दोन्ही देश अण्वस्त्रांचा साठा मर्यादित ठेवतील, असे त्यात म्हटले आहे. या करारांतर्गत, दोन्ही देशांनी ७०० सामरिक शस्त्रे प्रक्षेपक तैनात करण्यास सहमती दर्शविली होती. यामध्ये आंतरखंडीय क्षेपणास्त्रे, पाणबुडीपासून प्रक्षेपित होणारी क्षेपणास्त्रे आणि अण्वस्त्रांनी सज्ज अशा बॉम्बवर्षाव करणाऱ्या विमानांचा समावेश होता. यासोबतच परमाणु अस्त्रांची संख्या १५५० पर्यंत सीमित करण्याचेही मान्य करण्यात आले होते. या करारानुसार अनुचाचणीपूर्वी अमेरिकेला अवगत करणे रशियाला बंधनकारक होते. आजवर सगळं आलबेल होतं, मात्र आता हा करार संपुष्टात आल्याने रशियाची अमेरिकेसोबत अण्वस्त्रांची शर्यत पुन्हा सुरू होऊ शकते. रशिया स्वतःच्या संरक्षणासाठी अण्वस्त्रे विकसित करणार असल्याची घोषणा खुद्द पुतीन यांनी केली आहे. 'अमेरिका आणि त्यांचे नाटो सहकारी युक्रेनमध्ये रशियाचा पराजय व्हावा याकरिता प्रार्थना करीत असून या पार्श्वभूमीवर आमच्या शस्त्र निर्मितीवर असलेले अमेरिकेचे नियंत्रण आता आम्ही धुडकावून लावत आहो,' अशी घोषणा पुतीन यांनी केली आहे. रशियाकडे जगातील सर्वात जास्त अण्वस्त्रे आहेत. सामर्थ्याच्या बाबतीत रशियाची अण्वस्त्रे देखील जगातील सर्वात शक्तिशाली आहेत. अशा परिस्थितीत रशिया नवीन शस्त्रे बनवण्यासाठी अणुचाचणीही करू शकतो. रशियाचा मुकाबला करण्यासाठी अमेरिकाही अण्वस्त्रांच्या मागे धावू शकते. त्या पाठोपाठ अन्य राष्ट्र सुद्धा अण्वस्त्रनिर्मिती नव्याने सुरु करू शकतात. त्यामुळे जगात पुन्हा अण्वस्त्रांची शर्यत सुरू होऊ शकते. युक्रेनच्या समर्थनार्थ अमेरिका आणि नाटो राष्ट्र स्पष्टपणे समोर येत असल्याने आता रशियाने सुद्धा त्यांच्यावर दबाव वाढविण्याची रणनीती आखली आहे. रशियाचा सच्चा सहकारी असलेला बेलारुसमध्ये क्षेपणास्त्रे तैनात करणार असल्याची घोषणा रशियाने नुकतीच केली आहे.

याच बरोबर साईबेरियामध्ये परमाणु शस्त्रांसह युद्धसराव सुरु केला आहे. यामध्ये तब्बल तीन हजार सैन्य आणि तीनशेच्यावर वाहनांचा समावेश आहे. यामध्ये अकरा हजार किलोमीटर मारक क्षमता असलेल्या बेलेस्टिक मिसाईलचा सुद्धा समावेश आहे. या माध्यमातून रशिया युक्रेनला मदत करू पाहणाऱ्या अमेरिका आणि नाटो देशांना आपली परमाणु ताकत दाखवीत असल्याचे बोलले जाते. अशातच चीनी राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी रशियाचा दौरा करून आम्ही या मुद्यावर रशियाच्या सोबत असल्याचा अप्रत्यक्ष इशारा अमेरिकेला दिला आहे. एकंदरीत या सर्व घडामोडींनी आंतरराष्ट्रीय राजकारण तापू लागले असून नजीकच्या भविष्यात जागतिक शांततेची वाट अधिकच बिकट होणार असल्याचे चिन्ह आहे.

**डॉ.संतोष संभाजी डाखरे**
**(आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक)**
**८२७५२९१५९६**

# सप्तश्रृंग गडावर खाजगी वाहतूक सुसाट

## कळवण प्रशासनाला पत्रकारांचे वावडे

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सप्तश्रृंग गड येथे सध्या सुरू असलेल्या चैत्रौत्सवानिमित्त गडावर पत्रकारांच्या वाहनांना प्रवेश बंद आहे. मात्र चिरीमिरी घेऊन खाजगी वाहतूक सुसाट सुरू असून पोलीस अधीक्षकांनी याची चौकशी करावी अशी मागणी भाविकांनी केली आहे.

राज्यभरातील पत्रकार सप्तश्रृंगी गडाला भेट देऊन सप्तश्रृंगी मातेचा महिमा आपल्या माध्यमातुन भविकांपर्यंत तसेच भाविकांच्या अडीअडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवत असतात. मात्र कळवण प्रशासनाने वार्तांकन करण्यास जाणाऱ्या पत्रकारांची वाहने गडावर जाण्यास बंदी घातली आहे. त्यामुळे पत्रकारांनी संताप व्यक्त केला आहे. याबाबत स्थानिक पत्रकार वेळोवेळी आवाज उठवतात मात्र प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करते. यावर्षीही चैत्रौत्सव नियोजन



बैठकीत स्थानिक पत्रकारांनी पत्रकारांच्या वाहनांना प्रवेश द्यावा अशी सूचना मांडली मात्र प्रशासनाने त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. याउलट याकाळात बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांकडून मात्र चिरीमिरी घेऊन तसेच वशिलेबाजीने एम.एच.०१ ते ०५ या मालिकेतील खाजगी वाहने, राजकीय व्यक्ती, संघटनेचे कार्यकर्ते, पोलीस फलक असलेले वाहने, सरकारी नोकरांचे कुटुंबीय यांची वाहने सर्रास सोडले जात असल्याचे चित्र बघायला मिळाले. पोलीस निरीक्षक समाधान नागरे हे कर्तव्यनिष्ठतेचा आव आणत असले तरी तेही या गोष्टींकडे सोयीस्कर कानाडोळा करत आहेत, त्यामुळे चैत्रौत्सव काळातील सी.सी.टी.व्ही फुटेज तपासण्यात यावेत अशी मागणी भाविकांनी केली आहे. नाकाबंदीच्या ठिकाणी काही खाजगी व्यक्ती लुडबुड करताना दिसतात व ते भविकांशी अरेरावी करतात याचा अनुभव महाराष्ट्र पत्रकार संघ जिल्हा संपर्कप्रमुख किरण आवारे यांनाही आला. याबाबत पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांची भेट घेतली असता त्यांनी ओळखपत्र बघण्याची देखील तसदी घेतली नाही. उलट तुम्ही कळवण तहसीलदार यांचा पास घेऊन या असे महंमद तुघलकी फर्मान सोडले. चैत्रौत्सव काळात सहा.उपजिल्हाधिकारी विशाल नरवडे यांनी विना पास कोणतेही वाहन सोडण्यात येऊ नये असे आदेश दिले आहेत. मात्र आदेशाची अंमलबजावणीकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे गडावर खाजगी वाहने कशी जातात याचा प्रशासनाने शोध घ्यावा अशी मागणी भाविकांनी केली आहे.

धार्मिक स्थळी पत्रकारांना वार्तांकनासाठी प्राधान्य हवेच, मात्र सप्तश्रृंगगडावर वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांची वाहने अडवली जात असेल तर विश्वगामी पत्रकार संघ याचा जाहीर निषेध करीत असून याबाबत राज्यस्तरीय आंदोलन छेडले जाईल.

**संतोष निकम, राष्ट्रीय अध्यक्ष, विश्वगामी पत्रकार संघ**

माध्यमे हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून लोकसेवकांवर देखरेख करण्याचे घटनात्मक काम ते करतात मात्र याच नोकरशाहीकडून पत्रकारांनाच वेठीस धरण्याचे प्रकार होत असतील तर लोकसेवकांच्या कामाचे मूल्यमापन कसे करणार? त्यामुळे यापुढे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. यात सुधारणा न झाल्यास पत्रकार संघ नक्कीच न्यायालयात दाद मागेल.

**सचिन बैरागी, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र पत्रकार संघ**

# बोरगाव कासारी येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**बोरगाव कासारी :** अखंड हरिनाम सप्ताह बोरगाव कासारी तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे सप्ताहात चौथ्या दिवसाची किर्तन सेवा हभप गुरूवर्य हभप मधुकर महाराज पारणेरकर यांची झाली प्रमुख उपस्थिती मार्गदर्शक कैलास महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा संभाजीनगर संगितविषारद हभप नामदेव महाराज आगळे पैठण रामचंद्र म चव्हाण गंगापूर युवराज म चौधरी बिडगेवराई प्रमोद म शिंदे नागठाणा सुखदेव पाटील जाधव बोरगाव विष्णु पाटील कळम नारायण पाटील मोटे संतोष महाराज मेटे कंडक्टर जाधव दत्ता माऊली ईधाटे दादाराव म जाधव बोरगाव भजनी मंडळ पारणेरकरताई साहेबराव पाटील कळम कुमावत म कारखाना भवन माणिक पाटील कळम कारखाना भवन तलवाडा भजनी मंडळी वारकरी नारायण पाटील मोटे समस्त ग्रामस्थ बोरगाव कासारी.





# फुलंब्री येथे रामनवमी व कीर्तनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** संभाजीनगर रोड ढंगारे वस्ती येथे पंढरीनाथबाबाढंगारे (महाराज) यांच्या मार्गदर्शनाखाली रामनवमी चा कार्यक्रम घेण्यात आला व हरिहरेश्वर मंदिरामध्ये ह भ प सुशांत_महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला व दहा वर्षापासून खूप मोठ्या प्रमाणात असा कार्यक्रम चालू असतो या ठिकाणी व बागडे नानांनी रामनवमीच्या सर्व भक्तांना शुभेच्छा दिल्या व फुलंब्री नगराध्यक्ष सुहास शिरसाठ यांनी रामायण यांच्यावर उजाळा दिला सर्व युवकांना रामायण बघण्याच्या सूचना दिल्या आणि सर्व राम भक्तांना शुभेच्छा दिल्या व शहरांमधून भव्य मिरवणूक करण्यात आली रामनवमीच्या निमित्ताने

याप्रसंगी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार मा.ना.श्री. हरिभाऊ बागडे नाना व इफको माजी संचालक मा.श्री. त्रिंबकराव शिरसाठ साहेब, राघोजी ढंगारे मामा, नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाट, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, दामोदर पात्रे, संजय पवार, देविदास ढंगारे, मधुकर मुळे, बाबासाहेब शेवाळे, अजय शेरकार, शिवनाथ ढंगारे, आबा नाईक, लक्ष्मण पिंजारी, भीमराव पाथ्रे व मोठ्या संख्येने राम भक्त उपस्थित होती.

# महूद व अकोला येथील नेत्र तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिरास उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** स्वर्गीय आ. काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोला तालुक्यात सर्वत्र आयोजित केलेल्या नेत्र तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिरास महूद व अकोला येथेही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महूद येथील शिबिरात तब्बल १२५ हुन अधिक रुग्णांनी आपल्या डोळ्यांची मोफत तपासणी केली तर अकोला येथील शिबिरात सुमारे १५० रुग्णांनी सहभागी होत या मोफत शिबिराचा लाभ घेतला. स्वर्गीय साळुंखे पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून सांगोला तालुक्यात सर्वत्र मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे मांजरी नाझरे शिवणे पाठोपाठ गुरुवार दि.३० रोजी अकोला ता.सांगोला व महुद येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. धनंजय काटकर डॉ. पियुष साळुंखे पाटील डॉ. शरद नागणे यांच्याहस्ते करण्यात आले. या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील व सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष जयमालाताई गायकवाड यांनी भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला व त्यांच्या व्यथा जाणून घेत सर्व रुग्णांना नवी दृष्टी देण्याचे आश्वासन दिले. महुद येथील या शिबिरात १२५ हून अधिक रुग्णांची तपासणी केली यापैकी असंख्य रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी निवड झाली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# भीमजयंती अध्यक्षपदी अशोक वाहुळ तर उपाध्यक्षपदी सिद्धार्थ निकाळजे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात आयोजित बैठकीत नवनिर्वाचित कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

या बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी अशोक वाहुळ तर उपाध्यक्षपदी सिद्धार्थ





निकाळजे, सचिवपदी दिपक शिरसाठ, कोषाअध्यक्ष युवराज बनकर, कार्याध्यक्ष पदी धीरज नगराळे तर सहसचिवपदी जितेंद्र साठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शहरात (दि.११) एप्रिल पासून विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, समाजप्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती उत्सव समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अशोक वाहुळ सिध्दार्थ निकाळजे यांनी बोलताना दिली. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद कांबळे, पत्रकार राजानंद सुरडकर, रमेश धनेधर, विनोद कदम, साहेबराव शिरसाठ, कडूबा पवार, समुद्र मोरे, विश्वजीत बागुल, सतिश बनकर, लक्ष्मण शिरसाठ, अनिल शिरसाठ, योगेश अंभोरे, शिवाजी बन, दिलीप आळींग, राहुल शिरसाठ, शरद वाघ, अशोक महाले यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



आधुनिक केसरी न्यूज

ताडपिंपळगाव येथे श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्सवात साजरा झाला. आयोजक हिंदवी स्वराज्य ग्रुप ताडपिंपळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसीय कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये महाप्रसादाचा कार्यक्रम व कीर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला व दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहात रथ मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विशेष करून महिला वर्गांनी खूप मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला संपूर्ण गावकऱ्यांनी खूप सहकार्य केले तसेच पोलीस प्रशासन खूप सहकार्य झाले.

# रायगड किनाऱ्याजवळ संशयास्पद बोट आढळली

## बोटीवर पाकिस्तानी असल्याची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** रायगड किनाऱ्याजवळ संशयास्पद बोट आढळली आहे. बोटीवर पाकिस्तानी नागरिक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या बोटीची नौदल आणि तटरक्षक दलाकडून तपासणी होत आहे.काही महिन्यांपूर्वी रायगडच्याच श्रीवर्धन किनाऱ्यावर दोन बोटी भरकटत आल्या होत्या.

या बोटींमधून स्फोटकेही जप्त करण्यात आले होते. यामध्ये घातपाताचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा एकदा अशी बोट खळबळ उडाली आहे. मुंबई अरेबियन किनाऱ्यावर आज सकाळी एक बोट संशयास्पदरित्या दिसली. ही बोट रायगडच्या किनारपट्टीवर आढळल्याची माहिती समोर येत आहे. ही बोट नौदलाच्या हद्दीत सापडली आहे. त्यामुळे नौदल या बोटीची कारवाई करत आहे.आज सकाळी साडेआठ ते नऊ वाजण्यच्या सुमारास बोट दिसल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मुंबई पोलिस बंदर क्षेत्राला ही माहिती 10 वाजता देण्यात आली. ही बोट अडवण्यात आली असून त्यात काही पाकिस्तानी नागरिक आढळले आहेत. रायगड पोलिस अधीक्षक सोमनाथ घाडगे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.



# सारथी संशोधकांना नोंदणी दिनांकापासून शिष्यवृत्ती देण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पीएचडी साठी नोंदणी झाल्यापासून अंतिम टप्प्या पर्यंत शिष्यवृत्ती देण्यासाठी योग्य पावले उचलण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नियोजन विभागाला दिल्याची माहिती अवर सचिव राजगोपाल देवरा यांनी दिली. छत्रपती शाहू महाराज संशोधन ,प्रशिक्षण व मानवविकास संस्था यांच्यावतीने पीएचडी साठी पात्र असलेल्या मराठा समाजातील संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा अभिनव उपक्रम सारथी राबवत आहे.२०२२साली पीएचडी साठी ८५१ विद्यार्थ्यांची निवड सारथी तर्फे करण्यात आली होती.सारथी ही संस्था पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी



दिनांकापासून शिष्यवृत्ती देत नाही. हे प्रकरण मराठा क्रांती मोर्चा चे जेष्ठ नेते राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्दशनास आणून दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ गंभीर दखल घेत नियोजन विभागाला योग्य निर्णय घेण्यासंबंधी निर्देश दिले. नियोजन विभागाचे अवर सचिव देवरा यांची निर्णय प्रक्रिया सुरु झाल्याची माहिती त्यांनी दिली.

# लायन्स क्लबच्या वतीने पंढरपूर महोत्सव 2023

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** शहरांमध्ये अन्नपूर्णा पंढरपूर व लायसन क्लब पंढरपूर ड्रीम यांच्या वतीने पंढरपूर महोत्सव 2023 चे आयोजन करण्यात येणार आहे. पंढरपूर महोत्सवाचे शुक्रवार दिनांक 14 एप्रिल 2023 ते मंगळवारी दिनांक 18 एप्रिल 2023 या कालावधीत कंडरेज रेसिडेन्सी पुणे रोड इसबाई पंढरपूर येथे आयोजन केलेले आहे.




पंढरपूर महोत्सवातील आयोजक अन्नपूर्णा पंढरपूर यांच्या वतीने दिनांक 6 मे 2022 पासून कै. प्रल्हाद बाबा कंडरे यांच्या प्रथम पुण्यतिथी पासून पंढरपूर येथे अजित दादा कंडरे आणि मित्रपरिवार यांनी अन्नपूर्णा पंढरपुर यांच्या योजनेचा शुभारंभ केला आहे. आणि तो न चुकता दररोज जेवणाचे 25 मोफत डबे गरजूंना घरपोच केले जात आहेत या योजनेची व्याप्ती वाढवण्याचा त्यांचा भविष्यातील मानस आहे तसेच लायन्स क्लब पंढरपूर ड्रीम यांच्या जागतिक पातळीवर सेवा संस्थेमार्फत डोळ्यांच्या व्याधी असलेल्या गरीब गरजू रुग्णांच्या डोळ्यांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठी डोळ्याचा दवाखाना सुरू करण्याची ही प्रयोजन यांच्यामार्फत करण्याचा विचार आहे त्यासाठीच महोत्सवातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा संपूर्ण भाग वापरला जाणार आहे या महोत्सव मध्ये विविध खाद्यपदार्थ चे स्टॉल लावले जाणार असून तसेच फॅशन दागिने कपडे खेळणी संसार उपयोगी वस्तू शैक्षणिक साहित्य ऑटोमोबाईल्स ट्रॅक्टर खेळाचे साहित्य यांचेही स्टॉल लावले जाणार आहेत तसेच शेतकऱ्यांच्या शेतातला ताजा व निरोगी शेतमाल थेट ग्राहकापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने येथे शेतमालाचा शेतमालासाठी स्टॉल लावले जाणार आहेत शेतीसाठी आवश्यक असणारे अवजारे पशु आहार रासायनिक व नैसर्गिक खतांचे स्टॉल येथे प्रदर्शन विक्रीसाठी उपलब्ध करून देणार आहेत या महोत्सवाच्या कालावधीत जत्रा स्टॉल उभा करून मनोरंजनात्मक खेळ जे बालपणीच्या काळात खेळले गेले होते तोच अनुभव नव्या पिढीला देऊन आपलं बालपण जगण्याचा अनुभव देण्याच्या उद्देशाने हे बनविण्यात आलेले आहेत तसेच या महोत्सवात कंपनीचा लोगो थीम असलेली सेल्फी पॉईंट उपलब्ध करून दिले गेले आहे.



# बस जाळपोळ : २२ वर्षानंतर शिवसैनिकाची निर्दोष मुक्तता

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** हिन्दू ह्रदय सम्राट सरसेनापती मा.बाळासाहेब ठाकरे यांना ई.स. २००० साली अटक केले असता पैठण तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी या विरोधात पैठण बाजार. बंद ,रास्ता रोको आंदोलन केले. या दरम्यान एस टी बस ला तोडफोड जाळपोळ झाली सदरील गुन्ह्याची नोंद साल २००० - ला पैठण पोलिस ठाण्यात झाली व हा खटला पैठण कोर्टात 22 वर्षे चालला , नवीन नियमांनुसार ह्या गुन्हा मध्ये कलम 353 नोंद असल्या कारणाने ही केस छत्रपती संभाजी नगर सेशन कोर्टात सुरू झाली व आज कोर्टाने सबळ पुरावा नसल्याने या सर्व शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता केली. सुनील शिंदे, शेखर पाटील, अरुण काळे, संजय सोनारे, सोमनाथ टाक ,राजु परदेशी ,संभाजी सव्वाशे, संतोष सव्वाशे, बाळासाहेब घुले, शाम जगताप, शहादेव लोहारे, विजय ठाणगे, विष्णू मिटकर, माणिक पोकळे, राम पोकळे, सुरेश शेळके, रामदास काळे, देविदास पठाडे ,भास्कर जगधने, यासाठी ॲड तवार व ॲड काळे यांनी काम पाहिले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# जोगेंद्र कवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त जिलेबी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष लॉंगमार्च प्रणेते माजी खासदार जोगेंद्रजी कवाडे सर यांच्या १ एप्रिल रोजीच्या वाढदिवसानिमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष सोमनाथ भोसले यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना जिलेबी वाटून व केक कापून साजरा करण्यात आला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशनगर अकलूज येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष सोमनाथ भोसले यांनी माजी खासदार जोगेंद्रजी कवाडे सर यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान व त्यांनी आजवर केलेल्या कार्याची माहिती सांगून पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने आदरणीय कवाडे सरांचा १ एप्रिल वाढदिवस हा संघर्ष दिन म्हणून साजरा केला जातो त्यानंतर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी केक कापून माजी खासदार जोगेंद्र कवाडे सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष सोमनाथ भोसले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दहा किलो जिलेबीचे वाटप करून मुलांचे तोंड गोड करण्यात आले.

यावेळी या शाळेचे मुख्याध्यापक कोरे सर,मुख्याध्यापिका श्रीमती अंगुले मॅडम,नागणे सर,मगर सर,माहिते सर,कोरबू सर गायकवाड सर केसकर सर,नागने मॅडम,शिंदे मॅडम पठाण मॅडम,जगदाळे मॅडम,कोरके मॅडम,काझी मॅडम,नाचणे मॅडम,थोरात मॅडम,जाधव मॅडम यांचेसह पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे माळशिरस तालुकाध्यक्ष सचिन कांबळे,तालुका संघटक पांडुरंग चव्हाण,तालुका खजिनदार विश्वास उगाडे,युवक तालुका संपर्कप्रमुख शिवम गायकवाड,अकलूज शहर संपर्कप्रमुख शिवाजी खडतरे, सचिव साजिद बागवान,राजू बागवान,जावेद शेख यांचेसह या शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# आई-वडील हेच पहिलं प्रेम : कवी अनंत राऊत

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या 'झेप २०२३' वार्षिक स्नेहसंमेलनाचे शानदार उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** आई-वडील आहेत म्हणून आपण आहोत. त्यांचा नेहमीच सर्वांनी आदर करायला हवा. आई-वडील हेच आपले सर्वस्व असून, त्यांची आपण पूजा करायला हवी. आई-वडील हेच आपलं पहिलं प्रेम आहे, असे प्रतिपादन अकोला जिल्ह्यातील याळा येथील सुप्रसिद्ध कवी अभियंता अनंत राऊत यांनी येथे बोलताना केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या 'झेप २०२३' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. यावेळी मंचावर विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. नितेश स्वामी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख डॉ. साईनाथ उमाटे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे, समन्वयक प्रा. सुभाष मोरे, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकर आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय डॉ. गणेश लहाने यांनी करून दिला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा, सांस्कृतिक व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी कवी अनंत राऊत यांनी स्वतः लिहिलेल्या 'मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा' ही कविता सादर केली. यासोबतच आपल्या इतर कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजाराम पवार यांनी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वाटचालीसंदर्भात माहिती दिली.

उदघाटन कार्यक्रमानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण झाले.

उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी सिद्धार्थ गायकवाड व राधिका मद्रेवार यांनी तर शेवटी आभार डॉ. साईनाथ उमाटे यांनी मानले. दुसऱ्या दिवशी समारोप कार्यक्रम प्रसंगी या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रसिद्ध उद्योजक दिलीप माने यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. यावेळी मंचावर विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. नितेश स्वामी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख डॉ. साईनाथ उमाटे, नॅक समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, संगणक विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग समन्वयिका डॉ. वैशाली सातपुते, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे, समन्वयक प्रा. सुभाष मोरे, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकर आदींची उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमात दिलीप माने यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, ग्रंथालय विभाग कनिष्ठ महाविदयालय सांस्कृतिक विभाग, गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीप माने म्हणाले, मी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी होतो याचा मला सार्थ अभिमान वाटतो. या महाविद्यालयाची माझ्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. समारोप कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन विद्यार्थी ऋतुजा सूर्यवंशी व वैभव ठाकूर यांनी तर आभार प्रा. सोनाली कुलकर्णी यांनी मानले.

**स्नेहसंमेलनात 'फुल्ल टू एन्जॉय !'**
दयानंद वाणिज्य महाविद्यालयात २३ मार्च ते २९ मार्च २०२३ या कालावधीत 'झेप २०२३' हे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले . यात विद्यार्थ्यांनी आनंदनगरी, सांस्कृतिक कार्यक्रम, साधे आणि संगीत शेलापागोटे आदी कार्यक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद घेतला . वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ असते . कोरोना काळात दोन वर्ष वार्षिक स्नेहसंमेलन होऊ शकले नाही . मात्र यंदा मोठ्या प्रमाणात हा उत्सव सर्वत्र साजरा झाला . विद्यार्थ्यांनी यात सहभागी होत आनंद लुटला .

# तंत्रज्ञानाला कोंडून ठेवणाऱ्या डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** येथील पश्चिमेतील खडकपाडा भागातील ओम डायग्नोसिस केंद्रातील एका तंत्रज्ञाला याच केंद्रातील एका डॉक्टरने शुक्रवारी रात्री खोलीत कोंडून ठेवले. तंत्रज्ञाने पोलिसांना संपर्क केल्यानंतर पोलिसांनी निदान केंद्रात येऊन त्याची सुटका केली. हा प्रकार करणाऱ्या डॉक्टर विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. डॉ. डी. एस. पाटील ( ३८, रा. छत्री बंगल्या जवळ, रामबाग, गल्ली क्र. चार, कल्याण पश्चिम ) असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. ओम डॉयग्नोसिस केंद्रातील तंत्रज्ञ सुनील महांतप्पा तिळगुळे ( ३६, रा.जयाबाई बेतुरकर चाळ, खडकपाडा, कल्याण ) असे तक्रारदाराचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले.

तंत्रज्ञ तिळगुळे ओम निदान केंद्रात तंत्रज्ञ म्हणून नोकरी करतात. शुक्रवारी रात्री सव्वानऊ वाजता ते आपल्या निदान केंद्रातील खोलीत कार्यरत होते. त्यावेळी तेथे डॉ. डी. एस. पाटील आले. तिळगुळे यांनी डॉ. पाटील यांना इकडे या असा इशारा केला. त्याचा राग डॉ. पाटील यांना आला. त्यांनी तिळगुळे यांच्या दिशेने रागाने हातवारे करून तू केंद्रातील खोलीतच मर असे बोलून तेथून निघून गेले. बाहेर पडल्यानंतर डॉ. पाटील यांनी तंत्रज्ञ तिळगुळे असलेल्या खोलीचे लोखंडी दार बाहेरून बंद केले. तिळगुळे यांनी विनंती करूनही डॉक्टरांनी दरवाजा उघडला नाही. ते तिळगुळे यांना एकटेच सोडून तेथून निघून गेले.

# जलसंवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : डॉ.साईनाथ उमाटे

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने महाविद्यालयीन युवकांच्या सामाजिक जाणिवा अधिक जागृत झाल्या पाहिजेत. जागृती व संवर्धनाच्या दृष्टीने विविध माध्यमांचा प्रभावी वापर करून युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक- युवती नेतृत्व विकास शिबीरात दिनांक 30 मार्च रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथे राजर्षी शाहू महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त आयोजित विद्यार्थी परिसंवादात "जलसंवर्धन" या विषयावर व्याख्यान देताना डॉ. साईनाथ उमाटे हे बोलत होते.याप्रसंगी मंचावर रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.कल्याण सावंत व कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रकाश रोडिया हे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. उमाटे म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाहिल्यानंतर जलसंवर्धना विषयीचे काम कधीच न संपणारे आहे. पाण्याची बचत प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून त्याच्या स्त्रोतांचे जतन आणि संवर्धन करणे हे सरकार सह प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जलसंवर्धनासाठी परिश्रम




घेतले पाहिजे असे सांगून डॉ. उमाटे यांनी जलस्तर वृध्दीच्या उपाय योजनेची माहिती दिली.सदरील कार्यक्रमास लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील विद्यार्थी परिसंवादात सहभागी झाले होते.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# नेहरू-गांधी कुटुंबाने देशाला त्यांची संपत्ती व घर दिले त्यांना बेघर करण्याचा भाजपचा प्रयत्न

## नाना पटोले : राहुल गांधीनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यायला मोदी का घाबरत आहेत?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशात व राज्यात हुकूमशाही पद्धतीने कारभार सुरु आहे. विरोधी पक्षांच्या सभांना परवानगी देताना जाचक अटी घालून आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपा केवळ जातींमध्ये व धर्मांमध्ये फुट पाडून राजकीय पोळी भाजत आहे. मनुवादी व्यवस्थेने अन्नदात्याला, गरिब माणसाला, छोटे दुकानदार यांना बरबाद करण्याचे काम केले. हेच लोक देशातील लोकशाही व संविधान संपवण्याचे काम करत असून राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करणे याचाच भाग आहे. लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी भाजपाच्या धर्मांध व्यवस्थेला उखडून टाकावे लागेल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

मोदी-अदानींच्या भ्रष्ट युतीचा पर्दाफाश केल्यामुळे खोटी तक्रार करून राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली आझाद मौदानात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या एससी, एसटी, ओबीसी, आदिवासी आणि अल्पसंख्यांक विभागाने धरणे आंदोलन केले. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी आशिष दुआ, सोनल पटेल, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा, एसी. सी. विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, भटक्या विमुक्त विभागाच्या अध्यक्षा पल्लवी रेणके, प्रदेश सरचिटणीस प्रा. प्रकाश सोनावणे, जोजो थॉमस, नंदकुमार कुंभार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ओबीसी विभागाचे सरचिटणीस धनराज राठोड यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना नाना पटोले म्हणाले की, मोदी-अदानीचा संबंध काय? अदानीच्या कंपनीत शेल कंपन्यांचे २० हजार कोटी रुपये कुठून आले? फक्त अदानीलाच देशातील व परदेशातील कंत्राटे देण्याचे कारण काय? हे प्रश्न राहुल गांधी यांनी विचारले म्हणून राजकीय सुडबुद्धीने भाजपा सरकारने राहुल गांधी यांच्यावर कारवाई केली. निरव मोदी, ललित मोदी, गौतम अदानी यांनी जनतेच्या कष्टाचा पैसा लुटला, या चोरांना चोर म्हटले तर देशता गुन्हा ठरतो? नरेंद्र मोदींचा भांडाफोड होऊ नये म्हणून खोट्या केसमधून राहुल गांधी शिक्षा सुनावण्यात आली, खासदारकी रद्द केली आणि सरकारी घर सोडण्यास सांगून बेघर केले. गांधी कुटुंबाने देशाला सर्वस्व अर्पण केले आहे,




देशासाठी बलिदान दिले, त्यांची कोट्यवधी रुपयाची संपत्ती व स्वतःचे घर दान केले आणि ते सरकारी घरात राहत असतानाही त्यांना बेघर करण्याचे पाप मोदी सरकारने केले आहे. अत्याचारी, जुलमी ब्रिटीश सत्तेला काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशातून हाकलून लावले, सध्या देशात ब्रिटीश सरकार सारखीच जुलमी सत्ता आहे, त्यांच्या हातातून देशाला वाचवण्याची जबाबदारी काँग्रेस पक्षावर आहे. मोदी-अदानीच्या भ्रष्ट युतीचा भांडाफोड करा, सर्वसामान्य जनतेचे पैसे कसे लुटले, राहुल गांधी जनतेचे प्रश्न मांडत असताना त्यांच्यावर भाजपा सरकारने राजकीय आकसातून कारवाई केली, हे जनतेपर्यंत जाऊन सांगा. काँग्रेस पक्षात विविध प्रकारचे ३९ सेल आहेत, या सेलच्या माध्यमातून प्रत्येक समाज घटकाला काँग्रेस विचारधारेशी जोडून हुकुमशाही आणि गरीब, दलित आदिवासी व अल्पसंख्यांकविरोधी विरोधी भाजपला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी कामाला लागा असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# कन्नड येथे जनशक्ती शेतकरी संघटनेची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल भाऊ खूपसे पाटील व प्रदेश महासचिव उमाकांत तिडके पाटील यांच्या सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगर व नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख अनिल शेळके पाटिल यांच्या प्रमुख उपस्थितीत विजय वाघ, सतीष मालकर यांची जनशक्ती शेतकरी संघटना कन्नड तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तर अशोक पवार याची कन्नड तालुका कार्याध्यक्षपदी रविंद्र दत्तु जगताप यांची औराळा संर्कल प्रमुख पदीं निवड करण्यात आली यावेळी छः संभाजीनगर व नाशिक जिल्हा सपर्क प्रमुख अनिल शेळके पाटिल यानी संघटना वाढीसाठी नवीन निवड झालेल्या तालुका प्रमुख व ईत्तर पदाधिकार्याना संघटनेचे ध्येय धोरण या विषयी मार्गदर्शन केले यावेळी छः संभाजीनगर जिल्ह्याचे युवा आघाड़ी जिल्हा प्रमुख संतोष सोनवणे कामगार आघाडी तालुका प्रमुख साडु सुरे गोकुळ हिवाळे युवा आघाडी तालुका प्रमुख उपतालुकाप्रमुख सचिन शेजवळ सोशल मिडिया तालुका प्रमुख महेश दळवी व ईत्तर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित निवडी करण्यात आल्या.

# ऋणानुबंध समाज विकास संस्थेचे कार्य उल्लेखनीय

## सेवानिवृत्त उपजिल्हाधीकारी रमेश घेवंदे : शेकडो बौध्द वधुवरांनी परीचय मेळाव्यात घेतला भाग

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** शहरात अनेकवर्षानंतर प्रमच बौध्द वधुवर परीचय मेळाव्याचे आयोजन ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली व्दारा संचालीत ऋणानुबंध बौध्द वधुवर सुचक केंद्र यांनी पंचशील बुध्द विहार गजानन नगर चिखली येथे केले होते. यावेळी बुलडाणा जिल्हयासह अकोला, वाशिम, जालना, जळगाव येथील 115 वधुवर यांनी अधिकृत नोंदणी करुन आपला परीचय दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष फुले आंबेडकर जयंती उत्सव समीतिचे अध्यक्ष एस.एस. गवई, उद्घाटक प्रा. डॉ. राजु गवई, विशेष उपस्थितीत सेवानीवृत्त उपजिल्हाधिकारी रमेश घेवंदे, मार्गदर्शक प्रा.डॉ. सुभाष राऊत, ईंजी. एन.के. सरदार, तर प्रमुख उपस्थीतीत वंचीत नेते अर्जुन बोर्डे,बोधाचार्य भारत साबळे, प्रताप मोरे पत्रकार दै. देशोन्नती, सुभाष पाखरे, सचिन मोरे हे होते.

ऋणानुबंध समाज विकास संस्थेच्या माध्यमातुन प्रशांत डोंगरदिवे व रुपाली डोंगरदिवे यांनी तुकाराम आश्रय वृध्दाश्रम



सुरु करुन वृध्दांची अविरत सेवा करीत आहे. तसेच ऋणानुबंध बौध्द वधुवर सुचक केंद्र उभारुन आज भव्यदिव्य असा वधुवर परीचय मेळावा यशस्वी केला आज जवळपास 115 वधुवरांनी आपला परीचय दिला आहे. यामुळे लग्न संबध तात्काळ जुळतिल व याकामासाठी लागणारा वेळ व पैसा वाचेल असे मेळाव्याचे आयोजन करुन शेकडो समाज बांधवांना एकत्रीत करुन समाज सेवा करणे खरोखर संस्थेचे कार्य उल्लेखनीय सुरु आहे असे गौरवोउद्गार सेवानिवृत्त ऊपजिल्हाधिकारी रमेश घेवंदे यांनी केले. तर पालक सध्या मुला मुलींचे विवाह जुळवण्यासाठी परेशान आहेत.सुयोग्य वधू वर मिळत नाही. म्हणून आशाप्रकारचे परिचय मेळावे होणे ही काळाची गरज आहे असे प्रतीपादन डॉ राजु गवई यांनी उद्घाटनप्रसंगी केले. तर ऋणानुबंध संस्थेच्या सदैव राहु व लागेल ते सहकार्य करु असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.एस. गवई यांनी मांडले.

# पत्रकार गोपाल तुपकर यांचा सामाजिक उपक्रम

## वाढदिवसाच्यानिमित्त वृद्धाश्रमास दिले पाच हजार दान

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथे आगळावेगळा ठसा उमटून सर्व सामान्य जनतेच्या हृदयात जागा करून आपल्या लेखणीच्या माध्यमातून गोरगरिबांना न्याय मिळवून देणारे सी सी एन न्यूज चे एडिटर इंन चीफ तसेच टीव्ही जनरलिस्ट संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार गोपाल तुपकर यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने विनाकारणचा खर्च न करता आपले सामाजिक दायित्व समजून ऋनाणुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचलित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथील वृद्धाच्या सेवेसाठी रुपये पाच हजार दान देऊन वाढदिवस साजरा केला आहे. तुकाराम आश्रय वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे व रुपाली डोंगरदिवे हे स्वखर्च व लोकवर्गणीतून निराधार बेघर बेसहरा वयोवृद्धाची निःस्वार्थ अविरत सेवा करीत आहे. ज्या आई वडिलांनी जन्म देऊन जग दाखवील अश्या मायबापांना बेवारस सोडून दिले



अश्या वृद्धानाची सेवा त्यांच्या कडून होत आहे. त्यांच्या या कार्यास आपले सामाजिक दायित्व समजून वृद्धाश्रमातील वृद्धाच्या सेवेकारिता तुकाराम आश्रय वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांच्याकडे रुपये पाच हजार दान देऊन चिखली तालुक्यातील इतर दानशूर व्यक्ती यांनी तुकाराम आश्रय वृद्धाश्रमास शक्य ती मदत करून सहकार्य करावे असे भावनिक आव्हान सुद्धा गोपाल तुपकर यांनी या वेळी केले. सोबत तालुका पत्रकार संघांचे अध्यक्ष योगेश शर्मा, पत्रकार संतोष लोखंडे, पत्रकार रवींद्र फोलाने, पत्रकार कैलास गाडेकर, पत्रकार नितीन फुलझाडे, शेतकरी संघटनेचे नेते विनायक सरनाईक, हातनी गावाचे तलाठी विकास कस्तुरे, भाजपचे ॲड. दिलीप यंगड, पत्रकार पीयूष भीमेवाल,पत्रकार गजानन पठाडे, पत्रकार इम्रान शाह यांच्यासह इतर पत्रकार बांधव उपस्थित होते.



## वळीव पाऊस



उन्हास पिऊन मोकाट वारा
उधळून देतो धूळ पसारा
मशागतीची उरका कामे
आभाळ कोकलून देई इशारा

खाऊन पिऊन बोजड सुस्ती
उन्हाळ ऋतूत भिनते अंगी
वैशाख उन्हाने पेटते रान
न्हाऊन निघते काळपट रंगी

आभाळ होते पुरते बेजार
पाऊस ऋतूला घालते गळ
बैल शिंगात येते अवसान
माती उकरून जिरवी बळ

शुभ शकुणाची वर्दी घेऊन
वाटतं इथवर यावं कोणी
वैराण, शुष्क, कोरड्या रानात
आसवं ओघळून द्यावं पाणी

अशाच वेळी फुटतो पाझर
आसमंतातही होतो गलका
पूर्वमोसामी वळीव पाऊस
मातीत रुजतो हलका हलका

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086

## बळीराजा...

दिसा मागनं दिस गेले देवा रं...
अजून ही खातोया पिठलं
भाकर... कष्टाची कास त्यांनं
धरलीया.... दिस रात घाम
गाळतोया शेतात... कशी ही
जिंदगानी आयुष्याच्या वाटेला
रं... पिकाले नाय पाणी
तरीबी राबतोया रं
मुलाबाळां शिक्षणासाठी
झटतोया रं....
हाता तोंडा आला घास
तो बी नेलाया सरकारनं रं
आला आला शेतसारा
लुबाडला रं.....
दिस रात हाकतोया नांगर.....
जिवा शिवाची जोडी
सोबतीला रं.
झालीया आता लाही लाही रं
पेटलं आता सारं सारं रान रं....
आलीया आता वेळ रं....
लढण्या विरूद्ध अन्याया....
जीव गेला तरी,
आता माघार नाही रे....
हक्का साठी लढतोया आता...
जीव की प्राण रे....
कशी ही जिंदगी देवा रे.....
आता नाही राहिलीया अंगा खांद्या
ताकदं रं... जीव गेला आता
राबता राबता रं.... जगाचा
पोशिंदा उपाशी झोपतोया रं.....
आता तरी जाग यावी सरकार ला
रं.. असा कसा अडकला...
राजकारणात रं.... जीवन
आता संपवून लागतोया जीवा
हुरहुरं... आवाज आता वाढवा
रं बळीराजाचं राज्य येऊ दे....
- अजय रामदास नान्नर.
फोन- 8329282608

## कातरओढ

पृथ्वीस सूर्यतेजस्पर्शाची मनातून ओढ आहे
पृथ्वीच्या भव्यतेला तेजस्वीतेची जोड आहे
सूर्यप्रकाश प्राप्त करण्यास शिखरांची चढाओढ
आहे अलवार, प्रेमळ स्पर्श किरणांचा अतुल्य,
अजोड आहे
तगवण्या सृष्टी जीवांना सूर्याची पदरमोड आहे
पांघरूनी प्रकाशशाल सृष्टीवर रवी माया बेतोड
आहे स्थितप्रज्ञ भास्कर, अविचल सुधोड आहे
अल्प दु:खाने मानवाची ध्येय धरसोड आहे
प्रकाश शलाकेने धरा नयनरम्य गोड आहे
प्रेमबंधात कैद जीवाला प्रीतीची 'कातरओढ'आहे
- मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,
छत्रपती संभाजीनगर.

## उद्याचा उष:काल

उद्याचा उष: काल
जनता मुकी बिचारी
कुणीही हाका
नाही कुणी आज
जनतेला वाली,
चालविती मुजोर
आपुला हेका
सत्तेच्या दगडाला करती
नमस्कार
दीनदुबळ्यांना देती
लत्ताप्रहार
सावध होऊन ऐका
पुढल्या हाका
खरेच स्वप्नातील
आशेवर जग जगते
रात्रीच्या उदरी असे
उद्याचा उष:काल
जर वाढला अन्याय
अत्याचार
घेईल प्रभू नरसिंहाचा
अवतार
बापुंनी उचलले मीठ
मुठभर
अन् साम्राज्याचा
खचला पाया
येईल पुन्हा जयप्रकाश
होईल पुन्हा नवनिर्माण
धीर धरी रे धीरापोटी
फळे रसाळ गोमटी
घेऊन येईल मानवधर्म
कुणी एक विवेकानंद.
होईल पहा सगळीकडे
आनंदी आनंद गडे
रचनाकार: आहेर
वा.र.नासिक
९९५८७८२९८२

## तिच्या येण्याने



नाकातल्या नथीवरती
मोती दिसतोया शोभूनी
रुप खुलूनी येते बहरुनी
केसातला गजरा
हसतो लाजूनी
लांब लांब वेणीत
ती मोहरते सुंदर रुपानी
छम..छम..छमछमती
पायातील पैंजणे
मधुर ध्वनी दरवळू लागतो
तिच्या येण्याने
लचकत्या कमरेला
हलक्याश्या गुदगुल्या करुन
जातो
कमरबंद स्पर्शाने

- लक्ष्मण वाल्डे -कन्नड
जि.छ.संभाजीनगर

## बळीराजा बोलतोय



मी बळीराजा बोलतोय
ओळखले का हो मजला
रात्रंदिवस कष्ट करुन
पोसत असतो मी जगाला
अठराविश्व दारिद्रय माझ्या
वाट्याला
भावच नाही हो माझ्या
मालाला मी कोणाला पेन्शन
मागायला जाऊ
हाच विचार आला मजला
दरवर्षीच्या नापिकीमुळे
जगणे मला अवघड झाले
सावकाराचे कर्ज फार
अडचणी आता वाढत चालले
हातात नाही एकही रुपया
शेतात पीक सडायला लागला
कोणाला सांगू माझी व्यथा
हाच मला प्रश्न पडला ...
सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## एप्रिल फूल

काय घेऊन बसलात राव
एप्रिल फुलची कहाणी
काट्याकुट्यात अडकली
फुलासारखी जिंदगाणी..
सांगा खरंच इथं कुठं
दिसतं सारं कूल ?
इथल्या साऱ्या कळ्यांना
होता येतं का फूल.. ?
किती कळ्या
उमलण्याआधी
रोज खुडल्या जात आहे
फुलांनाही फुलण्याची
भिती आता वाटत आहे..
माणूस मात्र आता नित्य
एप्रिल फूल होत आहे
मुर्गजळात वास्तवाची
किनार शोधू पाहत आहे..
वास्तवापासून खूप दूर
आपोआप गेला आहे
आभासी जीवनाला
सत्य मानून बसला आहे..
रोज रोज प्रत्येकजण
एप्रिल फूल होत आहे
अन आज उगा दुसऱ्यास
एप्रिल फूल करत आहे..
-ज्ञानेश्वर गायके

## तुझ्यातच आहे शक्ती...



तुझ्यातच आहे शक्ती,
नऊ महिने वाढवण्याची,
अन् संस्कार मनावर
घडवण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती,
कळां एवढ्या सोसण्याची,
अन् इवला अंकुर पोसण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती,
अमृत धार पाजवण्याची,
अन् रणभूमी गाजवण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती,
संकटात सावरण्याची,
अन् पसारा सारा आवरण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती,
संसाराला थाटण्याची,
अन् सुखाचे क्षण वाटण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती ,
संयमाने वागण्याची,
उशाशी बसून जागण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती,
वाईट नजर हेरण्याची,
अन् काळीज कुणाचे
चोरण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती ,
निगुतिने रांधायाची,
अन् भावनांना सांधायची...
हो !तुझ्यातच आहे शक्ती,
या जगाला वाकवण्याची,
अन् नारी रूप दाखवण्याची...
तुझ्यातच आहे शक्ती...
सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे ,
परभणी
मो.९८२३०६६६०६

## कोंडलेला जीव..



दूर कुठेतरी
साद प्रतिसाद
सारे पडसाद
अंतरात..
दिसे धावाधाव
भिन्न सावल्यांची
त्रेधा पावलांची
फरफटे..
फांद्याचे मोडणे
काहीही कळेना
गणित जुळेना
खोडालाही..
चांदण्यांच्या ज्योती
मंद मंद झाल्या
ढगाआड गेल्या
भेदरून..
वादळाच्या पाठी
आसूडाचे रव
सैरभैर जीव
कोंडलेला..!!
महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि.
सांगली
मो. 9765374805

## उन्हाळ्याच्या सुट्टीत

उन्हाळ्याच्या सुट्टीत
सहलीला जावूया
किल्ले नि टेकडया
जवळून पाहूया
उन्हाळ्याच्या सुट्टीत
आईस्क्रीमची गोडी
मिठासोबत खायच्या
कैरीच्या फोडी
उन्हाळ्याच्या सुट्टीत
खूप खूप खेळायचे
सायंकाळच्या वेळी
मनसोक्त पोहायचे
उन्हाळ्याच्या सुट्टीत
नको अभ्यासाचे नाव
सुप्त कला गुणांना
द्यायचा आता वाव
उन्हाळ्याच्या सुट्टीत
मजाच मजा
दोन महीने नसतो
अभ्यासाचा बोजा
- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## सवाल ....



निगाह-ए-मेहरबाँ तिरी किसी ख़ास पर क्यों है
उस घर में रोशनी है इस घर में अंधेरा क्यों है

हर दर्द की दवां मौजूद है हकीम के पास
दर्द-ए-दिल जहां में आख़िर बे-दवा क्यों है

वोह मिलता नहीं कभी बात भी नहीं करता
तेरी मर्ज़ी से वोह मेरे दिल में रहता क्यों है

तेरा दिल गुबार है मेरी वफ़ा के सुबूतों का
फिर भी मेरी शख्सियत दुनिया में बेवफा क्यों है

रात भर चेहरे पर लिखी जो आसुओं से
वोह ग़ज़ल सुबह नज़र अंदाज़ क्यों है

समन्दर के जिस्म का हिस्सा हो कर भी
कतरा इस जहां में आख़िर बदनाम क्यों है

आजमाइश के बाद भी झूठ कभी न बदले
और सच के लिए कसम का इम्तेहान क्यों है

बलराज संघई
9420015108

## गुलमोहर



गुलमोहर शोभतो हा
लाल नि केशरी रंगांनी.
दुरून फुलून दिसतो
त्याच्या तपकिरी शेंगांनी,

गुलमोहराच्या झाडाने
सारा परीसर फुलतो,
लाल नि केशरी फुलांशी
वारा गोड-गोड बोलतो.

भर उन्हामध्ये मनाला
येते नव-नवे हुरुप,
पाहून समाधान होते
त्याचे मनमोहक रूप.

गुलमोहर बहरतो
येताच वैशाखाचा मास,
लालकेशरी फुले दिसे
कडक उन्हातही खास.

गुलमोहराच्या वृक्षांची
परीसरात चढे लाली,
फुलांची चादर पसरे
गुलमोहरा झाडा खाली.
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण

# घागर घुमू दे ...परंपरा जपणारे काव्य

आधुनिक केसरी

**घागर घुमू दे हा कवी सरकार (इंगळी) यांनी संपादित केलेला आठ कवींचा कविता संग्रह आहे. पहिली कवयित्री प्रतिभा जितेंद्र गजरमल या कोरेगाव, सातारा येथील आहेत. बहिणीची माया या कवितेत त्यांनी वेडी बहीण कशी भावावर प्रेम करते त्याचे वर्णन केले आहे. तान्हा ही कविता भावपूर्ण वाटते. सुखी जीवन ही कविता नॉस्टॅल्जिक आहे. गड्या आपला काळच बरा होता. संस्कृती या कवितेत कवयित्री गणेश चतुर्थीचे वर्णन करते. पत्र ताईचे या कवितेत सासरी गेलेल्या ताईच्या आठवणी विदित केल्या आहेत.गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंतच्या सर्व गोष्टी या कवितेत आल्या आहेत.**

स्वाती दरेकर यांच्या कवितेतही गणरायाचे वर्णन आहे. महागौरी या कवितेत आश्विन महिना वर्णन केला आहे, नवरात्रीतील देवीचे सोज्वळ रूप कवितेत मांडले आहे त्यांनी. कुलदेवता या कवितेत त्यांनी कुलस्वामिनी तुळजाभवानीची स्तुती अभंग छंदात केली आहे. सुलभा साईनाथ सत्तुरवार यांच्या कवितेतही हरतालिका, गणेश व आदिशक्तीचे वर्णन येते. त्यांनी मंगळागौरीचे वर्णनही छान केले आहे, आली वसुधा हिरवाई लेऊन असे म्हणत त्या मंगळागौरीचा जागर घालतात. मंदाताई सुरेश वाघमारे यांची जगायचे कसे ही षडाक्षरी कविता छानच आहे. आशादायी कविता आहेत संग्रहात. किशोरी या कवितेत किशोरवयीन मुलीला उपदेश आहे. त्यांनीही देवी आणि गणपतीचा गोडवा गायला आहे. प्रियंका प्रकाश मोरे यांच्याही कवितांत आपले सण व उत्सव आले आहेत. अनंत चतुर्दशी रक्षाबंधन, गणेशोत्सव, आली आली गौराई या कवितात ते दिसते. त्यांनी नागपंचमीचेही वर्णन केले आहे. गणेश तुकाराम पुंडे यांनी मात्र सामाजिक आशयाची कविता लिहिली आहे. मरणानंतर मित्रा या कवितेत त्यांनी आपल्या माघारी लोकांनी रडावे, आपल्या कीर्तीचे गोडवे गावेत, असे सुचवले आहे. बिघडतो खेळ सारा मध्ये ते शेतकऱ्यांची व्यथा मांडतात. वर्दीतला देव या कवितेत महामारीच्या काळात पोलिसांनी केलेल्या सेवेची ते याद देतात. माय माझी या कवितेतून आईचे दर्शन त्यांनी घडविले आहे. भाऊसाहेब गणपती कांबळे यांनीही गणेशाची आरती, हरतालिका, विसर्जन आदी कवितांतून आपल्या धर्माची महती गायली आहे. घागर घुम दे या कवितेत त्यांनी आपल्या खेडेगावातील संस्कृतीची आठवण ठेवली आहे. संपादक कवी सरकार इंगळी अर्थात विलास भूपाल पाटील यांनी देखील आपल्या कवितांतून संस्कृती मांडून ती जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत आपण विसरत चाललो आहोत ती संस्कृती जपण्याचा त्यांचा प्रयत्न आणि नव्या पिढीला आपले सण उत्सव व परंपरेची माहिती या संग्रहाद्वारे पुरविली आहे. मुखपृष्ठातून देखील आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते. घागर घुमू दे .

संपादक - कवी सरकार
प्रातिनिधिक कवितासंग्रह
पृष्ठे ५०, मूल्य १२० रुपये
पुस्तक परीक्षण




प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९



# ‘अहिंसा रन’ एक्सोला उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने भगवान महावीर यांच्या 'जगा आणि जगु द्या' या संदेशाचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी 'अहिंसा रन' चे २ एप्रिल २०२३ ( रविवार ) रोजी सकाळी ५ :३० वाजता कर्णपुरा मैदान येथे आयोजन करण्यात आले आहे. 'अहिंसा रन' हे महिला आणि पुरुष यांच्यात ३ किमी, ५ किमी, १० किमी अशा तीन पातळ्यांमध्ये होणार आहे तसेच दोन लाखांपर्यंत बक्षिसे ठेवण्यात आले आहे. याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदणी होणार आहे. २ एप्रिल रोजी होणार्या 'अहिंसा रन' च्या एक्स्पोला नागरिकांचा उदंड प्रतिसाद पाहायला मिळाला. स्पर्धकांना १ एप्रिल रोजी मॅरेथॉन किटचे खिवंसरा गोल्डप्लेक्स येथे सकाळी ११ वाजेपासून वाटप करण्यात आले. एक्स्पोचे उद्‌घाटन इंदूमती पगरिगा, रवी खिवंसरा यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रसंगी जितो महिला शाखेच्या अध्यक्षा डिंपल पगारीया, सेक्रेटरी प्रिया मुथा, राज्य उपाध्यक्ष रवी खिवंसर, चॅप्टर चेअरमन पारस ओत्सवाल, यूथ चेअर पर्सन सुरक्षा कटारीया, संघ अध्यक्ष अनिल संचेती, एलर्ट गृपचे अजित चंडालीया, जितो चॅप्टर कमिटीचे पंकज पांडे, सकल जैन मोहत्सव समितिचे अध्यक्ष राजेश मुथा, कार्याध्यक्ष रवी लोढा, सकल जैन समाज समिति कार्याध्यक्ष निलेश पहाडे, वियान रिॲलिटीचे विक्रम बोरा, आशीष पोखरण, आशीष संकलेचा, सुहास कोटेचा, गौतम पगारीया, दिनेश मुथ्था यांची उपस्थिती होती.

# लोकप्रतिनिधींना धमक्या येईपर्यंत गुन्हेगार निर्ढावले

## खासदार सुप्रियाताई सुळे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** लोकप्रतिनिधींना वारंवार अशा धमक्या येईपर्यंत गुन्हेगार निर्ढावले आहेत, याचा अर्थ गृहखात्याचा वचक,दरारा नाही काय ? अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी ट्वीट करत केंद्र आणि राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. संसदेचे खासदार आणि महाविकास आघाडीचे महत्त्वाचे नेते संजय राऊत यांना एका व्यक्तीने फोन करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. देशातील एका लोकप्रतिनिधीला जर अशाप्रकारे धमकी दिली जात असेल तर ही अतिशय गंभीर बाब असल्याचे खासदार सुप्रियाताई सुळे यांनी म्हटले आहे.

केंद्र तसेच महाराष्ट्र सरकारने या घटनेची गंभीर दखल घेऊन त्यांना आवश्यक ती सुरक्षा पुरविण्याची गरज आहे असे सांगतानाच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी अशी विनंतीही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केली आहे.

# निसर्ग सौंदर्य आणि पशु-पक्ष्यांना सांभाळा !

## झाडांना पाण्याच्या बाटल्या बांधून वृक्ष संवर्धनाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे पक्ष्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी झाडांवर पाणपोई सुरू करण्यात आली. शिवाय, उन्हाळ्यात झाडांची विशेष काळजी घेण्यासाठी झाडांना पाण्याच्या बाटल्या बांधून वृक्ष लागवड सोबतच संवर्धन काळाची गरज हा संदेश देण्यात आला. लातुरातील एमआयडीसी भागातील मुलींचे निरीक्षण गृह ( अनाथाश्रम ) येथे हा उपक्रम राबविण्यात आला. मुलींचे निरीक्षण गृह येथे अधीक्षक सागर मलवाडे यांच्या पुढाकाराने सावित्रीबाई फुले उद्यान उभारण्यात आले आहे. या उद्यानात पक्ष्यांच्या पिण्याची व्यवस्था व्हावी यासाठी झाडांना पाण्याच्या येळण्या बांधण्यात आल्या. सध्या कडक उन्हाळा असून पक्षी आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे, अशी माहिती वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा यांनी दिली. या उपक्रमात वसुंधरा प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अमोल स्वामी, संस्थापक सहसचिव अमर साखरे यांच्यासह निरीक्षण गृहातील मुली सहभागी झाल्या होत्या.



**आला उन्हाळा .... झाडांना जपा ! :** उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे . मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात झाडांची विशेष काळजी घेण्याची गरज आहे . यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने झाडांना पाण्याच्या बाटल्या बांधून वृक्ष संवर्धन केले जाते आहे . सकाळ-सायंकाळी फिरायला ( वॉक ) जाणाऱ्यानी सोबत जाताना पाण्याची बॉटल घेऊन जाऊन झाडांना पाणी द्यावे, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानने केले आहे . जस उन्हाळ्यात आपण गाडी सावलीखाली लावण्यासाठी जागा शोधते त्याप्रमाणे वृक्ष संवर्धनासाठी पुढे यावे असे आवाहन प्रतिष्ठानने केले आहे .

## लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# सखुबद्दा

आधुनिक केसरी

नाव ऐकून अजब वाटले ना ! मराठवाड्याल्या दोन राज्यांच्या सीमा जोडल्या गेल्या. एक आंध्र प्रदेश आणी कर्नाटक. त्यामुळे महाराष्ट्रीय पाकसंस्कृतीत त्या राज्यांच्या पाकसंस्कृतीची सरमिसळ झाली आहे, निदान त्या जिल्ह्यांपुरती तर. सखुबद्दा मराठवाड्यातल्या नांदेड, देगलूर, लातूरच्या , परळीच्या काही भागातच हा प्रकार विशेषत: केला जातो नावा ऐकून जरा मजेशीर वाटले ना ! !! सखुबद्दा !! नाव जितकं मजेशीर, पदार्थ तितकाच खास आहे . थोडक्यात सांगायचे तर फ्युजन !! दोन संस्कृतीचा मिलाफ ! थोड ह्यातले थोडे त्यातले घेवून पदार्थाची खुमारी, लज्जत वाढवायची. मावशी, आई, बहीणी , बहीणींच्या सासुबाई सगळ्यांना विचारले की ह्याचे नाव असे का ? पण माहीती नाही असेच उत्तर मिळाले. मग मोठ्या बहीणीने सांगीतले की तिच्या फेसबुकवरच्या वाचनात आले आहे . शरयुतीर ह्या पेजवर अशी माहीती होती की लेखीकेच्या अंदाजाप्रमाणे, आटपाट नगरात कुठल्या एका आजीबाईने, लोणचं करताना, कैरीच्या लोणच्याकरता फोडी चिरून झाल्यावर अंगाशी उरलेला भाग काढून टाकताना, कैरीचे विळीवर तासल्यासारखे तुकडे करून, लोणचं बरणीत भरून ठेवल्यानंतर, मसाला लागलेल्या रिकाम्या तसराळ्यात हे काप घालून, थोडं अजून तिखट, गूळ घालून समोरची थोडी फोडणी ओतून दुपारच्या जेवणात 'सर्व्ह' केलं असणार.. नाव दिलं सखुबद्दा ! ( साभार फेसबुक ) मग ह्या खमंग, आंबटगोड, तिखट अश्या खास अश्या मराठवाडी पदार्थांची कथा कळली. सखुबद्दा हा लोणच्याचा प्रकार. मोहरी आणी तीळचा कूट त्यात बरोबरीने घालायचे, थोडा गूळ घालायचा . माझी बहीण सौ वंदना चाकूरकर हिच्या सासुबाई सौ माईआत्या फारच सुंदर सखुबद्दा बनवतात . त्यासाठी लागणारे साहीत्य आणी कृती पुढिलप्रमाणे

**साहीत्य** - दोन घट्ट कैऱ्या , दोन चमचे मोहरी , चार पाच लवंगा , चार ते पाच मिरे , धणे एक चमचा, दोन चमचे मेथ्या , दोन चमचे किसलेले सुके खोबरे , हिंग ,चार चमचे कच्चे तीळाची भरड , पाव वाटी गुळ , हळद. तिखट, मीठ आपल्या आवडीनूसार तिखट ( भरपूरच ) .तेल , फोडणीचे साहीत्य ईत्यादी .

**कृती**- कैरीचे साल काढून त्याला विळीवर तास मारावेत . आता पातेल्यात पाणी घेवून त्यावर चाळणी ठेवून ते वाफवून घ्यावेत. तोपर्यंत मेथ्या भाजून घ्याव्यात. मोहरी, मेथ्या, हिंग ,लवंगा ,मिरे धणे यांची पूड करुन घ्यावी. तीळाची पण कच्चीच पूड करुन घ्यावी. कैरीचे तास वाफलले , थोडे थंड झाले की त्यावर ह्या तयार केलेल्या दोन्ही पुडी घालाव्यात. त्यावर भाजून घेतलेल्या सुक्या खोबऱ्याचा खिस हाताने चुरडून घालावा , आता तिखट, हळद , मीठ, गुळ घालून मिश्रण एकत्र कालवून घ्यावे .आता तेल गरम करुन झक्कासपैकी खमंग फोडणी करुन ती घालावी . सखुबद्दा तयार . **टिप**- या दिवसात केला तर सखुबद्दा जास्त नाही टिकणार पण लोणच्याचा सिझनमध्ये पहीला पाऊस झाला की केलेला सखुबद्दा ६-७ महिने टिकू शकतो. कदाचित त्यापेक्षा जास्त पण टिकेल .जर जास्त काळ टिकण्याच्या दृष्टीने करायचा असल्यास तिळाच्या कुटाचं प्रमाण जरा कमी करावं लागेल आणी खोबरे अजिबातच



घालायचे नाही , कैरीच्या आंबटपणावर गुळाचे प्रमाण कमी /जास्त करावे . वर्षभर ठेवायचे असेल तर मोठ्या मोठ्या सहा ते आठ कैऱ्याचा सखुबद्दा होईल . मग करुन बघा आगळ्यावेगळ्या नावाचा एकदम चवीष्ट मराठवाडी पदार्थ . सखुबद्दा / सखुबद्दा नावाने प्रसिद्ध आहे .